# श्री साईबाबांच्या जीवनकथा

– चकोर आजगांवकर

ही १८९० च्या सुमाराची अब्दुल्लाच्या आगमनाची उपकथा मांडताना बाबांच्या मुस्लिम भक्तांबद्दल लिहिणे क्रमप्राप्त आहे. बाबांच्या शिरडीतील वास्तव्याच्या पहिल्या दोन-तीन तपाच्या काळात बाबांचे जसे हिंदुधर्मीय खेडूत भक्त होते, तसे मुस्लिम समाजातील भक्तही बाबांकडे आकृष्ट झाले होते. तथापि शिरडीच्या परिसरातील मुस्लिम समाजात नामोल्लेख करण्याजोगी मंडळी आढळत नाही. ऐतिहासिक महत्त्वाची नोंद घेता येईल, असे मुसलमान भक्त हे शिरडीबाहेरच्या दूरस्थ प्रदेशातूनच शिरडीत आले. तेसुद्धा फार उशिरा शिरडीत दाखल झाले. यापैकी सर्वप्रथम बाबांच्या छायेत येऊन पोहोचलेला मुस्लिम भक्त अब्दुल्ला १८९० मध्ये शिरडीत आला व तो बाबांच्या दैनंदिन जीवनाशी पूर्णपणे निगडीत झाला. बाबांनंतरही १९५४ पर्यंत अब्दुल्ला जगला. त्याने मुस्लिम पद्धतीने जीवन व्यतीत करून बाबांचे प्रेम व कृपारूपी धन आत्मसात् केले. छोटेखान, बडेबाबा, अब्दुल रहीम रंगारी यांसारखे भक्त फारच उशिरा, म्हणजे २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात शिरडीला आले. अब्दुल्ला याचा जन्म १८७१ चा. तो बाबांहून ३६ वर्षांनी लहान होता. तो आला त्यावेळी बाबा ५५ वर्षांचे झाले होते व अब्दुल्ला फक्त १९ वर्षांचा युवक होता. अब्दुल्ला नांदेड येथील अमरुद्दीन फकिराचा चेला होता. बाबा फकिराच्या स्वप्नात अवतीर्ण झाले व त्यास अब्दुल्ला यास देण्यास दोन आंबे देऊन अब्दुल्लास शिरडीस पाठविण्याची आज्ञा देऊन अंतर्धान पावले. त्याप्रमाणे अब्दुल्ला शिरडीस आला. चांदोरकर, गणूदास हे त्यानंतर दोन वर्षांनी बाबांच्या दरबारात दाखल झाले.

## "माझा काऊ आला आहे!"

(काळ: १८९० स्थळ: द्वारकामाईत बाबांजवळ म्हाळसापती, काशीराम, श्यामा, तात्या)

**बाबा:** श्यामा, तात्या, अरे माझा कावळा आज या मशिदमाईत येणार आहे. त्याचे स्वागत करा! तो माझ्या फकिराचा प्यारा बेटा आहे. तो पहा, काऊ आला. (अब्दुल, एक एकोणीस वर्षाचा मुस्लिम फकीर युवक येतो. बाबांना कुर्निसात करतो.)

**अब्दुल:** माझ्या मुर्शिदबाबा, मी तुम्हाला सलाम करतो. फकीर अमरुद्दीनबाबांनी मला आपल्या पायापाशी पाठविले आहे.

**बाबा:** अब्दुल, माझे आंबे कुठे आहेत? फकिराने ते तुला दिलेत काय?

**अब्दुल:** परवरदिगार, तुम्ही सारेकाही जाणता. मला आपला प्रसाद मिळाला. माझ्या फकीर गुरूंनीच आपल्या हुकूमावरून मला आपल्याकडे धाडले आहे. आपण त्यांच्या स्वप्नात येऊन अल्लाचा आदेश सांगितला ना!

**बाबा:** ठीक आहे. अल्लाचीच सारी करणी आहे. तो तुझे कल्याण करील. माझ्या कावळ्या, तू माझा हलालखोर आहेस. तू फकिराची – माझ्या अल्लामियाची – सेवाचाकरी कर! तू माझ्याजवळ बसून रोज पवित्र कुराणशरीफचे पठण कर! हा पहिला अध्याय वाच! (कुराण उघडून वाचावयाचे पान दाखवितात.)

**अब्दुल:** बाबा, कुराणशरीफचे पठण आपल्यापाशी करावयास मिळणे, ही अल्लामियाची दया आहे. मी धन्य झालो!

**तात्या, म्हाळसापती:** बाबा, हा अब्दुल्ला आपली कोणती सेवा करणार आहे?

**अब्दुल:** भाईओ, मी बाबांचे कपडे धुईन. त्यांच्या वाटेवरील केरकचरा स्वच्छ करीन. मी मशीद झाडून ठेवीन. पाणी भरीन.

**बाबा:** अब्दुल, तू तपोवन आणि चावडीही झाडून साफ करीत जा! तू शिरडीचे रस्ते आणि पायवाटा स्वच्छ कर! मैं तुझे दर्यापार कर दूंगा! मैं तेरी मिट्टी का सोना बना दूंगा!

**श्यामा, तात्या:** बाबा, एका नवख्या माणसावर केवढी ही भिस्त आणि विश्वास ठेवता आहात! या मुलाला तुम्ही ओळखता काय? एका अनोळखी मुलाच्या हाती तुम्ही आपली मशीद, चावडी आणि तपोवन सोपवीत आहात!

**बाबा:** श्यामा, हा अब्दुल्ला मला नवीन नाही. हा नांदेडच्या फकिराचा चेला आहे. अल्लामियाचा फार लाडका आहे. मला अल्लामियाची इच्छाच पाळावी लागते आहे. तो माझ्या सांगण्यावरूनच आला आहे. तो माझी दैनंदिन सेवा करील. चावडीजवळ झोपेल. भिक्षा मागून पोट भरील. तुम्हाला त्याची चिंता नको. अल्ला त्याच्या पोटापाण्याची सोय करील.

**श्यामा:** बाबा, हा मुलगा आपली किती दिवस चाकरी करणार आहे?

**बाबा:** हा शेवटपर्यंत माझ्यापाशी राहील. माझ्यामागून माझ्या तुर्बतीची साफसफाई करील. तिच्यावर फुले घालील. गलेफा पसरून तुर्बत सजवील. हा श्रद्धा व सबुरीचा भक्त आहे.

**म्हाळसापती:** बाबा, या चाकरीचे त्याला भगवंत मोल देईलच.

**बाबा:** अब्दुल, तू माडीच्या वाड्यात रहाशील. तुला भेटण्यासाठी व तुझा सल्ला घेण्यासाठी असंख्य भक्त माझ्यामागून तुजकडे येतील.

**अब्दुल:** बाबा, मला हे मोठेपण नको. मला आपल्या वचनांची व उपदेशाची नोंद ठेवण्याची परवानगी द्या! मी ती माझ्या वहीत लिहून ठेवीन. एवढीच माझी बिदागी असू द्या!

**बाबा:** ठीक आहे. अब्दुल, तू विश्रांती घे! तू जे वाचशील त्याचे मनन कर! कुराणाच्या वचनांकडे लक्ष दे! तू कोण आहेस, त्याचे चिंतन कर! अरे, तू देह नाहीस, आतील आत्मा आहेस. देहातच तू चांदसूरज पहाशील; कारण तूच प्रकाश आहेस, रोशनी आहेस.

**काशीराम:** केवढी कृपा! अब्दुल, तू धन्य आहेस. (सर्व जातात.)

(खरेच, अब्दुल हा बाबांचा हनुमान झाला. त्याने दिवसरात्र बाबांची सेवा केली, त्यांच्या गरजा जपल्या. हिंदुभक्तांत मिसळणारा, इस्लाम धर्म सांभाळणारा, असा तो खरा साधक होता. त्याने बाबांच्या वचनांची नोंदवही लिहिली. बाबांच्या समाधिनंतर बुटीवाड्यात राहून त्याने समाधीची सेवा केली व भक्तांना मार्गदर्शनही केले. १९५४ साली अब्दुल याने बाबांच्या छायेतच देहविसर्जन केले व तो साईमय झाला.)

श्री साईबाबांची मशिदीत फळीवर झोपण्याची लीला, पाण्याने पणत्या पेटविण्याच्या चमत्काराएवढीच आश्चर्यकारक होती. तथापि भौतिक विज्ञानाच्या नियमाच्या पलीकडे असलेल्या बाबांच्या दिव्य विभूतीमत्वाचा तो एक केवळ नैसर्गिक आविष्कारच होता. हा शिरडी गावचा फकीर फाटक्या चिंध्यांची कफनी घाली. त्याच्या सिद्धींचे वैभव राजशाही ऐश्वर्यदर्शक असे. १८७८ पर्यंतचे बाबांनी आपले भटके अनिकेत जीवन त्यागून द्वारकामाई मशीद वास्तव्यासाठी कायम केली होती. ते अन्नासाठी मशिदीबाहेर पडून पाच घरी भिक्षा मागत. माध्यान्हीच्यावेळी हे भिक्षाव्रत त्यांनी आचरण्याचे स्वीकारले. बाबा स्वत:च लक्ष्मीचे वल्लभ असता, त्यांना भिक्षा मागण्याचे प्रयोजन काय होते बरे? ''हे माय, कोरभर भाकर वाढ!'' अशी हाक देत बाबा उन्हातान्हात अनवाणी फिरत शिरडीच्या तापलेल्या धुळीतून पदभ्रमण करीत व खाकेची चौपदरी पसरीत. ते काय भिक्षा मागीत? नाही. ते शिरडीकरांच्या हृदयातील गाभाऱ्यातील भक्ती, भाव व सत्प्रवृत्तीचा शोध घेत फिरत.

## मागती भिक्षा भगवंत!

(काळ: १८९१च्या सुमारास स्थळ: शिरडीच्या एका गावरस्त्याचे दृश्य)



**बाबा:** आई, कोरभर भाकर दे! अल्ला तुझे कल्याण करील!

**एक गृहिणी:** बाबा, ही घ्या भाकर! कोरड्यास मजपाशी काही नाही. बाबा, बरोबर कांद्याची फोड देऊ काय? (देते.)

**बाबा:** आई, तू दयावंत आहेस. देव तुझं भले करील!

**दुसरी गृहिणी:** बाबा, ही हिरव्या मिरचीची तिखट चटणी वाढू काय? (देते.)

**एक खेडूत:** बाबा स्वत:च सर्वांना देणारे दाते असताना ते भिक्षेसाठी दारोदार का फिरत आहेत? त्यांना काय कमी आहे. सर्वांना ते सदैव देतच असतात.

**दुसरा खेडूत:** भाऊ, यात आश्चर्य कसले? साधु आणि संन्याशी हे आजवर भिक्षेच्या अन्नावर गुजराण करीत आले आहेत. ते गृहस्थाश्रमी नसल्याने त्यांनी भिक्षापात्र घ्यावे, अशी शास्त्राची आज्ञा आहे.

**एक स्त्री:** पण बाबा काही स्वत:साठी मागत नाहीत. ही भिक्षा ते मशिदीत एका खापरात ठेवतात. मग त्यावर कावळे, चिमण्या, कुत्रे सारे प्रथम आपले पोट भरतात. उरले-सुरले तर बाबा आपल्या मुखात घास घेतात.

**दुसरी स्त्री:** आमचे बाबा सर्वांच्या मुखाने जेवतात. इतरांच्या पोटाला अन्न लागले की आमचा देव तृप्त होऊन ढेकर देतो.

(म्हाळसापती, डेंगळे, श्यामा बोलत बोलत त्या ठिकाणी येतात. ऐकून -)

**नाना डेंगळे:** आई, माझे बाबा सर्वांच्या अंतर्यामी रहातात, म्हणूनच ते सर्वांच्या मुखाने बोलतात, सर्वांच्या हाताने काम करतात. सर्वांच्या क्षुधेत माझ्या बाबांचीही भूक सामावलेली आहे.

**म्हाळसापती:** श्यामा, ते पहा, बाबा आता आपल्या भिक्षेच्या मार्गावरून माघारी वळत आहेत. **''अलौकिक घडे लौकिकात। मागती भिक्षा भगवंत''**

**श्यामा:** बाबा भिक्षा मागतात हे काहीतरी चुकल्याचुकल्यासारखे वाटते. स्वत: कल्पवृक्ष असलेले बाबा कोरभर भाकरी मागत दारोदार फिरतात, हे काही मनाला पटत नाही. माझ्या देवाचा कुबेर भांडारी आहे. त्याला खरेच काही कमी नाही. **''जगाचे महोदर स्वामी। तयांच्या काय कमी धामी?''**

**नाना डेंगळे:** हाच संताच्या जीवनातील विरोधाभास आहे. प्रत्यक्ष लक्ष्मीच जणू चिंध्यांचा शालू नेसून भिक्षा मागत फिरते आहे.

**म्हाळसापती:** नाना, आमचे बाबा समर्थ सद्गुरू आहेत. ते एका क्षणात मस्तकावर नशिबाची रेख उमटवू शकतात, तर दुसऱ्या क्षणी नियतीच्या कर्मरेषा स्वत:च्या अधिकारात पार पुसून टाकू शकतात. **''रेखिती भाळी कर्म रेख। मारिती रेखेवर मेख।''**

**नाना डेंगळे:** बाबांना स्वत:ला म्हणून काहीही नको असते. ते निरासक्त मुनी आहेत. ते स्वत: कल्पवृक्ष असल्याने उलट इतरांचे सारे मनोरथ पूर्ण करू शकतात. खरोखर शिरडीकरांचे हे थोर अहोभाग्य आहे की त्यांच्या दाराशी प्रत्यक्ष परब्रह्म उभे आहे. प्राक्तनाचा स्वामी, नियतीचा मालकच त्यांच्या उंबरठ्यावर उभा आहे. (बाबांच्याजवळ जातात.) **''जगाचे स्वामी श्रीमंत। जाणिती एक भाग्यवंत''**

**श्यामा:** हा आमचा देव आम्हा अज्ञान गृहस्थाश्रमींची अंतरे धुंडीत आहे. **''काय त्या भाकरीची खंत? शोधिती हृदयाचे प्रांत।''** बाबा आमच्या मनाचा तळ शोधीत फिरत आहेत.

**म्हाळसापती: ''जगाचे धनी महोदर। काय त्या देतील दातार?''** या विश्वाच्या स्वामीला आम्ही गरीब काय देऊ शकणार? काय ही कठोर परीक्षा!

**बाबा :** माझ्या लेकरांनो, मी तुमचे शब्द ऐकले. मी सदैव तुमच्याजवळच आहे. हा क्षण पृथ्वीमोलाचा आहे. प्रत्यक्ष भगवंत माणसाच्या रूपात माणसात वावरण्याचा हा अलौकिक काळ पुन्हा येणार नाही. जागे व्हा!

**नाना डेंगळे :** प्रेमभक्तीचे दीप आपण पेटवू या! हृदयाच्या निरांजनात शरणागती व समर्पणाची ज्योत लावून ते हृदय या भगवंताच्या चरणी वाहू या! मला वाटते, बाबा या प्रेमाची, श्रद्धेची व समर्पणाची भिक्षा मागत आहेत.

**श्यामा :** बाबा, आम्ही आपला देह, बुद्धी, मन, चित्त आणि अहंकार साऱ्या सर्वस्वासहित आपल्या पायावर ठेवीत आहोत. आमच्यावर कृपा करा! (सर्व वंदितात.) **''बुद्धि, मन, अहंकार, चित्त। वहावे चरणी कृपावंत।''**

**बाबा :** मला श्रद्धा व सबुरीयुक्त हृदय वहा! मी तुम्हाला संसाराच्या पैलपार नेईन.

(श्री साईबाबांच्या भिक्षाटनाची ही माध्यान्हीची फेरी म्हणजे माणसाच्या अंत:करणातील भक्ती, भाव, सत्त्वगुण यांच्या शोधाची एक यात्रा असे. यातून ते भुकेलेल्याला अन्नदान देण्याचे शिकवीत. दारी येणाऱ्या भगवत्स्वरूप अतिथीला मागे न पाठविण्याचा वस्तुपाठही बाबा येथे देत होते. आपल्या उंबरठ्यावर प्रत्यक्ष भगवंताचे स्वागत करून त्याला सर्वस्वाचे दान करण्याची ही अमोलिक संधी शिरडीकरांना मिळे. खरोखरच प्रत्यक्ष प्रभूने दारी भिक्षा मागावी हे शिरडीचे भाग्य होते. श्री साईगातीयनकार म्हणतात :

**''अलौकिक घडे लौकिकात।**
**मागती भिक्षा भगवंत।''**

---

१८९२ हे वर्ष श्री साईजीवनातील एक क्रांतिकारक पर्व ठरले. कारण यावर्षी बाबांचे विख्यात ज्ञानीभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबांच्या आध्यात्मिक वर्तुळात प्रथम दाखल झाले. बाबांच्या दिव्य विभूतीमत्वाची प्रभा या अध्यायापासून महाराष्ट्रातील सुशिक्षित, प्रतिष्ठित व विचारवंत मंडळींत पसरू लागली. चांदोरकर हे एक प्रसिद्ध शासकीय अधिकारी व नगरच्या कलेक्टरांचे चिटणीस होते. ते सुविद्य पदवीधर तसेच अभ्यासू पंडित व भगवद्गीतेचे एक अभ्यासक चहाते होते. ते एका सात्त्विक, संपन्न प्रतिष्ठित हिंदु कुटुंबातील होते. श्री बाबांनी त्यांना खास बोलावणे पाठवून आपल्यापाशी रूजू करून घेतले. त्यांचा व बाबांचा चार जन्मांचा संबंध होता, असे बाबा म्हणत असत. दासगणू हे चांदोरकरांचे पोलीसरक्षक असल्याने ते आपल्या काव्यप्रतिभेसह बाबांच्या परिसरात दाखल झाले. या दोघांनी बाबांचा महिमा महाराष्ट्रातील भक्त-भाविक तशाच सुप्रतिष्ठित समाजात प्रसृत केला. बाबांच्या दैवी परिसरस्पर्शाने चांदोरकर यांच्या तसेच दासगणू यांच्या जीवनाची जडणघडण पार बदलून गेली व नव्या रूपात दोन्ही व्यक्तिमत्वे जगापुढे प्रगट झाली. नानासाहेब हे बाबांचे जणू ज्ञानीभक्त धनंजय होते, तर श्री दासगणू हे बाबांचे गुणसंकीर्तन करणारे भक्तीचे भाट, नारदीय कीर्तन परंपरेचे प्रवचनकार, कीर्तनकार झाले. बाबांचे तेज त्यांनी महाराष्ट्राच्या व बृहन्महाराष्ट्राच्या सीमेपार नेले. या उपकथेत नानासाहेबांचे द्वारकामाईतील प्रथम पदार्पण रंगविले आहे.

## ज्ञानप्राप्तीसाठी गुरूचरण शरणता

(काळ : १८९२ स्थळ : द्वारकामाई मशिदीत श्री बाबांशी श्यामा, तात्या, अब्दुल, काशीराम इत्यादी संभाषण करण्यात गुंतले आहेत.)


**नानासाहेब चांदोरकर :** (द्वारकामाईत प्रवेश करीत) बाबा, मी नाना, आपल्या चरणांवर सादर वंदन करीत आहे. संत म्हणजे परमेश्वराच्याच प्रतिमा हे मी जाणतो. पण आपण आपल्यापाशी मला यावयाचे निरोप वारंवार का बरे धाडीत असता?

**बाबा :** (सस्मित) नाना, ये! अगदी माझ्याजवळ बस! मी कुणालाही काही कारणावाचून बोलावणे पाठवीत नसतो. नाना, तुझा-माझा गेल्या चार जन्मांचा संबंध आहे. हे नाते, नाना, मला पुन्हा जोडून घ्यावयाचे आहे. तू आलास ना! ठीक झाले.

**नाना :** बाबा, तुमचा-माझा चार जन्मांचा संबंध कसा काय ते मी काही जाणीत नाही.

**बाबा :** अरे, नाना! हे तुला कधीच कळणार नाही. पण मला सर्वांचा भूतकाळ आणि भविष्यकाळ स्पष्टपणे दिसत असतो. (नाना सचिंत होतात. थोड्या वेळाने श्री बाबांच्या चरणांचे संवाहन करू लागतात.)

**नाना :** (चरण चुरीत) बाबा, या चरणांपाशी मला सदासर्वकाळ बसावे, असे वाटू लागले आहे. आपला स्पर्श इतका अद्भुत आहे की मी आपल्याशी जणू बांधला गेलो आहे. (नाना गीतेतील श्लोकाचे चरण मनाशी गुणगुणत पदसंवाहन चालू ठेवतात.)



**बाबा :** नाना, तू शहाणा आहेस गीता वाचली आहेस. तू काय गातो आहेस बरे?

**नाना :** बाबा, मी गीतेतील तो श्लोकच मोठ्याने म्हणतो -

**तद्विद्धी प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्षन्ति ते ज्ञानं, ज्ञानिन: तत्त्वदर्शिन: ।।**

**बाबा :** नाना, तू श्लोकाचा अर्थ सांग पाहू!

**नाना :** बाबा, अर्थ सोपा आहे. श्लोकात असे सांगितले आहे की तत्ववेत्ते किंवा साक्षात्कारी महात्मे आपली सेवा करणाऱ्या, विनम्रभावाने प्रार्थना करून शंका, प्रश्न विचारणाऱ्या अथवा आपल्या चरणांशी शरणागत आलेल्या शिष्याला ज्ञानाचा उपदेश करतात.

**बाबा :** नाना, अर्थ बरोबर आहे. पण 'ज्ञान' या पदाऐवजी 'अज्ञान' हा शब्द वापरून अन्वयार्थ लाव पाहू! कारण 'ज्ञान' हा शब्द येथे योग्य नाही.

**नाना :** बाबा, असे कसे म्हणता? सर्व भाष्यकारांनी 'ज्ञान' हा शब्द स्वीकारलेला आहे. शंकराचार्यांनीही त्याला विरोध केलेला नाही. आपण सुचविता ते तर्कसंगत नाही.

**बाबा :** नाना, मला सर्व भाष्ये ठाऊक आहेत. पण ज्ञान हे काही शिकविता येत नसते. ते शब्दांच्या पलीकडे असते. शब्द हे मायेचे – अज्ञानाचे – वाहक असल्यामुळे शब्द हे काही ज्ञाननिर्मिती करू शकत नाहीत.

**नाना :** पण बाबा, ज्ञानी महात्मे 'ज्ञान' न देता 'अज्ञान' उपदेशितात, हे कसे स्वीकारायचे?

**बाबा :** नाना, ज्ञान हे स्वयंसिद्ध असते. ते सदासर्वकाळ आणि सर्वत्र प्रकाशमान असते. अज्ञानाच्या आवरणाखाली ज्ञान काही काळ झाकले जाते. गुरू अज्ञानाचा पडदा फाडतात व आतले ज्ञान आपोआप प्रगट होऊन येते. ते आत्मरूपाने दिसू लागते.

**नाना :** बाबा, मला समजले. ज्ञानी महात्मे त्या अज्ञानरूप मायेचाच उपयोग करून मायावी सृष्टीचे बाह्य कवच तोडतात. ज्ञान अज्ञानाच्या ढगाबाहेर पडते. बाबा, आपण गीतेचे प्रत्यक्ष हृदय जाणता. आपण गीतेचा भावार्थ आम्हाला थोडक्यात सांगा!

**बाबा :** नाना, मी तुला गीता शिकवीन. पण गीता थोडक्यात उथळपणे मांडता येणार नाही. मी एवढेच सांगेन की मन चंचल असले तरी ते अभ्यासाने वा साधनेने स्थिर करता येते, असे भगवंतांनी स्पष्ट केले आहे. भगवंतांनी सर्व भूतमात्रात स्वत:ला पहा, असे सांगितले आहे. पशु-पक्षी, वृक्ष-वल्लरी, सजीव-निर्जीव सृष्टीत भगवंत भरला आहे. सुख-दु:खे, आप्त-परकीय, सुवर्ण-मृतिका समान मानून समदृष्टीने जगाकडे पहावे. कर्मे प्रभूची आज्ञा म्हणून करून ती पूजाभावाने भगवत्चरणी अर्पावी. कर्तव्य करावे, पण कर्माचा "मी कर्ता" हा अहंभाव टाळावा. कारण सर्व कर्माचा प्रभू हाच एकमेव कर्ता आहे. आपण फक्त साक्षी आहोत.

**नाना :** बाबा, कर्माच्या परिणामापासून आम्ही स्वत:ला कसे सोडवून घ्यावे, ते सांगा!

**बाबा :** नाना, ही बोलण्याची गोष्ट नाही, तर हे प्रत्यक्ष कृतिमय प्रात्यक्षिक आहे. तू तुझ्या सर्व इच्छा, विचार, वासना, मनाचे कल्लोळ माझ्या पायी वहा! सर्व ओझे माझ्या शिरावर ठेव! तू केलेल्या कर्माचे फळ स्वत:साठी अपेक्षू नकोस! तू कर्तव्यभावाने कर्म करून त्याचे फळ माझ्याकडे सोपव! अन्यथा तुला केलेल्या कर्माची जबाबदारी स्वीकारून प्राक्तनाच्या जाळ्यात अडकावे लागेल. तू श्रद्धा व सबुरीने वाग! बाकी सर्वकाही मी पाहीन! वासना, देहभाव, इंद्रियसुख यांच्या बंधनातून तू अलिप्त रहा! या ममत्व निर्मिणाऱ्या स्वार्थाच्या भिंती तू पाड! मी तुझ्या हृदयात सरळ-सरळ प्रवेश करीन. तू मला साडेसोळा रुपये दे! पाच अंत:करणे, दहा इंद्रिये, अहंकार व अर्धी माया हेच ते साडेसोळा रुपये होय!

**नाना :** बाबा, गुरुशरणता म्हणजे काय?

**बाबा :** नाना, मन, बुद्धी, शरीर आणि अहंकार हे गुरूचरणी समर्पण करणे हीच शरणागती होय! हीच परमभक्ती आहे. गुरु व परमेश्वर यांच्या चरणी सर्वस्व समर्पण केल्यावर स्वत: प्रभू हृदयाच्या रथाचे सारथ्य स्वीकारून देह व आत्म्याच्या अश्वांना मोक्षाच्या गावाकडे नेतात व आनंदाच्या तुषारांत स्नान करतात.

(बाबांचे मिताक्षरी, पण अर्थपूर्ण शब्द म्हणजे ज्ञानाचे भांडार असत. बाबा गीतेचा खरा अर्थ सांगू शकत, कारण ते गीता सांगणारे भगवंतच होते. अर्जुनाच्या रथावर बसणारे भगवान श्रीकृष्ण, तसेच आमच्या हृदयाच्या रथाचे सारथ्य करून आम्हाला भक्तीच्या, ज्ञानाच्या, समर्पण-शरणागतीच्या, सामीप्यापासून सायुज्यमुक्तीच्या वाटेने नेणारे श्री साईकृष्ण, श्याममोहन श्रीहरी साईबाबाच होय!)

---

**श्री.** नानासाहेब चांदोरकरांचे बाबांच्या भक्तपरिवारातील पदार्पण म्हणजे ज्ञानी, अधिकारी, सुप्रतिष्ठित समाजाचा शिरडी कुटुंबातील समावेश होता. यापूर्वीचे भक्त हे गावातील खेडूत, जानपद मंडळीतील निर्व्याज, निरागस घटक होते. मधूनमधून गंगागीर, रामानंद बीडकर, आनंदनाथ यांच्यासारख्या सत्पुरुषांचीही शिरडीस हजेरी लागली होती. पण या ज्ञानीजनांचे आगमन अगदी अपवादात्मकच असे. चांदोरकरांपूर्वी आलेल्या नानासाहेब डेंगळे, गोपाळराव गुंड, अब्दुल्लासारख्या व्यवहारी व भक्तजनांचा संपर्क हा १८८० नंतरचा होय! सत्पुरुषांनी बाबांचे दिव्यत्व खेडूतमंडळीस पटवून दिले, ते १८७५ ते १८८५ या काळात. त्यानंतरच्या या डेंगळे, गाडगीळ, गुंड यांसारख्या शासकीय व्यवहारातील मानवंतांनी श्रद्धेबरोबरच बाबांच्या दैवीस्वरूपाची प्रेमचिकित्सा करण्याचे बौद्धिक पातळीवरचे चिंतन सुरू केले. १८९२ नंतर चांदोरकर, गणूदासांनी बाबांच्या विभूतीमत्वाचा अधिक सखोल अभ्यास व प्रचार जाणीवपूर्वक सुरू केला. ही भावनिक व बौद्धिक जागृती १८८० ते १९०५ पर्यंतच्या काळात घडली व त्यामुळेच १९०५ नंतर साईभक्तीचा महा-प्रवाह महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या चतु:सीमेबाहेर वेगाने वाहू लागला. नानासाहेब चांदोरकरांच्याआधी निदान एक दशक तरी शिरडीच्या प्रभावलयात आलेले नानासाहेब व बाबासाहेब हे डेंगळे बंधु फारच श्रद्धावान व भक्तिमान होते. त्यांच्यापुढे बाबांनी आपले दिव्यस्वरूप एकदा प्रगट केले होते– ते सनातन पुरुष

श्री शेषशायी श्रीहरीचे होते.

## मनमोहन हा साई द्वारकाविहारी

(काळ: १८९३ स्थळ: द्वारकामाईत नानासाहेब डेंगळे व बंधु इतर भक्तांसमवेत)

**नानासाहेब डेंगळे:** ती पहा श्री बाबांची दैदीप्यमान ध्यानमुद्रा! जसेकाही द्वारकाधीश श्री नारायण श्रीहरीच आहेत. म्हणूनच आपल्या निवासाला ते द्वारकामाई संबोधीत असतात.

**नानासाहेब: "हा मुकुंद, हा माधव। हा अनंत, हा केशव। हा सुरेश, श्रीनिवास हा हरी मुरारी।"**

**एक भक्त:** नाना, तुम्ही खरेच काव्य बोलत आहात. किती सुंदर वर्णन आहे!

**बाबासाहेब:** नाना, नीमगावच्या शिवाच्या ओढ्याजवळ बाबांनी मला प्रत्यक्ष आपले सनातन विष्णूस्वरूप दाखविले–

**"मकर कुंडले कानी।**
**किरिट हिरण्मय मूर्ध्नी।**
**कमलनयन श्यामवदन इंदिराविहारी॥**

–श्री साईगीतायन

**नानासाहेब: "वैजयन्ति माला उरी। कमला श्रीचरण चुरी। लांछन श्रीवत्साचे। मिरवी युगे चारी॥"** –श्री साईगीतायन

जणू बाबा म्हणजे भक्तांच्या हृदयरूप द्वारकेत नांदणारे, प्रेमदंडधारी असे अनभिषिक्त राजेच आहेत!

**बाबासाहेब:** बाबांनी आमच्यासाठी पुराणपुरूष श्री विष्णूचे सनातन रूप दाखविले, हे सत्य असले, तरी ते ब्रह्मा, विष्णू, महेशाचे कोणतेही रूप दाखवू शकतात.

**एक भक्त:** कुणाला बाबा श्री रामाच्या रूपात दिसतात, तर कुणाला श्री शिवाच्याही!

**नानासाहेब:** सर्व रूपांचा एकमेव आधार असे श्री बाबांचे मूळ रूप ते त्रैमूर्ती, श्री गुरूदेव अशा सर्वेश्वरांचे आहे. म्हणूनच ते भक्तांच्या भावनेनुसार प्रगट होतात. (बाबा ध्यानमुद्रेतून जागृत होतात. डेंगळे बंधुंकडे सस्मित सुहास्यवदनाने पहातात.)

**बाबा:** नाना, बाबा! तुम्ही काय भगवंताच्या रूपाचा पंचनामा चालविला आहे!

**नानासाहेब:** (नम्रपणे) माफ करा! बाबा, आम्हा अज्ञानीजनांना आपल्या अल्पमतीप्रमाणे विचार करण्याची सवय असते; आणि आपण आपली निरनिराळी लीलारूपे दाखवून अचंबित करीत असता.

**बाबा:** अरे, ज्याची जशी श्रद्धा असते तसा त्याला प्रभू दिसत असतो. मूळात भगवंताला काही रूप वा नाम नाही. ती एक विश्वाला चालविणारी महासत्ता आहे, महाशक्ती आहे, महातत्व आहे. ज्ञानी आणि साक्षात्कारी पुरूषांना याचा अनुभव पदोपदी येत असतो.

**बाबासाहेब:** बाबा, आम्हा सामान्यजनांनाही आपण आपला सगुण दर्शनाचा अनुभव देऊन केवढी कृपा करता! निर्गुण तत्व, सत्ता वा शक्ती यांचे आकलन करण्याचे सामर्थ्य वा जाण आम्हाला नाही. आम्ही आपल्या दिव्यदर्शनानेच धन्य होतो. हा आनंद आम्हाला सदैव लाभू द्या!

**बाबा:** अल्ला मालिक आहे! जा, घरी परता! ही उदी घ्या! तुमचे कल्याण होईल! (बाबा मस्तकास उदी लावतात. भक्त मशिदीबाहेर पडतात.)

## उदीचा संदेश

**एक भक्त:** श्री बाबांनी माझ्या कपाळाला उदीचा स्पर्श केल्याबरोबर मनाला केवढा आनंद आणि समाधान वाटते आहे! जणू बाबांच्या आशीर्वादाची छायाच या विभूतीबरोबर आमच्यासोबत चालते आहे.

**नानासाहेब:** बाबांच्या स्पर्शाने मनातील साध्या चिंतांची, शंकांची किल्मिषे पार धुवून निघाली आहेत. मन प्रसन्न व उल्हसित झाले आहे.

**बाबासाहेब:** धुनीमाईतील ही विभूती म्हणजे एक अमृतसंजीवनीच आहे.

**एक भक्त:** पण या अखंड जळणाऱ्या धुनीतील रक्षा ही मंगल सुचविते का अमंगल?

**दुसरा भक्त:** ही धुनी जीवनातील राखेत रूपांतर करणारी अंतिम अवस्था दाखविते.

**नानासाहेब:** मी काव्याच्या भाषेत म्हणेन:

**"राख पसाभर नरदेहाची**
**नश्वर दाराधन!**
**धुनी ही सांगे रात्रंदीन...."**

–श्री साईगीतायन

**बाबासाहेब:** या नश्वर संसारातही एक दिव्य प्रकाश असतो. तो अमरत्वाचा असतो.

**"मरणामधल्या अमरपणाचे ज्योतिर्मय दर्शन,**
**उदी ही घ्या भाळा चर्चून!"**

–श्री साईगीतायन

**एक भक्त:** आयुष्य हे क्षणभंगुर आहे, असे धुनी सांगते.

**दुसरा भक्त:** पण उदी सांगते की या क्षणजीवी आयुष्यातही आत्मा अमर आहे. बाबा मरणाधीन आयुष्यात आत्म्याच्या अमरतेचा संदेश या उदीच्या रूपाने जगाला देत असतात.

**नानासाहेब:** अगदी बरोबर! उदी ही एक प्रतीक आहे. आसक्त जीवांना ती अंतिम गति दाखवते. तर मुमुक्षूजनांना ती मृत्युंजय जीवन दाखविते.

**बाबासाहेब:** आर्त दुःखीजनांना ती प्रसाद आहे. रूग्णांना रामबाण औषध आहे.

**एक भक्त:** ते आमच्या श्रीहरी साईंनी बांधलेले रक्षाबंधनच आहे.

**नानासाहेब:** अगदी योग्य बोललात. मी कवितेच्या भाषेत म्हणेन:

**"मशिदमाईची ही माया**
**मालिक अल्लाची ही किमया**
**फकीरप्रभूची दिव्यता दया**
**वैकुंठीच्या प्रेममयाचे हे प्रीतिबंधन॥"**

–श्री साईगीतायन

**बाबासाहेब:** बाबा पूर्वी आजारी भक्तांना औषधे देत असत. माझ्या डोळ्यात बिब्बा घालून त्यांनी माझे दुखणे बरे केले. माधवरावांचे डोळे त्यांनी मिऱ्याच्या

उपचारांनी ठीक केले. पण पुढे बाबांनी औषधे देण्याचे थांबविले आणि श्रीहरीचे नामस्मरण करीत उदी देऊन रोग आणि दु:खे यांच्यावर उपचार केले.

**एक भक्त :** होय, बाबा सांगतच असतात की ''श्रीहरी.... श्रीहरी म्हणत मी उदी देऊ लागलो. मला श्रीहरी भेटला व दु:खी जीवांना दिलासा मिळाला.''

(सर्वजण मार्गस्थ होतात.)


बाबांचे दिव्य गुरूस्वरूप हे सर्वस्पर्शी, सर्वदर्शी, सर्वशक्तिमान अशा विश्वात्मक सर्वेश्वराचे होते. त्याच्या हातून प्रसादरूपाने वाटली जाणारी विभूती ही एक अमृताची वल्लरी होती. याचे विवेचन मागील प्रसंगात झालेले आहे. मशिदीत बाबांच्या भेटीस येणारे भक्त बाबांचे सूचक, मिताक्षरी, अर्थपूर्ण शब्द ऐकून स्तिमित होत, तर त्यांच्या चमत्कारिक विरोधाभासांनी भरलेल्या व्यक्तित्व व वर्तनाने अचंबित होत असत. बाबा एका जागेवर बसत, पण विश्वावर साम्राज्य गाजवीत. ते फाटके-तुटके नेसत, तरटावर बसत, घरोघर भिक्षा मागत, पण साक्षात् लक्ष्मी त्यांच्या पायाची दासी होती. ते दक्षिणा मागत, पण स्वत: वैराग्याची मूर्ती होते. ते व्याख्याने, प्रवचने झोडीत नसत, पण त्यांच्या प्रत्येक कृतीत आणि उक्तीत साक्षात् वेदांत ओतप्रोत भरून वाहत असे. ते रूद्रावतार धारण करीत, पण स्वत: शांतिब्रह्मस्वरूप असत. दक्षिणा व भिक्षा यातील कणही ते स्वत:साठी ठेवीत नसत. कावळे कुत्रेही त्यांच्या भिक्षान्नास स्पर्श करीत. उरले-सुरलेले बाबा खात असत. मशिदीत बाबांनी मंदिरासारखी घंटा बांधली होती. धुनीत अग्निपूजकासारखी अखंड ज्वाला बाबांनी चेतवून ठेवलेली असे. येथे येणारा भक्त या विरोधाभासांनी चकित होऊन गुणगुणत असे –

**ही न मशिद, ना मंदिर**<br>**घुमत नित्य घंटा-स्वर**<br>**धगधगते धुनी समोर**<br>**सर्वधर्मसंमीलन पंथ हा कबीर।**<br>**स्मित मोहक विष्णूचे**<br>**ज्ञानसत्त्व ब्रह्माचे**<br>**कधि तांडव रुद्राचे**<br>**अमृत तुझ्या भक्तास्तव**<br>**प्राशिसी विखार।**

–श्री साईगीतायन

(बाबासाहेब आणि नानासाहेब चांदोरकर व नंतर दासगणू यांच्या आगमनाचा हा काळ श्री साईजीवनकथेतील एक सुवर्णमोलाचा काळ होता. या काळात बाबांचा नवा बुद्धिमंत व विवेकी असा सुशिक्षित भक्तवर्ग घडत होता, विस्तारत होता व नव्याने उदयास येत होता. श्यामा, अब्दुल्लासारखे बाबांचे निकटवर्ती सख्यभक्तही आपल्या अस्तित्वाने व भावभक्तीने भक्तसमाजाचा परिसर सुगंधित करीत होते. नवनवे आर्त, जिज्ञासू, ज्ञानी भक्त हळूहळू शिरडीकडे वळू लागले होते.)

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



'श्री साईलीला'च्या वाचकांना स्मरतच असेल की **संमेलन विशेषांकात** 'जे न बोलायचे....' या सदरात 'बाबांची शिकवण' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले होते की.... आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. पण शिवाजी पार्कवर ज्या पादुकांचे आगमन होणार आहे त्या पादुकांच्या प्रतिमा नसून साक्षात् श्री साईबाबांनी वापरलेली ती प्रत्यक्ष पवित्र पादत्राणं आहेत....

आता श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

'साईबाबा-भक्त-निवास' या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा २ सभागृहांची योजना असून या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल. लवकरच ही इमारत भाविकांना निवासाकरिता उपलब्ध होणार आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिर-परिसराच्या नूतनीकरणाची योजनाही हाती घेण्यात येत आहे. या नूतनीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी, इंग्रजी माध्यमाची शाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ, कामात सूसूत्रीपणा आदी योजनांना दृश्यरूप दिले असून मंदिर-परिसराचा विकास, रुग्णालयाचा विस्तार, 'साईबाबा-भक्त-निवास' आदी योजनाही अल्पावधीतच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थान वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता 'देणगी दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

कार्यकारी अधिकारी,<br>
श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव,<br>
जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावाने पाठवावेत.

---


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे. चेक कृपया 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,
**– अरुण ताम्हणकर**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

------------------✂------------------ इथे कापा ------------------✂------------------

कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला',**
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________________

______________________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरूपाच्या देणग्या स्वीकारण्यात येत आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे :

'साईबाबा-भक्त-निवास' या इमारतीचे बांधकाम जोरात चालू असून रु. ५०,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रुग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,०००/- देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,०००/- अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

'श्री साईलीला'चे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४-बी, खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई–४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डर, पत्रं मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावी. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थान' आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे जेथे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

मनिऑर्डर किंवा पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

'श्री साईलीला'संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना 'श्री साईलीला'च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या 'श्री साईलीला' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

### प्रकाशित फोटोंची यादी

| क्र. | फोटोचे नाव | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२५ |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | ४'' x ५'' | ०.२५ |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.१० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२५ |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.२० |
| ६. | द्वारकामाई (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.२० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.१० |
| ९. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.४० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| १२. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६० |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.६५ |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ७.०० आहे.

**पुस्तके आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४.


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवंनमंजरी | इंग्रजी | २.०० | ७.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |




Registered with the Registrar
of News-papers for India
No. MH/527



मे-जून १९९३ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी, लायन्स क्लब, मुंबई व जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या संयुक्त सहकार्याने मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर





श्री साईबाबांची पूजा-अर्चना करून शिबिराचे उद्घाटन करताना माननीय विश्वस्त व 'श्री साईनाथ' रुग्णालय समितीचे उपाध्यक्ष श्री. भीमाशंकर खांबेकर व त्यांच्या सोबत डावीकडून 'श्री साईनाथ' रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील, लायन्स क्लब, मुंबईचे डॉ. शिवलकर, माननीय विश्वस्त श्री. गोपीनाथ कोते पाटील, माननीय विश्वस्त श्री. बाबा नरोडे, 'श्री' साईनाथ' रुग्णालयाचे डॉ. देशमुख, माननीय विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके दिसत आहेत.

शिबिर यशस्वीरीत्या संपन्न होण्यासाठी श्री साईबाबांची प्रार्थना करताना डावीकडून लायन्स क्लब, मुंबईचे डॉ. शिवलकर, माननीय विश्वस्त श्री. गोपीनाथ कोते पाटील, माननीय विश्वस्त श्री. बाबा नरोडे, माननीय विश्वस्त श्री. भीमाशंकर खांबेकर, माननीय विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके दिसत आहेत.





महाराष्ट्राचे माननीय वित्त व नियोजन मंत्री श्री. रामराव आदिक शिबिराच्या व्यवस्थेची पाहणी करीत असून त्यांच्या सोबत संस्थानच्या माननीय अध्यक्षा व 'श्री साईलीला'च्या संपादक प्रा. डॉ. लेखा पाठक, माननीय विश्वस्त श्री. पी. बी. बोरावके, माननीय विश्वस्त श्री. भीमाशंकर खांबेकर, माननीय विश्वस्त श्री. मोतीराम पवार दिसत आहेत.

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७३ अंक २-३

मे–जून ९३

संपादक
**प्रा. डॉ. लेखा पाठक**

कार्यकारी संपादक
**अरूण ताम्हणकर**

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

**कार्यालय**
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी– रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी– रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी– रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक– रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

# अकरा हनुमान

(मागील अंकावरून)

श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या वादात सामान्य माणूस गोंधळून जातो. त्याला बुद्धिभ्रम झाल्याचा अनुभव येऊ लागतो.

आपली दैवते, त्यांची रूपे, त्यांचे कार्य आणि त्यांच्या जन्मकथा विचारी माणसाला संभ्रमात टाकणाऱ्या आहेत.

वायुसूत हनुमान अथवा मारूती हे असेच एक दैवत आहे की त्याच्याविषयी अधिक विचार करू लागताच अनेक प्रश्न उभे राहतात.

हनुमान हा वानरयोनी आहे. तरीही तो बुद्धिमताम् वरिष्ठम्, मनोजवम्, मारूततुल्य वेगम् आणि जितेन्द्रीयम्ही आहे. ज्या देशात वानर एवढा महान असू शकतो त्या देशात आज माणसंसुद्धा वानरापेक्षा चंचल आणि भोळसट कशी जन्मू शकतात ?

असं नसेल तर आपण समजतोय तो 'वानरयुत मुख्यम्' हनुमान वेगळा असला पाहिजे. वाढता वाढता शून्यमंडळालाही भेदणारा हा हनुमान समजून घेण्यात आपण कुठेतरी चुकलो आहोत. जड पातळीवरील हनुमान व सुक्ष्मातील हनुमान यांच्यातील सांधा शास्त्रार्थींच्या अभावी तुटल्यामुळे दैवते समजून घेताना वैचारिक प्रदुषण निर्माण झाले आहे. या प्रदुषणातूनच श्रद्धा–अंधश्रद्धा–भक्ति असे भावूक शब्द जन्माला येऊन अवधान सुटले आहे. हे अवधान परत आणायचे असेल तर या वैचारिक प्रदुषणापासून दूर जाऊन समजाऊन घेण्याचा समजुतदारपणा वाढविला पाहिजे.

असाच समजुतदारपणा वाढवित असताना पंडित ग. रा. सावंतांना हनुमान कसा जाणवला ते पहा....

– कार्यकारी संपादक

लोह आणि परिस यांचें जें सन्निधान, तेंच तुझें हिरण्मय स्वरूप होय! लोहचुंबकाचें जें सन्निधान तेंच तुझें चंचल स्वरूप. कूर्मदृष्टीप्रमाणें परमात्माचें जें ईक्षण तेंच तुज कारणब्रह्माचे स्वरूप होय. राजा आणि त्याचें सैनिक यांच्यामधील प्रभावी जी राजाज्ञा तेंच तुज कारणेश्वराचें रूप.

हे रामसख्या, वाल्मीकीनें अगोदर तुझी कल्पना केली आणि मग राम किष्किंधेंत व सीता लंकेंत असें पुरूषप्रकृति–विद्योगाभासाचें कथानक रचलें म्हणून रामरक्षेचा कीलक तुला मानला आहे. ज्याप्रमाणें श्रुतिसिद्धांत हाच कारणब्रह्माचा पुरावा; त्याप्रमाणें वाल्मीकी हाच तुझा पुरावा. वाल्मीकींत तुझ्यासंबंधी वर्णनांत जो अतिशय दिसतो, तें कारणाचें तात्त्विक लक्षणच आहे. कार्य न्यून वृत्तीचें असतें, कारण व्यापक व अधिक वृत्तीचें असतें.
उद्यन्मार्तण्डकोटिप्रकटरूचियुतं
चारूवीरासनस्थं। इ.ह.उ.पू. ८

ज्ञान आणि कर्म हेंच कारणाचे स्वरूप दिसतें, व तेंच तुझेंहि योगस्वरूप आढळते. ज्ञाता आणि कर्ता असेंच तुझें रामायणांत वर्णन आहे. तूं मारूततुल्य वेगवान व बुद्धिमंतांत वरिष्ठ, असें जें तुझें प्रसिद्ध स्तावक श्लोकात वर्णन आहे, त्यांतील रहस्य हेंच दिसतें. ज्ञान आणि कर्म यांचा विशेष उठाव दिसावा, म्हणूनच तुझ्या निमित्तमात्र शरीराचे ठिकाणीं पशुभाव अरोपीत केला आहे. तूं साक्षात् वेदमूर्ति आहेस. तुझ्या रूप–गुणांकडे पाहिलें कीं तूं सदसद्रूप वाटतोस. तुझ्या वानरप्रकृतीहून तूं निःसंशय श्रेठ आहेस. कारण शरीराला अज्ञानी अगर सज्ञानी कांहींच धड म्हणतां येत नाहीं,

तसा तूं प्रज्ञानघन आहेस. तुझें कंदर्पकोटिलावण्य उपासक वर्णितात, तें तुझें वानररूपाचें वर्णन नसून कारणशरीराचेंच असलें पाहिजे. कारण शरीराचेंच सौंदर्य अप्रतिम असतें. असें शास्त्रज्ञ सांगतात.

हे चिरंजीवा! काल हेंच जगताचें कारण आहे आणि तेंच तुझें चिरंजीव जीवन आहे. तुझ्या बृहत्काय वर्णनांत अमर्याद अशा देशाचाच लक्षणेनें निर्देश केला आहे. सीता (प्रकृति) शुद्धि हें रामकार्य आणि त्यांचे तूं कारण असा तुझ्या ठिकाणीं कार्यकारणभाव स्पष्ट दिसतो आहे. याप्रमाणें दिक्काल आणि कार्यकरणभाव यांचा समुच्चय तुझ्या ठिकाणीं निर्दिष्ट असल्यामुळें तुलाच मी कारणब्रह्म असें म्हणतों. जे बृहत् म्हणजे मोठें, ते ब्रह्म आणि त्यांतहि जें मोठ्यांत मोठें ते कारणब्रह्म. असा हा तुझ्या मोठेपणाचा अतिशयच तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत वर्णिला आहे, व तसाच तो वाल्मीकीनेंहि दर्शविला आहे.

**सहस्त्रमूर्धा सहस्त्रास्य: सहस्त्राक्ष: सहस्त्रपात् ॥८१॥** असें तुझें सहस्त्रनामस्तोत्र अनेक सहस्त्रकांनीं समन्वित आहे.

हे विराट् पुरुषा! तुझ्या सहस्त्रनामावरून तूं सामान्य नराप्रमाणें किंवा वानराप्रमाणें नसून पुरुषसूक्तांत वर्णिल्याप्रमाणें तुझें स्वरूप व्यापक आणि विशाल आहे असें दिसतें. भगवान् श्रीकृष्णानें आपलें विराट्रूपदर्शन अर्जुनास दाखविलें तसें दुसऱ्याहि उपास्य देवतांनी आपआपलें विराट्स्वरूप आपापल्या भक्तांस दाखविल्याचे कथाभाग वाचनांत येतात. तोच प्रकार तुझ्या सहस्त्रनामांत दिसून येतो. तुझ्या अनेक विभूतींचा संग्रह तुझ्या या सहस्त्रनामांत आहे.

मानवाच्या पिण्डांत अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय, असें अनेक कोश आहेत. त्या त्या कोशांच्या सापेक्ष असें तुझेंहि घन, तरल, विरल, इत्यादि प्रकारचें विराट् स्वरूप असलें पाहिजे. सृष्टीच्या उत्पत्ति कथनांत जे जे कांहीं बृहत् म्हणून वर्णिलें आहे, तें सर्व तुझेंच रूप आहे.

अग्नि-प्राण-वाङ्मय या वर्गीकरणांत येणारें जें जें कांहीं गंभीर आणि मोठें असेल, तें सारे तुझेंच स्वरूप आहे. पंचमहाभूतें, दिक् आणि काल हीं सारीं तुझ्याच महोदरांत सामावतात.

हे हनुमंता! तुझें शेपूट इतकें वाढतें कीं, ते मोजून मोजतां येत नाहीं, व संपता संपत नाहीं, असें म्हणतात. यांचे कारण तें अनंत आहे. तीच तुझी प्रतिष्ठा आहे, तोच तुझा महिमा आहे.

## लांगूलिन्

**पार्थध्वजो वायुपुत्रोऽमितपुच्छोऽमितप्रभ:। ब्रह्मपुच्छ: परब्रह्म पुच्छरामेष्ट एव च ॥३०॥**

हे महावीरा! हे लांगूलिन्! असें हें तुझें स्तोत्र आहे. भारती युद्धांत पार्थाच्या रथावर ध्वजरूप जो तूं होतास, तो ध्वज म्हणजे अमितबल होय. रसबलात्मक परमेशाची बल ही शक्ति आहे. शबलरूप पताका आहे. पुच्छप्राण हा पाशवी शक्तीचा आधार आहे. जलचर, मत्स्य, खेचर, खग, भूगर्भचर नाग आणि वनेचर वानर यांची शक्ति, त्यांच्या पुच्छांत असते.

हे हनुमंता! शिवानें जेव्हां तुझ्या रूपांत अवतार घ्यावयाचे ठरविलें, त्यावेळीं त्याची शक्ति उमा हिनेंहि शिवासह तुझ्या लांगूलरूपांत अवतरावें असें ठरविलें, असें तुझे भक्त वर्णन करितात.

तुझ्या पुच्छाचें सामर्थ्य कवींनीं परोपरींनीं वर्णिलें आहे. विश्वामित्राचा अपमान केल्यामुळें दुष्यंतास सूर्यास्ताचे आंत ठार मारीन अशी साक्षात् रामाने प्रतिज्ञा केली असतां तूं त्याला आपल्या पुच्छाच्या आवरणांत सुरक्षित ठेवलेंस. तेथें रामाचा पराक्रमहि व्यर्थ ठरला. अशी तुझी पुच्छलीला अतर्क्य आहे.

हे हनुमंता! तुझ्या अंजनामातेच्या सामर्थ्याचें वर्णन करतांना श्रीसमर्थ म्हणतात कीं,-

**''वेणीदंड परताळिला। लंकेलागीं वेढा दिधला।**
**आणूनि रामासी दाखवि अंजनीमाते''॥**

या तुझ्या आईच्या वेणीदंडांपेक्षांहि तुझ्या लांगूलांचें वर्णन फारच आश्चर्यकारक आढळतें. एकनाथ तुझ्या पुच्छाचें वर्णन करतांना म्हणतात कीं,

**''हनुमान वीर जगजेठी। लंका नागविली पुच्छासाठीं।**
**शिणतां राक्षस कोटचनुकोटी। पुच्छा शेवटीं वेष्टवेना''॥**

तूझ्या पुच्छानेंच तूं राक्षसांना मारलेंस, या तुझ्या पुच्छानेंच लंकेचा नाश केला. भीमाला तुझे पुच्छ उल्लंघन करणें अशक्य झालें. कवींनीं तुझी सारी प्रतिष्ठा तुझ्या पुच्छाचे ठिकाणींच वर्णिली आहे.

पुच्छप्राणाचा विकास ज्यांच्या मेंदूंत म्हणजे ज्ञानांत झाला, त्या मानवांचे मात्र पुच्छ नाहींसें झालें. यामुळें पुच्छ हें अज्ञानदर्शक मानूं लागले. हीच पुच्छाची माया आहे.

हे वायुनंदना! मस्तिष्कांतील ज्ञानकंदांतून बाहेर पडलेला व तुझ्या आईचा कृष्णवर्णाचा वेणीदंड आणि त्याच कंदांतून निघालेल्या मेरूदंडांतून व अनुत्रिकास्थींतून बाहेर निघालेला तुझा लांगूल यांचें सुदीर्घत्व वर्णन करण्यांत कवीचा हेतु काय बरें असेल! ज्ञानाचे अधिष्ठानावर स्थिर असून स्थूलरूपत: त्यापासून दुरावलेलें तें अज्ञानच नव्हे काय?

हे हनुमंता! लांगूलिन् हें तुझें एक शबलरूपच आहे असें मला वाटतें. निर्गुणाचें सगुण हें एक अनंत पुच्छ आहे, अशी मी कल्पना करतों. किंवा याहीपेक्षां ज्ञाताचें अज्ञात हें एक सुदीर्घ पुच्छ आहे, असें मी मानतों.

या विश्वांत आम्हांला ज्ञात असलेला अंश अत्यल्प आहे. उलट अज्ञात भाग अनंत आहे. अमर्याद आहे. तेंच ज्ञान पदार्थांचे मागें असलेलें अज्ञातरूप पुच्छ होय, असें मला वाटतें.

त्रिपुटीच्या ज्ञानांचे माप करतां येतें. त्याच्या इयत्ता पडतात. अज्ञानाचें माप करतां येत नाही. ते किती आहे ह्यांचे माप आजवर कोणीं केलें नाहीं व पुढेंहि कधीं करतां येण्यासारखें नाहीं.

अज्ञान हाच सगुणाचा आधार आहे.

तोच लांगूलपाश आहे. अज्ञानाच्या नाशांत सगुणाचा लय आहे. म्हणूनच हे मारूते! रावणानें तुला तुझें मरण कशांत आहे हें विचारलें. तेव्हां तूं शपथपूर्वक सत्य तेंच सांगितलेंस व माझें मरण माझ्या पुच्छाच्या समूल नाशांत आहे. असें तूं म्हणालास. रावणानेंहि विचार केला कीं, या अजाण वानरांना त्यांचें लांगूलरूप अज्ञानच जास्त प्रिय असतें, यास्तव तेंच पेटवून द्यावें. तेव्हां तूं मनांत म्हणालास कीं, यावेळीं रावणाचे जिव्हाग्रीं कधीं न येणारी सरस्वतीच अधिष्ठित झाली.

या सर्वांचा अर्थ मी इतकाच समजतों कीं, अज्ञानरूप लांगूलाचा समूळ नाश केल्यास त्यांत तुझें विग्रहरूपही लय पावेल, हें खरेंच. पण तुझें अज्ञानरूप अथवा अध्यारोपरूप लांगूल अनंत आहे. तें सामान्य अग्नीनें जाळूं म्हटल्यास ते समग्र जाळतां येणें अशक्य आहे. जगांतील सर्व अनात्मपदार्थांचा नाश करून अज्ञानाचा नाश सांधण्यासारखें हें कृत्य अशक्य आहे.

हे हनुमंता! शबल ब्रह्माच्या अमर्यादपणाचा विचार करतां इंद्रियवेध आणि मनोवेध पदार्थांची कल्पना करून पुरेसें होत नाहीं. कारण मनोवेधाहून मनास अज्ञात असें शबल रूप केवढें व कसें असेल हे कोण सांगेल? ते देवांसहि सांगता येणार नाहीं.

हे वायुनंदना! या अनंत आकाशांत या असंख्य खगोलांचे भ्रमणगतीचे मार्ग त्यांच्या गतीचा माग कोठवर गेला आहे, तें कोण सांगेल? त्यांचा जो माग अथवा सांखळी, तेंच त्यांचें पुच्छ आहे. पदार्थापेक्षां पदार्थाची छाया जशी दूरवर पसरते, त्याप्रमाणें या अंतराळीं भ्रमण करणाऱ्या असंख्य फिरत्या ग्रहांचें मागील छायापुच्छ कोणास कसें मापतां येईल! सूर्य दिसतो, पण सूर्याचें किरण नाहीसें होत होत कोठपर्यंत जातात, तें कसें मापावें? मीं तोंडानें शब्द उच्चारला तो मींहि ऐकला. पण तो चिरंजीव शब्द ध्वनिरूपानें या विश्वाच्या पोकळींत अस्पष्ट होत होत कोठवर गेला, तें कोणीं सांगावें? वस्तूची भावरूपता प्रत्यक्ष असली तरी तिच्या अभावाचें कालमापन कसें करतां येईल! वस्तू अज्ञानत: ज्ञात कधींपासून होतीं, हें कोणीं सांगावें! तात्पर्य, इच्छा, ज्ञान, क्रिया अशा त्रिगुणात्मक विश्वाचें संस्कार, अज्ञान व प्रतिक्रिया किंवा मागरूप लांगूल किती लांब आहे, ह्याचें कोण वर्णन करील?

शिवलिंगाचें खालचें वरचें टोंक साक्षात् ब्रह्मा-विष्णूसहि शोधून सांपडलें नाहीं. अशी एक कथा आहे. शेष अथवा लांगूल हें अज्ञानलिंग आहे. अथवा ज्ञानलिंगास आच्छादणारी ती माया आहे. ती अचिंत्य व अतर्क्य आहे. तुझें लिंग तुझ्या मानेशिवाय सर्वांस अज्ञात होतें. असें पुरूषांतरी वर्णन आहे. त्यांतील भाव हाच असावा. सारांश, हें प्रतापी लांगूल केवळ अनिर्वचनीय आहे!

## मध्यस्थ महापुरूष

हे हनुमंता! विश्वाचा विस्तार हाच महामध्यस्थ पुरूष आहे. द्रष्ट्यापासून दृश्याच्या अंतिम सीमेपर्यंत हा एवढा मध्यस्थ पुरूषच उभा आहे. अज्ञानापासून विज्ञानापर्यंत हा महामध्यस्थ ज्ञानपुरूषच दिसत आहे.

आम्हां पृथ्वीवरील लोकांच्या दृष्टीचा टप्पा स्वर्गापर्यंत आहे. पृथ्वी व स्वर्ग यांच्यामध्यें अंतरिक्ष आहे. तेथील प्रधानदेवता मरूत ही आहे.

हे मारूते! मरूत् तोच तूं. तुलाच मरूत् म्हणतात. तुझे पाय या पृथ्वीला लागले असून येथून सूर्य, सोम, ज्योतिर्गण, ग्रह, सप्तर्षिमंडळ व ध्रुव येथपर्यंत वाढत वाढत तूं उंच होत गेला आहेस. याप्रमाणें पृथ्वी आणि स्वर्ग यांमध्ये तूं उभा आहेस.

हे विराट् पुरूषा, नवग्रहांपैकीं एकेकच ग्रह काय, पण साऱ्या सूर्यमानांहून तूं मोठा आहेस. मानव आणि देव यांच्या दरम्यान तूं अमानव मध्यस्थ आहेस. एकुणपन्नास मरूद्गण हेच तुझे अवयव होत. अज्ञान आणि विज्ञान यांचेमधील ज्ञानरूप मध्यस्थ तूंच आहेस.

हे हनुमंता! ''एका मूर्तिस्त्रयोदेवा ब्रह्म-विष्णू-महेश्वरा.'' असें शास्त्रवचन आहे. तदनरूप गति-आगति-स्थितिरूप हे तिन्ही देव तुझ्या ठिकाणींच मी मानतों.

हे सारे विश्व यज्ञस्वरूप आहे. प्रत्येक पदार्थाचा क्षय, नवीन पदार्थाचा पुरवठा व त्यांची पुन्हा आहुती असें हें यज्ञचक्र चालूच आहे. अग्नींत सोमाची आहुति, याला यज्ञ म्हणतात. आणि ''अग्नीयोमात्मकं जगत्'' असें या यज्ञाचें स्वरूप आहे. या अग्नीचे अग्नि, वायु आणि आदित्य असें तीन प्रकार असून सोमाचेहि आप, वायु आणि सोम असें तीन प्रकार मानतात. या दोहोंत वायु हा समान आहे. तोच अग्नि आहे, तोच हवि आहे. हे मारूते! तूं राक्षसांचा हवि घेणारा आहेस, व रामसेवेंत आपले बलिदान करण्यास सिद्ध आहेस याप्रमाणें तूं पशुपति आहेस आणि पशूहि आहेस. असें हें तुझें उभयविध यज्ञस्वरूप फारच गंभीर व उपकारक आहे.

आदिति ही धावापृथ्वीरूप आहे. पृथ्वी आणि स्वर्ग यांच्यामधील जी विराट् पुरूषाची उदरगुहा. तीच आदिति. तेंच तुझें जन्मस्थान आहे. तीच तुझी अंजना होय. हे हनुमंता! साऱ्या दृश्य मनोवेधाचा प्रांत तूच व्यापला आहेस. ज्ञेय तूं आणि ज्ञानहि तूंच आहेस. तुझ्यावांचून जेय आणि ज्ञान कांहींच उरत नाहीं. नवयोगीन्द्रांपैकीं कवींनीं जनकाला हेंच सांगितलें. कवि म्हणाले:

**खं वायुमग्निं सलिलं महींच ज्योतींषि सर्वानि दिशोद्रुमाद्रनि।**
**सरित्समुद्रांश्च हरे: शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्य:॥**

या धारणेतला जो हरि, तो तत्त्वत: तूंच, असें मी मानतो. जगत ईशधीयुक्त सेवनम्। अष्टमूर्तिभृदेव पूजनम्॥५॥ असें मी रमणमहर्षीचें उपदेशसार आहे.

हे मारूते! मनाची लांबी-रूंदी जशी सांगता येत नाहीं. तशी तुझी उंचीच जाडी कांहींच साधतां येत नाहीं. पदार्थज्ञानांत मनच पदार्थाचें रूप धारण करतें. व मनच मनाचें विषय होतें. मनावांचून मनांत अन्य कांहींच येत नाहीं. समुद्राच्या पोटांत बर्फाचे खडक असावेत, त्याप्रमाणें ज्ञानसागर तूं व अंतरींचा ज्ञेयही तूंच, महाकाय तूं आणि त्यांतील घटकांशही तूंच. जो हा महाप्राण अनेक प्राण्यांच्या रूपांत परिच्छिन्न झालासा वाटतो, तो महाप्राण तूंच.

हे अवतारी पुरूषा! आमच्या जाणिवेच्या जाळ्यांत जो सर्वांत मोठा देवमासा सांपडला, तो तूंच. हे आकाशसागरांतील

(पृष्ठ क्र. ५२ वर)

# श्रीसाईंचे सत्य चरित्र

## —अध्याय २६ वा—

गद्य भाष्य टीका–
**ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

**अपस्मार–आत्महत्या–निवारणं
तथा
निज–गुरु–पद–स्थिरी–करणे**

(दर्शनाला येणाऱ्या पितळ्यांच्या मुलाचा फेंफऱ्याचा रोग बरा करणे, पुण्याच्या आंबडेकरांचा आत्महत्येचा विचार मोडून काढणे आणि मुंबईच्या पंतांना त्यांच्या गुरूंच्या चरणी कायम करणे)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

हे पंचभूतांचे (भूतभौतिक) मन व इंद्रिये यांनी समजण्याजोग्या (गोचर) सर्व सजीव व निर्जीव पदार्थांच्या समुदायांचे (विषय+जात) हे जग (विश्व) आरशात पडलेल्या शहराच्या प्रतिबिंबाप्रमाणे (दर्पणीं नगरीसें प्रतिबिंबित) मायेचा (ईश्वराच्या मोह घालणाऱ्या शक्तीचा) घोटाळ्यात पाडणारा (मायिक) देखावा (विजृंभित) आहे. खरोखर पाहता (वस्तुगत्या) आत्मस्वरूपात ओविलेले (अनु+स्युत) हे विश्व उत्पन्न झालेले नसते (अनुद्भुत) तरीपण ते आत्मस्वरूपी स्थित असलेले सजीव व निर्जीव (चर व अचर) जग उत्पन्न झालेले (उद्भुत) भासते. जे जे काही आरशात दिसते ते वास्तविक तेथे नसते, जसे झोपेत मनाची प्रवृत्ती असेल त्याप्रमाणे (वासनामय निद्रेत) दृश्य दिसते, परंतु जागे झाल्यावर ते नाहीसे होते. (पहा, एकनाथी भागवत, अध्याय दुसरा : "**पुरुषासी जो प्रपंच दिसे। तो नसताचि मिथ्या आभासे। जेवी कां एकला निद्रावशें। स्वप्नीं निजमानसे जग कल्पी**"॥५०८॥) जागृतावस्था (मी देह नसून आत्मा आहे, अशा जाणीवेची स्थिती) प्राप्त झाली की स्वप्नात अनुभवलेला (उपलब्ध) संसार (प्रपंच) वितळून जातो व सद्गुरूकडून महावाक्याचा (तत्त्वमसि, ते म्हणजे ब्रह्म तूंच आहेस) उपदेश झाला की अभेद ज्ञानाच्या आनंदाचा (अद्वय+आनंद) प्रकाश प्रगट होतो. (पहा, अ. १०, ओ. ६७: **नियत गुरुशी होता सख्य। द्वैत जाऊनि होय ऐक्य। 'तत्त्वमसि' महावाक्य। तयाची साक्ष तो दावी॥**) जगाचे अस्तित्व प्रगट होण्याचे (सत्ता+स्फुरण) आणि कशावरही अवलंबून न राहणारे सत्ताकेंद्र (अन्यनिरपेक्ष अधिष्ठान) असा जो ईश्वरस्वरूप गुरुरूपी आत्मा (गुरू+आत्मा ईश्वर), तो जेव्हा प्रसन्न होतो तेव्हाच याची (वरील गोष्टीची) प्रचिती येते (तयींच साक्षात्करण हें). स्वयंप्रकाशित आणि सत्स्वरूप (सदात्मक) असे हे आत्म्याचे स्वरूप आहे व तेथे हा पंचमहाभूतांचा (भूतभौतिक) आणि मायाकौतुकाचा खेळ आहे. ब्रह्मापासून ते गवताच्या काडीपर्यंत (आ+ब्रह्म+स्तंब) विस्तारलेले हे पंचमहाभूतांचे जगत सर्व कल्पित (मनाने जुळविलेले किंवा गृहित धरलेले) असून केवळ मायेचा देखावा (माया+विजृंभित) आहे. त्याच्या खऱ्या स्वरूपाची जाण नसल्याने (स्वरूप+अज्ञानें) सुताच्या जाड दोरीला जसे साप (सर्प), फुलाची किंवा मण्याची माळा (माला), लाकडी सोटा (दंड) किंवा पाण्याचा प्रवाह (धारा) चुकीने समजतात, तसेच आत्म्याच्या यथार्थ ज्ञानाच्या अभावी आत्म्याच्या ठिकाणी हा जगाचा पसारा अस्तित्वात असल्याचे दिसते. ("स्वरूपीं थारा नाही या" याचा अर्थ स्वरूपी याची वाण किंवा तूट नाही, म्हणजे याचे अस्तित्व आहे, असा होतो.) गुरूच्या उपदेशाने जागृतीचा काळ (गुरु+वाक्य+प्रबोध+समय) आला म्हणजे तत्त्वज्ञानाने (परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानाने) या मायामय देखाव्याचा नाश होतो (दृश्य नासें). '**गृ**' या धातूचे तृतीय पुरुष एकवचनाच्या रूपाचा, म्हणजे '**गृणाति**' याचा (बोलतो किंवा उपदेश करतो हा) अर्थ मनात धरला तर शिष्याला तत्त्वज्ञानाचा (परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानाचा) उपदेश करण्याला गुरु हा एकच जगात समर्थ आहे, असे लक्षात

येईल. (**गुकारं च गुणातीतं रूकारं रूपवर्जितम्। गुणातीतस्वरूपं च यो दद्यात् स गुरूः स्मृतः॥** गुरुगीता, श्लो. ४६॥ '**गुरू**' या शब्दातील '**गु**' हे अक्षर गुणातीत स्वरूपाचे निदर्शक असून, '**रू**' हे अक्षर रूपातीत स्वरूपाचे निदर्शक आहे. गुण व रूप यांच्या पलीकडील म्हणजे निर्गुण व निराकार स्वरूप जो प्राप्त करून देतो किंवा साक्षात्कार घडवितो त्यालाच गुरू म्हणतात.) (ओ. १-१०)

म्हणून साईबाबांना विनंती करू या की आमची बुद्धी आत्मपरायण (अंतर+आसक्त), नित्य व अनित्य यांतील भेद जाणणारी (विवेक+युक्त) करून विषयसुखांचा त्याग करण्यात तत्पर झालेली (वैराग्य+रत) करा! मी तर सदा सारासार विचार नसलेला मूर्ख (अविवेकी मूढ), अविद्या (अज्ञान किंवा माया) रूपी अडथळ्यांनी झाकलेला (अविद्या+ व्यवधान+निगूढ) आणि सदासर्वदा मूर्खपणाच्या कल्पना करीत असणारा (कुतर्क+आरूढ) आहे. म्हणूनच मला हे कोडे (गूढ) पडले आहे. बाबा! गुरू व वेदांत यांच्या वचनांवर मी अढळ विश्वास (भरंवसा) ठेवीन असे करा, म्हणजे माझे मन आरशासारखे स्वच्छ होईल आणि त्यात आत्मज्ञानाच्या उपदेशाचा छाप स्पष्ट उमटेल (निज+बोध+ठसा प्रकटेल) (मनाला नीट कळेल). आणखी हे सद्गुरो साईसमर्था! या (कळलेल्या) ज्ञानाची यथार्थ सत्यता (खरेपणा) पटवून द्या (करवीं अनु+अर्थता)! कारण अनुभवाशिवायच्या तोंडाच्या बडबडीने (वाचा+विग्लापनता) परमार्थ कसा साधला जाईल! म्हणून बाबा आपल्या प्रभावाने हे ज्ञान प्रत्यक्ष शरीराने (अंगे) अनुभवायला मिळू द्या, म्हणजे सायुज्य मुक्ती (ज्यात जीवात्मा परमात्म्यात विलीन होऊन जातो) सहज प्राप्त होईल. कृपा करून मला हेच दान द्यावे. त्यासाठी देवा सद्गुरू साई! मी तुझ्या चरणी माझा देहाभिमान (देह+अहंता) अर्पण करतो. आता येथून तुझे तूच पहा! माझे मीपण माझ्याकडे नाही. माझा देहाभिमान घेऊन टाक, म्हणजे मला सुखदुःखाची जाणीव होणार नाही. तुझ्या इच्छेप्रमाणे कळसूत्र चालवून माझ्या मनाला बांध घाल (मत्+मन आवरीं) अथवा माझे जे मीपण ते तू स्वतःच होऊन सुखदुःखांचे भोगणे तूच घे! मला त्याची काळजी (विवंचन) नको. हे पूर्णकामा (ज्याच्या सर्व इच्छाआकांक्षा तृप्त झाल्या आहेत अशा) साईनाथा! तुझा जयजयकार असो! तुझ्याठिकाणी माझी भक्ती जडो! हे सर्व शुभ गोष्टींचं निवास-स्थान असलेल्या (मंगल+धामा) साईनाथा! माझे हे चंचल मन तुझ्या पायी शांत होवो (पावो उपरमा)! तुझ्यावाचून दुसरे कोण आम्हाला आमच्या हिताचे शब्द सांगेल आणि आमची दुःखे दूर करून मनाचे समाधान करेल! (ओ. ११-२०)

बाबा! शिरडीचे भाग्य म्हणून आपले येथे येणे (आगमन) झाले. पुढे तेथेच आपण वास्तव्य (राहणे) केले आणि त्या जागेला तीर्थयात्रेचे स्थान बनविले (क्षेत्रत्व आणिले). धन्य शिरडीचे पुण्य (सुकृत) की हा साई कृपावंत होऊन या जागेला आपल्या वास्तव्याने अलंकृत करून (शोभा देऊन) तिला भाग्यवंत करता झाला. हे साईनाथा! तूच मला प्रेरणा देणारा (चेतविता) आहेस. तूच माझ्या वाणीला गती देणारा (वाचा चाळिता) आहेस. तेव्हा तुझे गुण गाणारा मी कोण! सर्व कार्य करणारा आणि करविणारा (कर्ता-करविता) तूच एक आहेस. तुझा नित्य सहवास (समागम) हाच आमचा वेद-वेदांताचा अभ्यास (आगम-निगम) व तुझ्या चरित्राचे श्रवण (ऐकणे) हेच आमचे पोथ्या-पुराणांचे पारायण (विधिपूर्वक साद्यंत पठण) आहे. एकही क्षण वाया जाऊ न देता, म्हणजे एकसारखा (अनिमेष) तुझ्या नामाचा जप करणे (आवर्तन) हेच आमचे नित्याचे ध्यान (अनुसंधान) आहे आणि हेच आमचे समाधान (मनाची तृप्ती) आहे. ज्यामुळे ईश्वरभजनाला आम्ही पाठमोरे (विन्मुख) होऊ, असले सुख आम्हाला नको (ते आमच्या काय कामाचे!). त्यापेक्षा परमार्थाला बाधक असे अधःपतन (नरकात पडणे) ते कोणते असेल! आनंदाचे अश्रू हेच जणूकाय तापलेले गरम पाणी (उष्ण जीवन), त्याने तुझे पाय धुवू (चरणक्षालन), शुद्ध प्रेम जणूकाय चंदन, त्याने तुझ्या अंगाला उटी लावू आणि उत्तम प्रकारची श्रद्धा (सत्+श्रद्धा) हीच जणूकाय पांघरण्याचे वस्त्र (परिधान), ते तुझ्या अंगावर घालू. बाह्योपचाराच्या पूजेपेक्षा या मानसिक (अंतरंग) पूजाविधीनेच आम्ही तुला सुप्रसन्न आणि सुखसंपन्न करू. मन पूर्णपणे (अविकल) एकाग्र करून सात्त्विक अष्टभावरूपी (आठ प्रकारच्या शरीराच्या व मनाच्या अवस्था: घाम सुटणे, स्तब्ध होणे, अंगावर रोमांच उभे राहणे, आवाज बिघडणे, शरीराला कंप सुटणे, रंग पालटणे, डोळ्यांतून अश्रू वाहणे आणि शुद्ध हरपणे) आठ पाकळ्यांचे अति निर्मळ कमलपुष्प तुझ्या चरणी वाहू आणि त्याचे उत्तम फळ आम्ही प्राप्त करू. भोळी भक्ती किंवा श्रद्धा (भावार्थ) हीच जणूकाय बुक्का (अबीर, चंदन इत्यादी सुगंधी द्रव्यांचे काळ्या रंगाचे चूर्ण), तो तुझ्या कपाळाला (भाळी) लावू. दृढ भक्ती जणूकाय कमरबंध (मेखला), ती तुझ्या कमरेला बांधू आणि तुझ्या पायांच्या अंगठ्यावर गळा वाहून, म्हणजे सर्वस्वी शरण येऊन अलौकिक आनंददायक मौज लुटू (भोगू सोहळा अलौकिक). प्रेम जणूकाय रत्नांचे अलंकारच, त्याने तुम्हाला सजवू (प्रीति+रत्न+अलंकार+मंडण), आमचे सर्वस्व, म्हणजे जणूकाय दृष्ट काढण्याची कडूलिंबाची पाने, मीठ, मोहऱ्या वगैरे, त्याने ओवाळून दृष्ट काढू (करू निंबलोण), पाच प्राण (प्राण, अपान, व्यान, समान, उदान), म्हणजे जणूकाय चवऱ्या, त्या तुमच्यावर ढाळू (चामर+आंदोलन), आमचे तन्मय (तल्लीन होणे) हे जणूकाय छत्रच, त्याने तुमचे उन्हापासून रक्षण करू (ताप+निवारण+छत्रें). अशाप्रकारे गंध-अर्घ्य सहित अष्टोपचाराची (अष्टांग गंध-अर्गजा) स्वानंदरूपी पूजा तुम्हाला अर्पण करून हे साईराजा! आमच्या कामासाठी (काजा) आम्ही तुझी आराधना करू. (अशाच प्रकारची मानसिक पूजा कै. ह. भ. प. दासगणूंनी त्यांच्या श्री साईनाथ स्तवनमंजरीत केली आहे. ओ. ११२-११४ व ११९-१२२) आपले इच्छित प्राप्त करून घेण्यासाठी 'साईसमर्थ' या नामाचा जप करू आणि याच मंत्राने परमार्थ साध्य करून आपल्या निष्ठेचे सार्थक करून घेऊ (कृतार्थ निजनिष्ठा). (ओ. २१-३३)

पूर्वीच्या अध्यायात अत्यंत (घन) दयाळू

श्री साईसमर्थ आपल्या भक्तांचे कल्याण साधण्यासाठी त्यांना कशी शिकवण देत असत, हे सांगितले. आता या अध्यायात दर्शनाला आलेल्या भक्ताला आपल्या मूळ गुरूच्या पायी कशातऱ्हेने (कवणेपरी) स्थिर करीत असत त्या कथेतील कौशल्य लक्ष देऊन ऐका (कथा विंदान ते परिसा)! मागच्या अध्यायाच्या शेवटी ज्या पंत नावाच्या भक्ताच्या कथामृताचा जो निर्देश केला त्यातील तत्त्व (सार) मनात पक्के (निश्चित) होण्यासाठी बाबांनी त्यांना कसकसे अनुभव दाखविले, कसे डोळ्यात निष्ठारूप अंजन घातले, कसे आपल्या गुरूपदी स्थिर (कायम) केले आणि कसे मन शांत केले, ते ध्यान देऊन (दत्त+चित्त) श्रोत्यांनी ऐकावे. एकदा एक पंत नावाचे भक्त मित्रांच्या संगतीत साईंच्या दर्शनाच्या इच्छेने मोठ्या प्रयत्नाने (बहुत श्रमाने) शिरडी येथे गेले. ते पूर्वीच अनुग्रह पावलेले असून आपल्या गुरूच्या चरणी स्थिरचित्त होते. शिरडीत कशासाठी जावयाचे, अशी त्यांच्या मनात शंका उत्पन्न झाली. परंतु जसा ज्याचा योग असतो त्याप्रमाणे माणसाला आधी कल्पना नसलेला भोग प्राप्त होत असतो. पंतांना साईदर्शनाची संधी चालून आली (ओघ आला) आणि ती हटकून सुखकारक (अमोघ सुखदायी) ठरली. आपण एक योजना आखतो, पण ईश्वराच्या मनात दुसरेच काही असते. अदृष्टापुढे (नशीबापुढे) काही चालत नसते. कसे ते स्वस्थ चित्ताने ऐका! शिरडीच्या प्रवासाला जाण्याचे ठरवून (प्रस्थान) कित्येक मंडळी सगळी आनंदाने एकत्र जमून आगगाडीत (अग्निरथात) बसून आपापल्या ठिकाणाहून निघाली होती. ही मंडळी जेव्हा गाडीत चढली तेव्हा तेथेच अकल्पितपणे (अवचित) हे पंतही बसलेले होते. (बोलता बोलता) पंतांना त्या मंडळींचा शिरडीला जाण्याचा बेत कळला (झाला अवगत). त्या मंडळींत पंतांचे काही स्नेही आणि विहिणी-व्याही (मुलाचे किंवा मुलीचे सासु-सासरे) होते. पंतांच्या मनात मुळीच नसताना ओढून-ताणून (बळेच) त्या मंडळींच्या शिरडीला जाण्याच्या आग्रहात ते सापडले. आधी पंतांचा जेथे जाण्याचा विचार होता त्या ठिकाणापर्यंतचे तिकीटही त्यांनी काढलेले होते. परंतु पुढे तो विचार त्यांनी बदलला. ते विरार स्टेशनवर उतरले आणि मंडळी मुंबईला पुढे गेली. मग पंतदेखील खर्चासाठी उसने पैसे घेऊन मुंबईला गेले. मित्रांचे मन मोडवत नव्हते. आपल्या गुरूची (शिरडीला साईबाबांच्या दर्शनाला जाण्याची) संमती घेतली (अनुमोदन घेतले) आणि मग ते सर्व मिळून आनंदाने शिरडीला येऊन पोहोचले. सकाळी अकराच्या समयाला ते सगळे मशिदीत गेले आणि बाबांच्या पूजेसाठी भक्तांची गर्दी पाहून त्यांना उल्हास वाटला व बाबांचे रूप (ध्यान) पाहून ते आनंदित झाले. इतक्यात पंतांना चक्कर (झीट) येऊन ते बेशुद्ध होऊन पडले. त्यांच्या जीवाला अशक्तता (विकलता) आली आणि शरीर अगदी हालचालशून्य झाले (पावले सबळ निचेष्टता). हे पाहून सोबत आलेल्या मंडळींना काळजी वाटली आणि त्यांचे मन अगदी अस्वस्थ झाले. परंतु साईबाबांच्या कृपादृष्टीने आणि त्या मंडळींच्या मोठ्या मदतीमुळे, मस्तकावर पाणी छाटल्यावर (करिता उदकवृष्टी) पंतांची बेशुद्धता समूळ नष्ट झाली. ते शुद्धीवर आले आणि खडबडून उठून बसले. जणूकाय झोपेतून आताच उठून बसले. साईबाबा पूर्ण अंतर्ज्ञानी होते. पंतांनी आधीच गुरूचे शिष्यत्व पत्करलेले आहे (गुरु+पुत्रता), हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांना आश्वासन (अभय) देऊन बाबांनी त्यांना त्यांच्या त्या गुरूंच्याच पायी कायम केले. बाबा म्हणाले, ''प्रसंग काहीही येवो. अपना तकिया छोडना नहीं (आश्रयाचे स्थान सोडू नये). सदासर्वदा आपल्या स्थानाला चिकटून (निश्चळ) राहावे आणि एकनिष्ठपणे सर्व गुरूंची ऐक्यता लक्षात ठेवावी (अनन्य पाही एकत्वीं).'' पंतांना ती खूण पटली, आपल्या गुरूची आठवण झाली आणि साईबाबांच्या कनवाळूपणाची (दयेची) आठवण जन्मभर राहिली. (ओ. ३४-५६)

तसेच एक मुंबईचे हरिश्चंद्र पितळे नावाचे गृहस्थ त्यांचा मुलगा फेंफऱ्याच्या दुखण्याने पिडलेला (अपस्मार+व्यथा+ग्रस्त) असल्याने फार त्रासून गेलेले होते. देशी-विदेशी डॉक्टर झाले, पण काहीएक उपाय चालला नाही. सर्वांचे प्रयत्न हरलेले पाहून शेवटी साधुसंत राहिले. सन १९१० साली दासगणूंची कीर्तने सुरू झाली आणि श्री साईनाथांची कीर्ती पसरून शिरडीची यात्रा वाढली. शिरडी कोठले कोनाकोपऱ्याचे गाव (कु+ग्राम), परंतु मोठ्या भाग्याचे होते. ते आता पंढरपूर झाले (त्याला विठ्ठलाच्या पंढरपूराइतके महत्त्व प्राप्त झाले) आणि यात्रा अपार लोटू लागली. साईबाबा केवळ दर्शनानेच किंवा नुसत्या हाताच्या स्पर्शाने किंवा फक्त कृपेने पाहून रोग घालवितात, असे अनेकांना अनुभव आले. त्यांना अनन्यपणे शरण गेले म्हणजे भक्तांचे कल्याण होत असते (कृत+कल्याण पावत). सगळ्यांच्या मनातील इच्छा जाणून बाबा त्या सर्व पुरवीत असतात. उदी (बाबांच्या धुनीतील राख) लावल्याने भूतपिशाच पळून जातात, आशीर्वादाने रोग नाहीसे होतात (पीडा टळती) आणि कृपादृष्टीने दुःखे जवळ येत नाहीत (बाधा चुकती), हे ऐकून लोक शिरडीला धावधावून जातात, असा साईबाबांचा महिमा दासगणूंच्या ग्रंथांतून, कथाकीर्तनांतून आणि कर्णोपकर्णी (एकाने ऐकून दुसऱ्याला सांगणे अशातऱ्हेने) ऐकून पितळे यांना त्यांच्या दर्शनाची उत्सुकता झाली (उत्कंठा उदेली). सर्व मुलेबाळे आणि भेट म्हणून (उपायने) नानाप्रकारची फळे बरोबर घेऊन ते आपल्या पूर्वपुण्याईच्या योगाने बाबांच्या दर्शनाला शिरडीस येऊन पोहोचले. तेथे मुलाला बाबांच्या पायावर घातले व स्वतःही बाबांपुढे लोटांगण घातले. तोच एक अगदी वेगळाच प्रकार घडला आणि पितळे मनात अत्यंत गडबडून गेले. साईबाबांची दृष्टादृष्ट होताच मुलगा एकाएकी (अवचिता) बेशुद्ध झाला आणि डोळे गरगर फिरवून खाली पडला आणि ते माता-पिता घाबरून गेले. तो मुलगा जमिनीवर बेशुद्ध (विसंज्ञ भूमीसी) पडला, तोंडाला खूप फेस (उदंड खरसी) आला आणि आईबापांना काळजी पडली की या दैवभोगाला काय उपाय करावा? त्या मुलाचा श्वासोश्वास कोंडला गेला असे वाटले, तोंडातून सारखा फेस येत राहिला व सर्व शरीराला घाम सुटला आणि त्याची जिवंत राहण्याची आशाच खुंटली. असे झटके अनेक वेळा मुलाला पूर्वी येऊन गेले होते, परंतु एकाही खेपेला इतका उशीर झाला नव्हता. हा झटका तर 'न भूतो न भविष्यति' (पूर्वी कधी न झालेला व पुढे कधीही

न होणारा) असा होता. याने तर मरण येते की काय अशी स्थिति (प्राणांतिक गति) आणली. बाळाची अशी अवस्था पाहून आईच्या डोळ्यांतील अश्रू थांबत नव्हते (न खळती). ती बाई आपल्या मनात म्हणाली, ''आपण आलो कशाकरिता आणि हे काय झाले! उपाय शोधायला गेलो तर तो अपायच ठरला. साईबाबांचे पाय असे प्राणनाशक (घातुक) का बरे व्हावेत? आमचा सर्व खटाटोप (व्यवहार) व्यर्थ गेला. चोराच्या भीतीने (भेणें) घरात शिरावे, तो घरच अंगावर कोसळावे, वाघ खाईल (भक्षील) म्हणून गाईने जीवाच्या भीतीने पळून जावे, तो तिला वाटेत कसाई (खाटिक) भेटावा, उन्हात तापलेल्या वाटसरूने झाडाच्या सावलीत विसावा घ्यावा, तो ते झाडच उपटून अंगावर पडावे, देवावर श्रद्धा ठेवून पूजेसाठी जावे, तो देऊळच अंगावर कोसळावे असे हे झाले पहा!'' (ओ. ५७-७६)

बाबा मग त्या पितळे मातापित्यांना आश्वासन देत म्हणाले, ''थोडा मनात धीर धरा! त्याला नीट काळजीपूर्वक (निगुती) उचलून न्या! त्याची शुद्धी परत येईल (निज+अवगती लाधेल). मुलाला आपल्या निवासस्थानी (बिऱ्हाडी) घेऊन जा! एक घडी (घटका = २४ मिनिटे) भरली की त्याच्या शरीरात प्राण येईल (सजीव होईल त्याची कुडी). आता उगीच घाई (तांतडी) करू नका.'' असो. पुढे त्यांनी तसे केले आणि बाबांचे बोल खरे झाले. कुटुंबासह पितळ्यांना आनंद झाला आणि त्यांच्या मनातल्या कुशंका पार विरघळून गेल्या (कुतर्क गेला विरोन). मग पितळे आपल्या पत्नीसह बाबांच्या दर्शनाला आले व अत्यंत नम्रपणे (होऊनि अति विनीत) त्यांनी साष्टांग नमस्कार (प्रणिपात) केला. आपला मुलगा (सुत) उठलेला पाहून आभारपूर्वक मनात आनंदित होऊन ते बाबांचे पाय दाबीत बसले. मग बाबांनी त्यांना हसत हसत (स+स्मित) विचारले, ''आता तरी त्या शंकाकुशंकांच्या लहरी शांत झाल्या का? जो विश्वास (निष्ठा) ठेवील आणि धीर (सबुरी) धरील त्याचे श्रीहरी रक्षण करील.'' (ओ. ७७-८३)

पितळे मूळचेच श्रीमंत, चांगल्या कुळातले (घरंदाज) आणि लोकांत प्रसिद्ध पावलेले (लौकिकवंत) होते. त्यांनी बाबांना फळपान अर्पण केले आणि जमलेल्या लोकांना मेवामिठाई वाटली. त्यांचे कुटुंब (पत्नी) फार सात्त्विक (सत्व म्हणजे चांगल्या गुणांनी युक्त), प्रेमळ, श्रद्धाळू आणि भाविक होते. त्या बाबांकडे टक लावून मशिदीत खांबाजवळ बसत असत. बाबांकडे पाहता पाहता त्यांचे डोळे अश्रूंनी भरून येत असत. असे सारखे होत असलेले पाहून, त्यांच्या प्रेमाची नवलाई पाहून बाबासुद्धा आपले भान अगदी विसरत असत. जसे देव तसेच संत. तेही भक्तांच्या अगदी ताब्यात (चर+अधीन) असतात. त्यांना जे अनन्यपणे भजतात त्यांच्यावर ते कृपा करतात. असो. ती मंडळी जाण्यासाठी निघाली आणि मशिदीत दर्शनाला आली. बाबांची आज्ञा व उदी घेतली आणि निघण्याची तयारी केली. इतक्यात बाबांनी खिशातून तीन रुपये काढले आणि पितळ्यांना जवळ (निकट) बोलावून काय म्हणाले ते ऐका! ''बापू! (या नावाने बाबा कोणालाही मोठ्या प्रेमाने हाक मारीत असत.) तुला मी पूर्वी दोन रुपये दिले होते, त्यात हे तीन ठेवून यांची पूजा करीत जा! तुझे कल्याण होईल.'' पितळ्यांनी हातात रुपये घेतले आणि बाबांचा प्रसाद म्हणून त्यांचा आनंदाने स्वीकार केला. बाबांच्या पायांवर त्यांनी लोटांगण घातले आणि म्हणाले, ''महाराज! माझ्यावर कृपा असू द्या!'' पितळे मनात विचार करू लागले, ''माझी तर शिरडीला ही पहिलीच फेरी. मग बाबा हे काहीतरी काय म्हणतात ते मला निश्चित (निर्धारा) कळत नाही. बाबांना मी पूर्वी कधी पाहिले (देखिलें) नाही. मग हे दोन रुपये मला पूर्वी कसे दिले? त्यांच्या या बोलण्याचा अर्थ स्पष्ट कसा होईल (कैसी व्हावी परि+स्फुटता)? पितळ्यांची ती जाणण्याची इच्छा (जिज्ञासुता) वाढली. परंतु बाबांनी पत्ता लागू दिला नाही आणि ती अस्पष्टता (मुग्धता) तशीच राहिली. संत सहज जरी काही बोलले तरी त्यांचे ते शब्द खरे होत असतात, याची जाणीव पितळ्यांच्या मनात होती. म्हणून ते विचारात पडले. परंतु पुढे ते जेव्हा मुंबईला आपल्या घरी परत गेले, तेथे एक म्हातारी होती, जिने त्यांची ही जिज्ञासा पुरी केली. (ओ. ८४-९६)

ती म्हातारी म्हणजे पितळ्यांची आई होती. सहज शिरडीची हकिगत (वृत्तांत) विचारीत असताना तीन रुपयांची गोष्ट निघाली. परंतु तिचा कशाशीही संबंध जुळविता येई ना. नंतर विचार करता त्या म्हातारीला आठवण झाली व ती पितळ्यांना म्हणाली, ''आता मला खरेच आठवले. बाबा बोलले ते अगदी खरे आहे. आता तू तुझ्या मुलाला शिरडीला नेऊन साईंचे दर्शन करविले तसेच तुझ्या वडिलांनी तुला पूर्वी अक्कलकोटी (सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे गाव. पूर्वी अक्कलकोट संस्थानची राजधानी होती.) नेले होते. तेथील महाराजदेखील महाप्रसिद्ध सिद्धपुरूष, अंतर्ज्ञानी (सर्वांच्या मनातले जाणणारे), योगी, विद्वान (प्रबुद्ध) आणि परोपकारी होते. (हे महाराज म्हणजे अक्कलकोटचे महान दत्तावतारी संत 'स्वामी समर्थ' होत. ते इ.स. १८३८ मध्ये मंगळवेढे येथे प्रगट झाले होते. लवकरच ते अक्कलकोट येथे आले आणि इ.स. १८७८ मध्ये समाधी घेईपर्यंत त्यांचे याच गावी वास्तव्य होते.) तुझे वडीलही आचरणाने शुद्ध होते. तुझ्या वडिलांची पूजा घेऊन ते योगीराज प्रसन्न झाले होते आणि त्यांनी प्रसाद म्हणून दोन रुपये पूजन-अर्चन करण्यासाठी दिले होते. ते दोन रुपये तुमच्या देवदेवतांच्या पूजेत होते व तुमचे वडील अत्यंत श्रद्धेने नियमितपणे त्यांची पूजा करीत होते. त्यांची निष्ठा मला एकटीला ठाऊक होती. त्याप्रमाणे ते वागत गेले होते. त्यांच्या मागे ती पूजेची साहित्ये (उपकरणे) मुलांची खेळणी झाली. मुलांची देवावरची श्रद्धा उडाली, पूजेची लाज वाटू लागली आणि पूजेसाठी लहान मुलांची नेमणूक (योजना) झाली. मग रुपयांची दाद कोण घेणार (त्यांचेकडे लक्ष कोण देणार)! अशी कित्येक वर्षे लोटली. त्या रुपयांची बेदाद (अव्यवस्था) झाली, त्यांची आठवणही साफ नाहीशी झाली (बुजली) आणि ती रुपयांची जोडी हरवली. असो. तुमचे भाग्य मोठे की साईंच्या रूपाने ते अक्कलकोट स्वामी महाराजच विस्मरणाचे आच्छादन दूर करण्यासाठी (पुन्हा आठवण करून देण्यासाठी) व संकटांचे निवारण करण्यासाठी तुम्हाला भेटले. तरी आता

यापुढे चुकीच्या खोटया कल्पना (तर्क कुडे) सोडून द्या, आपल्या पूर्वजांच्या आचरणाकडे लक्ष द्या आणि चुकीचे (वाकडे) व्यवहार करू नका! या रुपयांचे पूजन करीत जा आणि या संतांच्या प्रसादाचे भूषण माना! साईसमर्थांनी ही खूण तुम्हाला पटवून तुमची भक्ती पुन्हा जागृत केली आहे (पुनर्+उज्जीवन भक्तीचे).'' आईची ही गोष्ट ऐकून पितळ्यांच्या मनाला अत्यंत श्रेष्ठ आनंद झाला आणि साईबाबांच्या व्यापकतेची (सर्वकाळी व सर्वठिकाणी हजर राहण्याच्या स्थितीची) मनात खात्री पटून त्यांना दर्शनाचे सार्थक झाल्याचे वाटले. आईच्या शब्दरूपी अमृताने पितळ्यांच्या नष्ट झालेल्या भावना जागृत केल्या, पश्चात्तापरूपी प्रायश्चित्त घडवून दिले आणि पुढचे कल्याण दाखवून दिले. असो. होणार ते होऊन गेले. संतांनी पुढच्या कार्यासाठी जागे केले आणि त्यांचे उपकार मानून पितळे आपल्या कामात सावध राहिले. (ओ. ९७-११२)

असाच आणखी एक अनुभव सांगतो. भक्तांच्या स्वैर अविचारी (उत्+शृंखल) वृत्ती बाबा कशा आवरतात, ते स्वस्थ चित्ताने ऐका! गोपाळ नारायण आंबडेकर नावाचे पुणे येथे राहणारे साईबाबांचे एक श्रेष्ठ भक्त होते. त्यांची कथा आदरपूर्वक ऐका! इंग्रज (आंग्लभौम) सरकाराच्या पदरी अबकारी (एक्साईज) खात्यात त्यांची नोकरी होती. दहा वर्षे पुरी झाल्यावर ती सोडून ते घरी बसले. त्यांचे नशीब फिरले आणि प्रतिकूल (पारखे) झाले. सर्व दिवस काही सारखे नसतात. ग्रहदशेचे फेरे आले. ते भोगल्याशिवाय कोणाला बाजूला सरकता येईल (ते कोणाला टाळता येतील) (कोण फरकें न भोगितां?)! सुरवातीला ते ठाणे जिल्ह्यात नोकरीला होते. पुढे नशिबात जव्हार (त्या काळी एक छोटेसे संस्थान. आता ठाणे जिल्ह्यातील एक गाव.) आले. जेथे अंमलदार (अधिकारी) होते, तेथेच ते बेकार झाले. नोकरी ही अळूच्या पानांवरचे पाणी (क्षणभंगूर, कायम न टिकणारी) असते. पुन्हा परत कशी मिळेल (पुनश्च पडावे कैसें ठिकाणी)! आंबडेकरांनी नंतर प्रयत्नांची शिकस्त करून पाहिली, परंतु त्यांना यश आले नाही. म्हणून कोणाची गुलामगिरी न करता स्वतंत्र (स्व+वश) राहण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यांच्यावर आपत्तींचा (संकटांचा) कळस झाला आणि ते सर्वप्रकारे हताश झाले. वर्षानुवर्षे त्यांची सांपत्तिक स्थिती खाली खाली गेली, आपत्तीवर आपत्ती आली आणि घरातील परिस्थिति सहन करण्यास कठीण झाली. अशाप्रकारे सात वर्षे गेली. दरवर्षी ते शिरडीला जात असत आणि बाबांपुढे रात्रंदिवस लोटांगणे घालून गाऱ्हाणे गात (तक्रारपूर्वक विनवणी करत) असत. इ.स. १९१६ साली ते अत्यंत वैतागून गेले आणि त्यांना वाटले की शिरडीक्षेत्री जाऊन जीव द्यावा (प्राणघात करावा). या खेपेस कुटुंबासह ते शिरडीत दोन महिने राहिलेले होते. एका रात्री (निशीस) काय गोष्ट घडली, ती ऐका (परियेसा)! दीक्षितांच्या वाड्यासमोर बैलाच्या गाडीवर बसले असताना आंबडेकरांच्या मनात विचारांच्या लहरी चालल्या. ते जीवनाला कंटाळले होते. त्यांच्या मनाची वृत्ती अगदी उदास झाली होती. ''हा त्रास आता पुरे झाला. आणखी नको. जगण्याची आशा आता सोडून द्यावी,'' असा विचार करून जीवावर उदार होऊन, आंबडेकर विहिरीत उडी घालण्यास तयार झाले. दुसरे कोणी जवळ नाही अशी शांत (निवांत) वेळ पाहून आपल्या मनाची हौस (सोहळा) पुरवीन आणि दु:खावेगळा होईन, असे त्यांनी ठरविले. आत्महत्येचे पाप मोठे भयंकर (दुर्+धर) तरी ते करण्याचा विचार त्यांनी पक्का केला. परंतु साईबाबा या जगाचे चालक (सूत्रधार) आहेत. त्यांनी आंबडेकरांचा हा विचार टाळला. तेथेच चार पावलांवर एका खाणावळवाल्याचे घर होते. तोही बाबांचा सेवक (परिचारक) होता. (हा खाणावळवाला म्हणजे सगुण मेरू नाईक. हा मूळ गोव्याचा राहणारा. बाबांनी त्याच्या लहानपणी त्याला साधूच्या वेषात दर्शन दिले होते. पुढे तो हैद्राबादेस गेला असताना त्याची एका श्रीमंत साईभक्ताशी ओळख झाली आणि त्याच्याबरोबर तो शिरडीला आला. बाबांनी त्याला लहानपणी दिलेल्या भेटीची आठवण देऊन शिरडीत कायमचे ठेवून घेतले. सगुणने आपल्या उपजिवीकेकरिता आणि दर्शनाला येणाऱ्या भक्तांकरिता एक खाणावळ काढली होती. मागे ५व्या अध्यायात ओ. ६१ मध्ये निंबातळाच्या पादुकांची व्यवस्था पाहण्याबद्दल याच्या नावाचा उल्लेख आलेला आहे.) सगुणाने त्यावेळी घराच्या उंबऱ्यावर येऊन आंबडेकरांना विचारले की अक्कलकोट महाराजांची पोथी कधी वाचली होती का? पाहू, पाहू कोणती ती पोथी म्हणून आंबडेकरांनी ती हातात घेतली, सहज पाने चाळून पाहिली आणि मध्येच ते वाचू लागले. कर्मधर्मसंयोग (अकल्पित मेळ) कसा जुळून आला, वाचावयाला विषयही तसाच आला आणि तो वाचल्याबरोबर (सरिसा) हृदयातील विचारांवर (अंतर्+वृत्तीत) ठसा कसा उमटला (परिणाम कसा झाला), ही कथा सहजासहजी आली, ती सर्व श्रोत्यांना ग्रंथाच्या विस्तारभयामुळे अगदी थोडक्यात सांगतो. (ओ. ११३-१३३)

अक्कलकोट येथे आत्मस्वरूपी निमग्न असलेले (अंतर्+निष्ठ) महान संत स्वामी समर्थ महाराज असताना पुष्कळशा रोगांनी आजारी असलेल्या (बहु व्याधिष्ठ) त्यांच्या एका भक्ताला सहन करण्यास कठीण (दु:सह) कष्ट प्राप्त झाले. रोगांपासून मुक्त होईन म्हणून बरेच दिवस त्यांनी महाराजांची सेवा केली होती. आता ते कष्ट सहन होत नव्हते म्हणून तो भक्त फार उद्विग्न (भीतीग्रस्त) झाला. आत्महत्येचा निश्चय करून रात्रीची वेळ पाहून एका विहिरीवर जाऊन त्याने त्यात आपले शरीर झोकून दिले (केला शरीरपात त्याने). इतक्यात स्वामी समर्थ महाराज तेथे आले, आपल्या हाताने त्याला बाहेर काढले आणि उपदेश केला, ''भोक्तृत्व (प्रारब्धाने भोगण्यास आलेले सुख-दु:ख) सारे भोगलेच पाहिजे. आपल्या पूर्व कर्माप्रमाणे व्याधी, कुष्ठ (महारोग), क्लेश (कष्ट) किंवा रोग यांचे भोगणे पूर्ण झाल्याशिवाय हत्यायोग (आत्महत्या करून घेण्याचा मार्ग) अवलंबून कशी सुटका होईल! हा भोग अपुरा राहिला तर दुसरा जन्म घ्यावा लागेल. म्हणून तसेच कष्ट थोडे आणखी सहन कर! आत्महत्या करणारा होऊ नकोस.'' (हे भक्त म्हणजे स्वामी समर्थांचे परम भक्त ब्रह्मनिष्ठ प. पू. वामनबुवा वांबोरीकर उर्फ वामन रावजी वैद्य, ज्यांनी स्वामी समर्थांचे 'श्रीगुरुलीलामृत' नावाचे ५५ अध्यायांचे

विस्तृत मराठी ओवीबद्ध प्रासादिक चरित्र लिहिलेले आहे. हा प्रसंग गुजराथेत बडोदे (वडोदरा) मुक्कामी शहराच्या मध्यवस्तीत सुरसागर नावाच्या तलावाच्या पश्चिम किनाऱ्यावरील विहिरीवर दिनांक, २० एप्रिल, १८७६ रोजी घडला. या प्रसंगाचे वर्णन स्वामी समर्थांच्या चरित्राच्या अध्याय ४०, ओ. १६५-१७२ मध्ये आलेले आहे. ज्या विहिरीत वामनरावांनी उडी घेतली होती ती विहीर आणि ज्या ठिकाणी स्वामी समर्थ प्रगट झाले होते त्या ठिकाणी स्थापन केलेल्या स्वामींच्या पादुका बडोदे येथे अजून पाहावयास मिळतात. अलिकडे, म्हणजे इ.स. १९६० साली प्रसिद्ध दत्तभक्त नारेश्वरनिवासी रंगावधूत महाराज यांच्या शुभहस्ते स्वामी महाराजांची मूर्ती स्थापन करून मंदिराची शोभा वाढविली आहे. प. पू. वामनबुवांचे इ.स. १९०१ मध्ये निर्याण झाले. त्यांची समाधी बडोदे मुक्कामी रणमुक्तेश्वर महादेवाजवळ आहे.) ही समयोचित कथा वाचून आंबडेकर मनात थक्क झाले आणि बाबांची व्यापकता पाहून आपल्या जागी एकदम स्वस्थ बसले (वरमले). आंबडेकर मनात समजले की प्रारब्ध (अदृष्ट) हे भोगलेच पाहिजे, असे बाबांनी योग्य वेळी सुचविले म्हणून भलते साहस मी केले नाही. हा दृष्टांत म्हणजे जणूकाय आकाशवाणीच (वाचा अशरीरिणी) बोलली, असे आंबडेकरांना वाटले आणि त्यांची साईचरणी आसक्ती जडली (हेत जडला). खरोखरच साईबाबा असंभवनीय घटना घडवून आणतात (अघटित घटना साईंची). ''सगुणाच्या तोंडून हा साईंचा इशारा या पोथीद्वारे मिळण्यास थोडासा का उशीर (विलंब) झाला असता तर जन्माचे मातेरे (आयुष्याचा नाश) झाले असते. माझ्या प्राणाला मी मुकलो असतो, कुटुंबाचे भयंकर नुकसान केले असते, पत्नीवर अनर्थ ओढविला असता आणि स्वार्थ व परमार्थ दोन्ही घालवून बसलो असतो (नागवतो). पोथीचे निमित्त करून बाबांनी सगुणाला प्रेरणा दिली आणि आत्महत्येपासून माझे मन परत फिरविले.'' असा प्रकार घडला नसता तर आंबडेकर बिचारा फुकट जीवाला मुकला असता. परंतु जेथे साईसारखा तारणारा (वांचविणारा) असेल तेथे मारणारा काय मारू शकेल! या भक्ताच्या वडिलांची अक्कलकोट स्वामींच्याठायी भक्ती होती. तीच मुलाने (म्हणजे आंबडेकराने) पुढे चालवावी, हा स्पष्ट बोध बाबांनी त्याला या अनुभवरूपाने करून दिला (प्रचिती आणुनि देती त्या बाबा). असो. पुढे छान (बरवे) झाले. हेही दिवस निघून गेले. आंबडेकरांनी ज्योतिषशास्त्राचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला आणि त्याचे फळही उदयाला आले. साईकृपाप्रसाद पावून पुढे चांगले दिवस आले. ज्योतिषशास्त्रात प्रावीण्य संपादले आणि पूर्वीची दैन्यावस्था पार नाहीशी झाली. गुरूंच्या चरणी प्रेम वाढले. आरोग्य, खुशाली व सौख्य झाले आणि संसारात विश्रांती आणि उत्कर्ष लाभून अत्यंत आनंद प्राप्त करते झाले. असे अगणित, एकाहून एक बाबांचे मोठे चमत्कार सांगू जाता ग्रंथाचा विस्तार वाढेल म्हणून नुसते त्यांचे सार सांगितले. (ओ. १३४-१५१)

हेमाडपंत साईबाबांना शरण आले आहेत. पुढील अध्यायात शाम्याला (माधवराव देशपांड्यांना) बाबांनी विष्णुसहस्त्रनामाचे दान कसे दिले, याचे गोड वर्णन होईल. शामा नको नको म्हणत असताना त्याच्यावरच्या अनिवार प्रेमामुळे बाबा बळेच (आग्रहाने) विष्णुसहस्त्रनामाचे सुंदर माहात्म्य सांगून देतील. आता काळजीपूर्वक (सादर) ती कथा ऐका! अनुग्रहाचा समय येता, शिष्याची मुळीच इच्छा नसता, बाबा तो देताना दिसतील. सद्गुरूच्या घरी अनुग्रह करण्याची तऱ्हा (परी) कशी अलौकिक असते, हे या अध्यायात दिसून येईल. श्रोत्यांनी ती कथा आदरपूर्वक ऐकावी. हा साई सर्व गुणांची खाण (निधान) आहे. कल्याणाचे कल्याण आहे. त्याचे चरित्र पवित्र आणि पुण्यकारक आहे. सुदैवानेच (सभाग्य) ते ऐकायला मिळते. (ओ. १५२-१५६)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा **'अपस्मार-आत्महत्या-निवारणं तथा निज-गुरूपद-स्थिरीकरणं'** (दर्शनाला येणाऱ्या पितळ्यांच्या मुलाचा फेंफऱ्याचा रोग बरा करणे, पुण्याच्या आंबडेकरांचा आत्महत्येचा विचार मोडून काढणे आणि मुंबईच्या पंतांना त्यांच्या गुरूंच्या चरणी कायम करणे) या नावाचा सव्विसावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना अर्पण असो.**
**सर्वत्र मंगल असो.**

## अध्याय २६ ची आणखी टीका

या अध्यायातील तीनही कथा संतांच्या एकमेकांच्या एकात्मतेचे दर्शन आपल्याला घडवितात :

**या संतांच्या अनादि संस्था।**
**गुह्य व्यवस्था कैशा ह्या॥१२॥**

**यथाकाल-वर्तमान।**
**जया जें जें आवडे स्थान।**
**अवतार घेती कार्याकारण।**
**परी ते अभिन्न परस्पर॥१३॥**

**देश-काल-वस्तु भिन्न।**
**परी एकाची जी ऊणखूण।**
**दुसरा संत जाणे संपूर्ण।**
**अंतरी एकपण सकलिकां॥१४॥**

—अध्याय २१

पहिल्या पंतांच्या कथेत साईबाबांची पंतांच्या गुरुशी एकात्मता असल्याशिवायच का त्यांना पंतांच्या गुरूपुत्रत्वाची, म्हणजे गुरूचे शिष्यत्व आधीच पत्करलेले आहे, याची जाणीव झाली होती आणि मग ''अपना तकिया छोडना नहीं'' असा उपदेश केला होता! दुसऱ्या हरिश्चंद्र पितळ्यांच्या कथेत तर साईबाबांची अक्कलकोट स्वामी समर्थांशी असलेली एकात्मता अगदी स्पष्ट होते. **''बापू, तुजला पूर्वी दोन। दिधलेत म्यां त्यांत हे तीन। ठेवूनि याचें करीं पूजन। कृतकल्याण होसील॥९०॥''** तिसऱ्या पुण्याच्या आंबडेकरांच्या कथेतही बाबांनी त्यांना खाणावळवाल्या सगुणाकरवी अक्कलकोट महाराजांच्या पोथीतील नेमका योग्य तोच प्रसंग वाचवून जणूकाय त्यांच्या वडिलांची 'स्वामींची भक्ती' होती म्हणून आता आपण खुद्द स्वामी समर्थच असल्याने पूर्वी जसे कोणा एका भक्ताला विहिरीत उडी मारून आत्महत्या करण्यापासून वाचविले होते तसेच आता आंबडेकरांनाही

(पृष्ठ क्र. ५२ वर)



# वाजे नगारा

मोहनलाल अग्रवाल

(मागील अंकावरून)

“संसारी माणसाला या विद्येचा संपूर्ण निषेध आहे.” माझे लक्ष एकाग्र करण्यासाठी सूचना त्यांनी केली, “पहा! ही कर्णपिशाचीनी सिद्ध केल्यावर तुम्हांला समजणार नाही कीं, वास्तविकतां काय आहे? कर्णपिशाचीनी एकांतांत सर्वांची माहिती देईल. जी ऐकून तुम्हांला तुमच्या मित्र, हितेच्छू, नातेवाईकांविषयी खरी हकीकत समजल्यावर तुम्ही त्यांचा तिरस्कार करू लागाल. हळूहळू तुम्ही एकांत जीवन पसंत कराल. नि:सहायता अनुभवाल. कर्णपिशाचीनी तुम्हांला क्षणोक्षणी सत्यघटनेची माहिती देत राहिल. ते ऐकून ऐकून तुम्ही तुमचे समग्र भान विसरून जाल. कदाचित् आत्महत्या करण्यांस प्रेरित व्हाल. तिचा त्याग करण्याची इच्छा कराल; परंतु ती जाणार नाही. जर जिवंत राहाल तर मृतावस्था अनुभवाल. तुम्ही दृढमनोबलाचे असाल तर दांभिकपणाची मोहोर चढवून जगाल; मग बाकी जीवन किती खारट होईल याचा विचार करा. या जगांत संसारी लोकांना जीवन जगण्यासाठीं भ्रमाचीसुद्धां जरूर आहे; जर भ्रम नाहीसा झाला तर संसारी समाजाचें अस्तित्त्वच रहाणार नाही. सर्व विरक्त होईल. मग ही सर्व रचना, वैभव, विलास, माया, कुठे जाणार?

या परिस्थितींत तो नर भाग्यवान आहे, जो भ्रमांला जाणून घेतो; आणि त्यांपासून विरक्त रहावे; त्याला दुरून पहातो-जाणतो, कुणी प्रबल प्रयत्नानें या भ्रमाला जाणून घेतात; कुणी सद्गुरूंच्या सहवासांत समजतात. कुणीं ठोकर खाऊन जाणतात; म्हणून समजून भ्रमांत राहा. कर्णपिशाचीनीची सिद्धी तुम्हांला वास्तविक भूमिकेंत घेऊन जाईल. जिथें तुम्ही एकटे असाल, कुणी बरोबर नसेल, असे न समजणारे एकटेपण, अतुटता सहन होण्यासारखी असेल तरच संकल्प करा.

मग कर्णपिशाच्चीनीसिद्धी तुमची !

नागाजींच्या स्पष्टीकरणामुळें मी शून्यमनस्क बनलो. जे संसारी लोक कर्णपिशाच्चीनीसाठीं प्रयत्नशील आहेत यांची मला दया येते कारण, ही वरदानांच्या रूपांत शाप आहे. संसारी माणसाने याचा विचारसुद्धां करतां कामा नये.

नागाजींच्या मुलाखतींत त्यानंतर कांही बाहेरगांवच्या कामामुळें एक-दिड महिन्यांचे अंतर राहिले. त्यानंतरच्या मुलाखतींत साधारण चर्चा झाली. मी त्यांना न येण्याचे कारण सांगत असतांना, त्यांनी मध्येंच अडवून सांगितले कीं, ''औपचारिकतेची कांहीच आवश्यकता नाही. कारण मी पण जाणतो. कांही नवीन समाचार असेल तर सांगा.''

मी सहज हसत म्हणालो, ''आपल्याजवळ वर्तमानकाळापर्यंतच्या प्रत्येक बातम्या आहेत, त्यांत मी नवीन ते काय सांगणार ?''

तेवढयांत उदासी महाराज जंगली कंदमुळे घेऊन आले. मी त्यांना प्रणाम केला. ते म्हणाले, ''आतां थोडया दिवसांनी येथून रजा घेऊन मी नागाजींच्या अदेशानुसार माउंट अबु येथें २-३ वर्षांच्या तपस्येसाठीं जाणार आहे. ईश्वरांनी तुमचा व नागाजींचा परिचय माझ्या हिताकरतांच केला असावा; असे वाटते. त्यासाठी मी कुणाचें आभारी व्हावे हे गोड कोडे आहे.'' त्यावर मी त्यांना म्हणालो, ''मी फक्त निमित्त बनलो, आभार मानायचेंच असतील तर, नागाजींचे माना. ज्यांच्यामुळें जीवन आपण सार्थकी लावू शकलात. इतकेंच नव्हें तर मला तुमचे आभार मानावे लागतील कारण, तुमच्यामुळेंच मी, नागाजींचे दर्शन व सान्निध्य प्राप्त करू शकलो.''

त्यावर नागाजी मला म्हणाले, ''तुम्हांला थोडा त्रास देणार आहे, तुम्ही उदासी महाराजांसाठी कांही पानांचा उतारा लिहून आणून द्या.'' मी त्यावर उत्तरलो, ''यांत त्रास कसला? मला तर त्यांतून कांही जाणून घ्यायला मिळेल.''

नागाजी उभे राहिले. धुनीजवळ असलेल्या त्यांच्या जुन्या पत्र्याच्या पेटीमधून एका कपडयाचें बोचकें काढून माझ्यासमोर ठेवले. त्यांनी मला ते उघडायला सांगितले. मी ते हळूच उघडून पाहिले तर त्यांत २ जाडया पुठ्ठ्यांचेमध्ये सुटे जुने कागद अव्यवस्थितपणें ठेवलेले होते. त्यांत काळ्या शाईनें देवनागरी लिपीमध्यें लिहिलेले होते. नागाजी म्हणाले, ''ही वही तुम्ही घरी घेऊन जा; व शक्य तितक्या लवकर हिची नक्कल करून इथे पोहोचवा. तुम्ही पण तुमच्यासाठी एक नक्कल ठेवून घ्या; कारण तुम्हांला जिज्ञासा खूप सतावते.'' मी नागाजींना म्हणालो, ''जिज्ञासा माझा सहजस्वभाव बनला आहे; पण त्यांत माझी भावना शुद्ध आहे.'' त्यावर नागाजी गंभीरपणे म्हणाले, ''जिज्ञासेचें उत्पत्तीस्थान शंका आहे. विनय व विवेकपूर्ण श्रद्धा जोपर्यंत उत्पन्न होत नाही तोपर्यंत तत्त्वदर्शन, आत्मदर्शन कधीही शक्य नाही. तुमच्या रूचकर बोलण्याच्या आधारावर तत्त्वदर्शनाचा पाया रचलेला आहे. त्या प्रकारचा नियम, जप, भक्ती, योग, स्मरण–कुठलाही एक आधार ग्रहण करून त्याचे दृढ आचरण करा तरच, तुम्हांला स्वयंअनुभूती होईल आणि आपोआप प्रत्येक शंकांचे, प्रश्नांचे, जिज्ञासेचे समाधान होईल. फक्त जिज्ञासेनें तुमच्याजवळ प्रश्न एकत्रित होतील व या प्रश्नांचे 'मायाजाल' इतके आहे की, त्यांत गुंतवणुकीशिवाय कांही परिणाम मिळत नाही. कुठल्याही शुद्ध तत्त्वाला ग्रहण करून दृढतापूर्वक त्याचे आचरण करा. मग कशाचीही जरूर नाही.''

नागाजींनी वहीविषयी सांगितलें की, ''आजपासून ४०० वर्षांपूर्वीचा हा 'अर्बुदाचलचा कल्प' आहे. त्यांत अनेक रहस्ये आहेत. जी खनिज, वनस्पति, अलौकिक पदार्थ तसेंच सुवर्णरससिद्धीबद्दलची माहिती देतात. या सर्वांची कॉपी करून उदासी महाराजांना द्या. त्यामुळें भजन-तपस्या या प्रवृत्तींबरोबरच ते कांही अनुभव प्राप्त करतील.

घरी जाऊन वही जसजशी वाचत गेलो, तसतशी आश्चर्याला सीमा राहिली नाही. अर्बुदाचलात सांगितलेलीं मंदिरे, स्थानें, नदी, पहाड ठराविक ठिकाणीं असल्याचे मला माहित होते. पण या प्रकारानें पहाण्याची दृष्टी नव्हती. कल्प सर्व वाचल्यानंतर एक अद्भूत संवेदना अनुभवांस आली.

या कल्पाचे हिन्दी भाषेंत रूपांतर करून त्याच्या २ नकला केल्या. एक उदासी महाराजांना पाठवली व एक माझ्याजवळ ठेवली.

## अर्बुदाचल कल्प

**हा** 'अर्बुदाचल कल्प' म्हणजे माउंट अबु विस्ताराचा भौगोलीक, ऐतिहासिक, खनिज, दिव्य वनस्पति, अलौकीक पदार्थ, सुवर्णसिद्धीविषयी माहीती देणारा लेख–

हा कल्प मिळाल्यावर, त्याच्या संशोधनासाठी पूर्वतयारी करून, अबुला पोहोचलो. २ आदीवासी भिल्लांना बरोबर घेवून संशोधन सुरू केले. माझे भ्रमण २८ दिवस चालले. हा कल्प ४०० वर्षांपूर्वीचा असल्याने, अबुच्या रचनेत खुप फेरफार झाल्याचे दिसून आले. काही मुख्य स्थाने, मंदिर, गुंफा, कुंड, नदीविषयी नक्की पुरावा मिळतो. परंतु आधारभूत नक्की माहीती खूप कमी प्रमाणांत मिळते.

काही ठिकाणीं रात्री थांबणे आवश्यक होते, परंतु काही अडचणीमुळे ते शक्य झाले नाही. आवश्यक माहीती खूप कमी प्रमाणात मिळाली. उदा. काही दृश्ये, वनस्पति, तसेच कल्पाशिवाय काही गोष्टी पहायला, अनुभवायला मिळाल्या. जेव्हा फिरता-फिरता २५ दिवस झाले, व कल्पात सांगितल्याप्रमाणें विहीरीजवळ जप, हवन, अनुष्ठान केले तेव्हा कल्पात सूचित केल्याप्रमाणे आवाहनाने, बोलावल्याप्रमाणे महापुरूष दुरून चालत येत आहेत, असे येऊन हजर झाले. मी त्यांना प्रमाण करून बसण्याची विनंती केली. त्यांनी उभ्याउभ्याच बोलणे सुरू केले, मी विचारले, ''महाराज ! या कल्पाच्या अनुसंधानानुसार मी इथे संशोधन करीत आहे, परंतु आधारभूत संपूर्ण सफलता का मिळत नाही ?'' महापुरूष म्हणाले, ''वत्सा ! तुमच्याजवळ असलेल्या कल्पांत सुत्र नाही, व सुत्राशिवाय कल्प अपूर्ण आहे, याशिवाय मुख्य कारण असे आहे. तुम्हीं भ्रमण केलेल्या प्रत्येक जागीं सर्व सत्य माहीती आहे त्याच परिस्थितीत आजही आहे. कुठेही त्यात फेरफार नाही.

पण प्रत्येक गोष्टी अस्पष्ट अशासाठी वाटतात कीं, आजच्या युगानुसार त्यांचा उचित प्रयोग होत नाही. धर्ममर्यादेचे उल्लंघन होऊ नये म्हणून सिद्ध पुरूष त्यांची अदृश्य रूपात रक्षा करतात. अज्ञानामुळे त्यांना कुठलाही रस्ता मिळत नाही व जिज्ञासू व समाधान झाल्याने परत फिरतो. या युगात याचा वापर अयोग्य कारणांसाठी होऊ नये म्हणून हे सर्व आहे. अर्थात् या सर्व बाबी संपूर्ण सत्य आहेत, पण जी व्यक्ती दिव्य दर्शनासाठी योग्य असेल, किंवा त्यासाठी प्रबल प्रयत्न करील, त्यांना अर्बुदाचलाच्या कल्पाच्या प्रत्येक रहस्याचा उलगडा होईल. सर्व यथावत् आहे, फक्त योग्यता पाहीजे. ती अनिवार्य आहे.'' त्यांच्या स्पष्टीकरणाने आनंद झाला, पण स्वत:च्या अयोग्यतेचे भान आले. त्या महापुरूषांनी जाता जाता विहीरीत हात घालून आतून एक स्वयंत्रिपुंड चर्चित शिवलिंग बाहेर काढून मला दिले; आणि सांगितले की, या लिंगाची काही मंत्राने पूजा करा. वेळ आली की, आपोआप मार्गदर्शन होईल. मी शिवलिंग खिशात ठेवले. महापुरूषाचे आभार मानायच्या आधीच ते निघून गेले; त्यानंतर मी २ दिवस भ्रमण केले; व शेवटीं योग्यता मिळवण्याचा निर्णय घेऊन घरी परतलो.

हा अर्बुदाचल कल्प काही लोकांकडे असल्याचे समजले. परंतु कल्प 'सुत्र' जोपर्यंत अचूक मिळणार नाही तोपर्यंत सफलता मिळणार नाही. या कल्पाचे मुळ सुख आजच्या काळात जैन सांप्रदायात व्यवस्थित जपून ठेवलेले आहे. ही गोष्ट त्यावेळच्या जैन महाराजांकडून मला समजली होती. आता आपण अर्बुदाचल कल्पाविषयी पाहू या

अबु पर्वतांच्या रांगा (मालिका) खूप विस्तारांत पसरलेल्या आहेत. या कल्पाचा उल्लेख अबु पर्वत व त्याच्या भोवतालच्या चौफेर दिशा व पायथ्याशीं जोडलेला आहे.

१.) अबु पर्वताच्या ईशान्य दिशेला एक शिखर आहे. त्याचा आकार चंद्रासारखा असल्यामुळें त्याला चंद्रशिखर म्हणतात. त्या शिखराच्या २०० फूट खाली एक विष्णूचे देऊळ जीर्णावस्थेंत आहे. या मंदिराच्या मुख्यद्वारासमोर ४ फूट खोदल्यावर पिवळ्या रंगाचे चमकदार दगड मिळतात. त्याचे बारीक चूर्ण गाईच्या दुधांत ३ दिवस सेवन केल्यावर शरिर वज्रासारखें दिव्य व तेजस्वी बनते. अतुल बलप्राप्ती होते; व शरिर निरोगी बनते.

**लेखकाचा अनुभव:** मंदिरापासून किती अंतरावर खोदकाम करावे, याचा उल्लेख नाही. मंदिरापासून ५ फूट दूर, १० फूट दूर, खोदकाम करून पाहीले, परिणाम शून्य.

२.) याच ईशान्यदिशेला विष्णूमंदिरापासून ४ फर्लांगांवर दूर एक लहान मंदिर आहे, त्यांत मूर्ती नसून ते जीर्णावस्थ आहे. त्या मंदिराच्या पूर्वेला आकाशलिंग नांवाचे एक मोठे शिवलिंग आहे. त्याच्यासमोर ३ कुंडे आहेत.

जी शिळेमुळे झांकली गेली आहेत. त्या शिळेला हटवून एक हात खोदून (सरसवासारख्या) मोहरीच्या आकाराचें लहान दगड निघतात, त्या दगडांना त्रिलोहापासून बनविलेल्या ताईतांत बंद करतात. तो ताईत तोंडात ठेवल्यावर अदृश्य होता येते. जेथें जाण्याचीं इच्छा असेल तिथें वेगानें जाता येते; व इच्छित रूप धारण करतां येते.

**लेखकाचा अनुभव:** सांगितल्याप्रमाणें त्या स्थानावर एक शिवलिंग आकाराचा दगड पडलेला आहे, त्याच्यासमोर एक सपाट शिला आहे, ती इतकीं मोठी आहे कीं, २०० माणसें कामाला लावली तरच हलवितां येईल. मग खोदकाम करण्याची गोष्ट बाजुला.

३.) अर्बुदा मातेंचे देऊळ वशिष्ठ आश्रमांपासून ६ कि.मी. दूर आहे. तिथें चिंचेची तीन झाडें आहेत. एक झाड कांटेरी असून, त्याच्या फळाच्या रसानें रसायनसिद्ध बनते; तसेंच कुष्ठरोग बरे होतात.

**लेखकाचा अनुभव:** वशिष्ठ आश्रम व अर्बुदामातेच्या देवळाजवळ चारहीं बाजुला दोन-दोन फर्लांगावर चिंचेचे एकही झाड नाही. कदाचित् कापून टाकली गेली असावी. एक अनुभव पहायला मिळाला तो असा, अर्बुदामातेच्या देवळांकडे जातां जातां वाटेंत आराम करण्यासाठी बसलो, तेव्हां माझ्यापासून १० फूटांवर एक लहान वनस्पतिचे झाड होते. त्याच्या कोवळ्या फांद्या एकमेकांवर तालबद्ध रितीनें स्पर्श करीत होत्या. हा क्रम प्रत्येक फांद्यांत होता. कदाचित् वाऱ्यामुळें हालत असतील पण, तसेही नव्हते. वाऱ्याची गती मंद होती. या फांद्या एकमेकांला स्पर्श करून परत वेगळ्या होत होत्या. परत स्पर्श करून परत वेगळ्या होत होत्या. मी जवळ जाऊन त्यांचा क्रम पाहू लागलो. पण माझी चाहूल लागतांच त्यांचे चलनवलन बंद झाले; ते एक सामान्य झाड होते. परत मी माझ्या जागेवर जाऊन बसतांच पुन्हां त्यांचा स्पर्श करण्याचा क्रम सुरू झाला. परत एकदां मी झाडाजवळ गेलो तर चलनवलन बंद झाले. या निसर्गाच्या लिलेची प्रशंसा करीत, अर्बुदामातेकडे गेलो.

४.) अबुच्या ईशान्य दिशेला ईशान्येश्वरीचे देऊळ आहे. त्याच्याजवळ 'महाशंख' नांवाचे तीर्थ आहे. तिथें ४-४ च्या रांगेंत असल्याप्रमाणें तीन सफेद खाखराच्या वृक्षांची रांग आहे. तिथें लहान गुहा आहे. त्यांत सुवर्णमय रज:कणाची माती निघते. जिला अग्नींत खुप तापवल्यावर सोने वेगळे पडते.

**लेखकाचा अनुभव:** ईशान्येश्वरीचे मंदिर सापडले. त्याचा जीर्णोद्धार १०० वर्षांपूर्वी झाला असावा. त्याप्रमाणें दोन विभागांत घडला असल्याचें जाणवत होते. आंतील भाग खूप जुना प्राचीन वाटत होता. दुसरा बाहेरचा जुना असुनसुद्धां मागाहून दुरूस्त करण्यांत आला असावा. महाशंख नांवाचे तीर्थ खुप शोधले, पण मिळाले नाही तसेंच सफेद खाखराची वृक्षेसुद्धां पहाण्यांत आली नाही. मग सुवर्ण रज:कणाची माती कुठून मिळणार?

५.) ईशान्येश्वरी देवीच्या पश्चिम दिशेला एक जूना वड आहे. त्याच्या छायेच्या बाहेरच्या विस्तारांत खोदल्यावर खूप वर्षांपूर्वी पुरल्या गेलेल्या वृक्षांचे दगडांत रूपान्तर झालेले दिसून येते. त्याला **फॉसील** म्हणतात. ते स्वयं परिस मणी आहेत. ज्याच्या स्पर्शानें लोखंड सुवर्ण बनते.

**लेखकाचा अनुभव:** वरील लिखाणांप्रमाणें खरोखरच वृक्षाच्या आकारासारखें दगड खोदकामांत मिळाले, त्यानें आनंद व उत्साह वाटला. लगेंच त्याला लोखंडाच्या फावडी, कुदळीचा स्पर्श केला पण कांहीच फेरफार झाला नाही.

त्यामुळें आनंद निराशेंत व उत्साह श्रमांत बदलला.

६.) अबुच्या दक्षिणेला तळाशीं अक्षय देवीचे स्थान आहे. तिथे हस्तीदंतांच्या रंगासारखें वृक्ष होतात; त्या वृक्षांची साल गाईच्या दूधांत घासून प्याल्यावर वृद्धावस्था दूर होते; व नवयौवन प्राप्त होते.

**लेखकाचा अनुभव:** दक्षिण दिशा खूप धोक्याची आहे; तिथें जंगली पशू, तसेंच अघोरी लोक राहतात; त्यामुळें मी संशोधन करू शकलो नाही.

७.) दक्षिण दिशेला बिहड शिखर नांवाच्या पर्वताची धार (कडा) आहे. तिथें दुपारी १२ वांजता त्या शिखराची पडछाया भूमीवर जिथें स्थिर होते तिथे खोदल्यावर बोराच्या आकारापासून मोठमोठ्या आकाराचे दगड मिळतात. या दगडाला पाण्यांत घासून डोळ्यावर त्याचा लेप घातला तर अंधत्त्व दूर होते. गिधाडासारखीं दृष्टी येतें. डोळ्यांचे कुठलेही रोग दूर होतात.

**लेखकाचा अनुभव:** दक्षिण दिशेला मी जाऊं न शकल्यामुळें त्या संबंधी संशोधन करणें अशक्य झाले.

८.) ईशान्य शिखरावर 'पात' नांवाचे तीर्थ आहे. त्याच्या उत्तरेला एक गुहा असून त्यांत मनशीलसारखी माती मिळते. (मनशील एक खनिज पदार्थ आहे.) या मातीचा गुण असा आहे की, १०० तोळा तांब्याच्या रसांत एक तोळा मातीं घातल्यानें सुवर्ण बनते.

**लेखकाचा अनुभव:** भिल्ल लोकांच्या अनुभवावरून ईशान्य शिखर मिळाले. परंतु 'पात' नांवाचे तीर्थ दिसले नाही तरी पण उत्तर दिशेला त्याचा तपास केला. खूप दूर दोन गुहा दिसल्या. त्याच्या बाहेर अस्वलाची पिल्ले खेळत होती, व गुहेंत त्यांच्या आई-वडिलांची हजेरी असल्यामुळें विचार रहीत केला.

९.) अबुवर 'कदंब' नांवाचे तीर्थ आहे, ते गौतम गुहेच्या पश्चिम दिशेला अर्ध्या मैलावर आहे. तिथें एक गणपतिचे देऊळ आहे. त्या देऊळाच्या आजुबाजुची जमिन सुवर्ण रज:कणासारखी चमकदार आहे. त्या मातीला पाण्यांने धुऊन त्यांत कल्हई वितळवून घातली तर कल्हई चांदीची होती.

**लेखकाचा अनुभव:** या तीर्थांत फक्त कदंबाचा वृक्ष आहे. गौतम गुहेच्या आधारें तो मिळाला. जिथें गणपतीचें प्राचीन मंदिर आहे तिथें सुवर्ण रज:कणासारखी नाही पण पिवळी, चमकदार व खूप वजनदार माती मिळाली. ज्याचा उपयोग केल्यावर कल्हईची चांदी न बनतां त्याच्यासारख्या रंगरूपांत व गुणधर्मांत फरक आढळला.

१०.) अबुच्या पूर्व दिशेला 'लाक्षावती' नांवाची नदी आहे. त्या नदीच्या पूर्व कांठावर कांचन नांवाचे झाड आहे. त्याच्या खालून लाल माती निघते. ती घेऊन, सुंदरखंड नांवाची दुसरी नदी, जी लाक्षावतीच्या १ मैल मागें विरूद्ध दिशेला वहाते, त्याच्या पाण्यानें या मातीचा पिंड बनवून, सुकवून, अग्नींत खूप तापविल्यानें सोनें सुटे पडते.

**लेखकाचा अनुभव:** सुंदरखंडा नांवाच्या नदीच्या उल्लेखानुसार नदी मिळाली. परन्तु लाक्षावतीची अचूक माहीती न मिळाल्यामुळें शोध घेतला गेला नाही.

११.) अबुवर पूर्वेला 'बौद्ध महाविनायक' नांवाचे तीर्थ आहे. तिथें खूप वैकुंठ वृक्ष आहेत. त्यांच्या मुळाजवळ नेहमी चिखल असतो. त्यांत सुवर्ण रज:कण मिसळलेले असतात. ती तापवल्यावर त्यांतून सोने बाहेर पडते.

**लेखकाचा अनुभव:** 'बौद्ध महाविनायक' तीर्थ म्हणून ओळखणारी जागा तीर्थाप्रमाणें स्थापन केलेली नसून पर्वताच्या एका मोठ्या शिळेला शिल्पकलेनें गणपतीचे रूप देण्यांत आले आहे असे दिसून येते. ही गणपतिची मूर्ती किती जूनी आहे ते सांगता येत नाही; परन्तु वैकुंठ वृक्षाचें किंवा चिखलाचें दर्शन झाले नाही.

१२.) अबु पर्वताच्या पश्चिम दिशेच्या मागच्या बाजुला नागेंद्रकुंड नांवाची १० कुंडे आहेत. त्या कुंडाच्या पूर्वेला एक धनुष्य इतकें दुर एक शेंदुराच्या रंगासारखा वजनदार, भरभक्कम वृक्ष आहे. त्या वृक्षाखालची माती त्याच्यापेक्षाही लाल आहे. ती माती रूईच्या दुधांत भिजवून ताम्रपत्रावर त्याचा लेप करायचा; मग त्याला तीव्र अग्नींत तापवून त्या वृक्षाच्या पानाच्या रसांत भिजवायचा. त्यामुळें ताम्रपत्राचें लेपनवेध होऊन सुवर्ण बनते.

**लेखकाचा अनुभव:** हा विस्तार अबु पर्वताच्या मागील बाजुस पायथ्याशी आहे. तेथे जाणें खूप कठीण आहे; तिथें १० कुंडे आहेत हे सत्य आहे.

१३.) अर्बुदामातेच्या मंदिराच्या डाव्या बाजुला ''बैरतास'' नांवाचे शिखर आहे. त्यांच्याखाली एक गुहा असून, तिथे सफेद माती निघते. ही खूप अलौकीक आणि चमत्कारीक आहे. डोळ्याच्या कुठल्याही विकारावर ती जादूप्रमाणें परिणामकारक ठरते. आंधळ्या व्यक्तीला दृष्टी मिळते. या मातींत शुद्ध जस्त वितळवून त्याचा धातू बनला जातो. त्याची सळी बनवून सकाळ-संध्याकाळ ती पाण्यांत बुडवून डोळ्याला लावल्यावर डोळ्याचा प्रत्येक विकार तीन दिवसांत बरा होतो.

**लेखकाचा अनुभव:** अर्बुदामातेच्या मंदिरापासून हे शिखर अर्धा कि.मी. दूर आहे. तिथें एक ब्रह्माजीचे जीर्ण मंदिर पण आहे. पण खाली कुठेही गुहा दिसत नव्हती. कदाचित् खूप वर्षे उलटल्यामुळें ती आंत पुरली गेली असावी. झाड, पान, वेलीमुळें गुहा शोंधणे कठीण गेले.

१४.) अर्बुदाचल पर्वतावर वशिष्ठ आश्रम आहे. त्याच्याजवळ उत्तर-पश्चिमेच्या कोपऱ्यांत एक पाण्याची विहीर आहे. तिचा कुणीहीं उपयोग केलेला नाही. त्या विहीरीजवळ पूर्वेला तोंड करून हवनसामुग्रीबरोबर धूप, नैवेद्य वगैरे ठेवून हा मंत्र १००८ वेळा जपून मध तसेच केशर घालून तयार केलेल्या पुड्या नैवेद्याला होमांत हवन केल्यावर एक महापुरूष उपस्थित होतो.

**मंत्र:** ॐ आगच्छ आगच्छ नमस्तुंभ्यं पर्वतानाम्
उत्तमम् ऽऽऽऽ स्वाहा॥

महा-पुरुष आल्यावर त्यांना नमस्कार करून कृपायाचना करावी. अर्बुदाचल मंडलाचे सर्व गुप्तभेद ते जाणतात. कृपा झाली तर ते मार्गदर्शनही करतात. मग जशी वेळ तसा साधक.

**लेखकाचा अनुभव:** हा एकच प्रयोग सफल झाला. ज्यामुळें वास्तविकतेविषयीं नक्की माहीती मिळू शकली. आदीवासी भिल्लांकडून सर्व सामुग्री मागवून

सांगितल्याप्रमाणें मी जप तसेंच हवन करायला बसलो. जेव्हां पुढच्या होमांत सोडण्याची वेळ आली, आणि हवन सुरू केले आणि शेवटची पुडी बाकी राहीली; त्यावेळी महात्मा यायच्याऐवजी असंख्य हत्तींचा कळप समोरून गोंधळ करीत येत असलेला दिसला. या कळपाला पाहून दोघेही भिल्ल मर्द पळून गेले. मी ही कुणी महारथी नव्हतो; पण मैदान सोडून पळून गेलो नाही. शक्य तितकी विवेकबुद्धी व धीर राखून परिस्थितीचा विचार केला आणि लगेंचच निर्णय घेतला. एकच पुडीं होमांत टाकायची बाकी होती. तोपर्यंत हत्तींचा कळप माझ्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता; म्हणून एक पुडी शेवटची होमांत टाकू व आपण पळूं असा विचार करून पुडी हातांत घेऊन मंत्र भरभर म्हणून होमांत टाकली. सर्व तसेंच ठेवून पळून जाण्यासाठी उभा राहीलो आणि, हत्तींकडे नजर टाकली, तर तिथें कुणीच नव्हते; परन्तु एक महात्मा श्वेत वस्त्रधारी मंद गतीनें माझ्यासमोर चालत येत होते; त्यांना नमस्कार करून त्यांना आसनावर बसण्याची विनंती केली. त्यांचे दिव्य रूप मी लक्षपूर्वक न्याहाळत होतो. माणसांत पहायला मिळणार नाही असें दिव्य तेज, पायाच्या टांचेपर्यंत लांब सफेद कफनी, उजव्या हातांत कमंडलू, डाव्या हातांत पावनपावडी, चांदीच्या तारेंसारखी चमकणारी दाढी, मिशा, पांपण्या, भुवया, जटा—सर्वच अद्भूत सफेद जाणवत होते. ह्याचबरोबर महत्त्वाची गोष्ट अशी कीं, त्यांची कातडी खूप चमकदार, आणि लहान बालकासारखी कोमल, मुलायम अशी तेजोमय वाटत होती. पाणीदार मोठे डोळे, जणूं अनंत रहस्यांच्या गुढतेचें एकमात्र दिपस्तंभ वाटत होते. त्यांनी मला विचारले, ''वत्स, आपले प्रयोजन प्रकट करा.'' मी त्यांना नम्रपणे सांगितले, ''प्रभू! या अर्बुदाचल कल्पाच्या आधारे आज २०-२५ दिवसांपासून मी रखडतो आहे; परंतु निराशा आणि अपयशाशिवाय कांहीच मिळाले नाही. बस्स्, आज मला आपले दर्शन घडले. ह्या माझ्या संशोधनाच्या अपयशामागे काय कारण हे कृपा करून सांगा व मी कांहीतरी मिळवुं शकेन त्यासाठी मार्गदर्शन करा.''

त्यावर ते म्हणाले, ''वत्स तुमच्याजवळ असलेला कल्प अपूर्ण आहे. त्यांच्या गुप्तसुत्रांचा त्यांत उल्लेख नाही. तुम्ही भ्रमण केलेली ठिकाणें आजही यथावत् आहेत. परंतु या युगांत त्यांचा उचित उपयोग होणार नसल्यामुळें सिद्ध लोकांनी या सर्व जागांचे रक्षण करण्यासाठीं स्वतःच्या सिद्धीने, मायेने अनेक प्रकारच्या अडचणींची रचना करून ठेवले आहे. ज्या नेहमी स्वयंसंचालीत आहेत. मी फक्त या मंडलाचा चौकीदार आहे; आणि सिद्ध महात्म्यांचा दास आहे. आपण आवाहन केल्यामुळें माझ्या कर्त्तव्यानुसार मला येणें भाग पडले.''

त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणांने माझें खूप समाधान झाले होते. मला त्यांना खूप प्रश्न विचारायचे होते, ते त्यांनी बरोबर जाणून माझ्याआधींच ते म्हणाले, ''जे तुम्हीं मिळवण्याचा व जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहांत, त्यासाठीं योग्यता मिळवा. ती योग्यता मिळवण्यासाठी अथांग प्रयत्न करा. योग्यता येतांच आपोआप प्रत्येक रहस्ये समजूं शकतील. प्रत्येक संकल्प परिपूर्ण होतील. कुठल्याही गोष्टीचे आश्चर्य वाटणार नाही. सर्व जगांत ईश्वरी अंश असल्याचा अनुभव मिळेल. या कक्षेत जेव्हां तुम्ही याल, तेव्हां तुम्हांला कांहीच शोधावे लागणार नाही. अशा अनेक अद्भूत अलौकीक सिद्धी येवून तुमचे दार ठोंठावतील. अशा असंख्य सिद्धी योग्य पुरुषांला शोधत असतात. योग्य पुरूष मिळतांच त्याच्या सेवकाप्रमाणें रहातात.

इथें मायेंचे एक सुक्ष्म गुपीत जोडलेले आहे. ते ही ऐका,— अशा असंख्य सिद्धी योग्य व्यक्तीला घेरून टाकतात. या सिद्धी द्वीधारी तलवारीचे काम करतात. एक धार त्या साधकाला मान, यश, किर्ती, धन, सुख, वैभव व मनोवांछीत प्रत्येक भोगविलास देते. त्याबरोबर दुसरी धार साधकाला परमतत्त्वापर्यंत पोहोचण्याच्या मार्गात विघ्ने उभी करून साधकाला फसवून चुकीच्या मार्गानें नेऊन स्वतःचे संपूर्ण प्रभुत्त्व साधकावर सोपवून साधकाच्या रोमरोमांला बहकावून ठेवतात. शेवटीं योग्यता प्राप्त करण्यासाठी धडपडणारा साधक मुळ मार्ग विसरून मायाचक्राचा भोग बनून सर्वच गमावतो.'' त्यांची मधुर अस्खलीत वाणी वहात होती. मी लक्षपूर्वक ऐकून त्यांतील मर्म समजण्याचा प्रयत्न करीत होतो. शेवटीं त्यांनी उभ्या-उभ्यांच विहीरीत हात घालून एक सुंदर शिवलिंग बाहेर काढले, व मला दिले, त्यावर नैसर्गिक त्रिपुंड होते. सुंदर, मऊ, जवळ-जवळ दिड इंच लांबीचे शिवलिंग मला देऊन म्हणाले, ''अमुक मंत्रानें या शिवलिंगाची पूजा करा, व योग्यता मिळवण्याचा प्रयत्न करा. 'ईश्वर तुम्हांला सफलता देईल', मनोकामना पूर्ण करेल.''

मी हात जोडून नमस्कार केला. शिवलिंग खिशांत ठेवून आभार मानण्यांस महात्म्यांकडे पाहीले; पण ते कधीच निघून गेले होते. या प्रसंगाला पुन्हां पुन्हां आठवून मी वसिष्ठ आश्रमांत परत आलो; तिथे दोघेही भिल्ल माझी वाट पहात होते. त्यांच्यावर राग तर आलाच! पण करणार काय? त्यांना सर्व हवनसामुग्री विहीरीजवळून आणण्यास सांगितले; आणि तिथें हत्ती वगैरे कांही नाही, तेव्हां 'न घाबरतां जा' असे म्हणालो.

या प्रसंगानंतर तीन दिवस थोडे जास्त परिभ्रमण केले, त्यांत एक अद्भूत अनुभव मिळाला. ज्याचे वर्णन करण्याआधीं बाकी राहीलेल्या कल्पाविषयीं माहीती देतो. या कल्पांत सांगितलेल्या नंतरच्या जागांना भेट देणे; व्यर्थ होते, कारण कांही योग्यता मिळवण्याआधीं फक्त भटकण्यांत कांहीच अर्थ नव्हता. एक शेवटचा प्रयत्न करून परत फिरण्याचा विचार केला.

प्रथम कल्पाविषयी बाकी असलेली माहीती व नंतर अद्भूत अनुभव:

आधीं आपण १४ स्थळांविषयी उल्लेख केलेला पाहीला. आतां

१५.) द्रव्यांची इच्छा असणाऱ्या मनुष्यानें ईशान्येश्वरी देवीच्या मंदिरांत ७ दिवस-रात्र राहून षोडशोपचारे महापूजा करावी. सातव्या रात्रीं साधकाला दुर्गंध येत असल्याचे कळेल. ते ईशान्येश्वरीचे आगमन असल्याचे सुचवेल; नंतर ईशान्येश्वरी देवी शामवस्त्रांत, रुद्र स्वरूपांत हजर होईल व साधकाला वचन मागायला सांगेल. त्यानें देवीजवळ दिव्य रसायनकुंभाची मागणी करावी. त्यानंतर ईशान्येश्वरीदेवी कुंभरूपांत रसायनाची तुंबडी देईल. ज्यामुळें शरीरांतील प्रत्येक रोग बरे होतील. दिव्यस्वरूप,

वज्रासमान दृढकाया, नवयौवन प्राप्त होईल. इतकेंच नव्हें तर कुठल्याहीं धातुला वितळवून त्यांत अल्पप्रमाणांत हे रसायन घातल्यानें धातुचें सोनें बनते. हा कुंभ मिळाल्यावर ब्राह्मण भोजन, कन्या भोजन यथाशक्तीप्रमाणें करून रसायनाचा धर्ममर्यादेप्रमाणें उपयोग करू शकता येतो.

१६.) अबु पर्वताच्या पूर्व दिशेला एक 'सामाय' नांवाची नदी वाहते. तिथें आश्रमपाद नांवाचे तीर्थ आहे. त्या तीर्थांत असलेल्या गौमुखी कुंडाच्या मातीला 'पंचगव्याबरोबर मिसळून अग्नींत तापविल्याबरोबर दिव्य धातू मिळतो. त्या धातूची आभुषणें घातल्यानें शरिर कठोर वज्रासारखें बनते. शस्त्रानें इजा होत नाही. पाण्यांत डूबत नाही. अग्नी जाळू शकत नाही; असें दिव्य शरिर प्राप्त होते.

१७.) अबु पर्वतावर 'मुहवर्ण' नांवाचे तीर्थ आहे. तिथे महेश्वर नांवाचे महादेवाचे मंदिर आहे. त्याच्या मागच्या भागांत एक मोठी गुहा आहे. त्यांत पुढे साडे-चार धनुष्यमाप गेल्यावर एक लहान कुंड लागते; त्यांत पाणी असेल, ते 'शैलोदक' नांवाने ओळखले जाते. हे पाणी दुर्गंधयुक्त असते. त्या पाण्यांत अर्बुदाचल मंत्राचे स्मरण करून हात बुडवा, ओंजळीत पाणी भरून, ''ॐ महामहेश्वराय, रुद्राय, निलाय, निलकंठाय शिवाय नम:॥'' हा मंत्र सत्तावीस वेळां म्हणून हे पाणी प्याल्यावर कायाकल्प होतो. वृद्ध, तरूण होतो. आंधळ्यानें डोळे धुतले तर त्याला दिव्यदृष्टी प्राप्त होते.

१८.) याच स्थळी मंदिराच्या बाहेर मैदानांत वडाचे एक झाड आहे; त्याची १४ पानें घेऊन, त्यांत आळशीची सात पाने घेऊन ती सर्व तिळांच्या तेलांत उकळविणे. पानें नरम झाली कीं, ताडाचा गुळ घालून पाक बनेल इतके बनवावे. तो पाक खाल्ल्यावर स्मरणशक्ती अद्भूत बनते. एकच वेळां पाहीलेले, ऐकलेले, बोललेले, वाचलेले सहज लक्षांत राहते. तसेंच अनेक लिपी समजण्याची शक्ती प्राप्त होते.

१९.) अबु पर्वताच्या पूर्व दिशेला एक लहान वसाहत 'नागा ईह'च्या नांवानें रहात आहे. हे लोक संसारी माणसांच्या संपर्कांत कधीहीं येत नाहीत. त्यांचे आयुष्य कमीतकमी ३००-४०० वर्षे इतके असते. या लोकांची वस्ती २००-२५० माणसांची आहे. अबुचे सिद्ध पुरुष फक्त या प्रजेच्या लोकांशी संपर्क साधू शकतात. ही प्रजा आजच्या युगाच्या दृष्टीनें खूपच मागे आहे असे समजलें जाते. परंतु सिद्धपदार्थ, वनस्पति, खनिजद्रव्ये, रस, समृद्धीत कल्पना करतां येणार नाही इतकी समर्थ आहे.

२०.) अबुवर 'शीतली' नांवाची नदी आहे. त्याच्या उथळ पाण्यांत आंगठ्याएवढे केसाळ दगड निघतात. ते बाहेर काढून त्यांचे बारीक चुर्ण पंचगव्यांत (पंचगव्य म्हणजे गाईचे तूप, मुत्र, शेण, दुध, दही) मिसळवून तीव्र अग्नीत तापविल्यावर चंद्रासारखा तेजस्वी धातू मिळतो. त्या धातूवर संस्कार केल्यावर तो तोंडांत ठेवल्याबरोबर आकाशगमन करतां येते. अदृश्य होता येते. हजार योजनें दूर क्षणांत जाता येते.

२१.) अबु पर्वताच्या पश्चिमेला कंकुरिका नांवाची नदी उत्तर दिशेला वहाते. ती नदी व तिच्या आसपासचा विस्तार अद्भूत आहे. तिथें 'जमनामा' नांवाचे एक तीर्थ आहे. ते 'धर्मतीर्थ' म्हणून ओळखले जाते. त्या तीर्थाच्या कुंडांत लाकडाच्या आकाराचे दगड मिळतात. ज्याला हठाग्नीत तापविल्यावर सुवर्ण मिळते. तिथून पूर्वेला श्रीमातेची देऊळे आहेत. तिथें संध्यासमयीं छायेंत एक कुंड आहे. त्यांत उतरून, मंदिराकडें पाठ फिरवून, कंबरेइतक्या पाण्यांत उभें राहून समोर दृष्टी केल्यावर पर्वताच्या कडेवर एक गुहा दिसते. तिचे ध्यान करून, त्यांत जायचे, त्या गुहेंत चौदा हांत आंत गेल्यावर एक शिवलिंग आहे. जे 'ईश्वरलिंग' नांवानें ओळखले जाते. त्याच्याजवळ एक रसकुंड आहे; त्याचा रस दिव्य, व प्रभावशाली आहे. त्या रसाला हात न लावतां नव्या तुंबडींत भरून घेणे. या रसाची एकच तुंबडी मनुष्याच्या जीवनाला या लोकांतून आणि परलोकांतून पार करते. मनुष्यजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत हा रस अद्भूत कार्यक्षमता दाखवतो. गुरूकृपेनेंच ते मिळवणे शक्य आहे. अन्यथा नाही.

२२.) अबुवर पश्चिम दिशेच्या पायथ्याशीं 'हरनशिला' नांवाचे गांव आहे. जिथे 'त्रंबावती' नदी पूर्व दिशेला वहाते. 'सारीका' तीर्थाच्या आश्रयानें ही वसाहत झालेली आहे. या नदीचे पाणी शुक्लपक्षांत वाढते आणि कृष्णपक्षांत कमी होते. शुक्लपक्षांतील अष्टमीला याचे पाणी घेणे, नंतर सारीका तीर्थावर असलेल्या वृक्षाचे पंचांग घेऊन ते पाण्यांत उकळवून त्याचा चोथा बनवायचा. या चोथ्याचें विधीपूर्वक पूजन करून देहसिद्धीं तसेंच लोहसिद्धीच्या कार्यासाठी उपयोगांत आणतात.

त्रंबावती नदीच्या मातीतून विपूल प्रमाणांत तांबे निघते. 'हस्तशीला' गांवाच्या उत्तर दिशेला सुंदरीखंडा नांवाचे वृक्ष होतात. ज्या वृक्षांच्या दुधांत कल्हई गरम केल्यावर चांदी बनते. तिथें एक शिवालय आहे; त्याच्याजवळ एक विचित्र प्रकारचे झाड होते. त्याची ४ बोटे एवढी साल घेऊन गाईच्या दुधांत घासून प्याल्यावर एक मुहूर्तापर्यंत बेशुद्ध झाल्यासारखें वाटते; नंतर शरीर वज्रासारखे मजबूत आणि दिव्य किर्तीमान बनते.

—इति अर्बुदाचल कल्प पूर्ण—

याप्रमाणें या कल्पाची नकलीनुसार २८ दिवस खूप परिश्रम करून अनुभव आला की, लायकी मिळवल्याशिवाय कांहीही मिळूं शकत नाही. अबुच्या परिभ्रमणाला आटोपते घेण्याचा निर्णय घेतल्यावर अबुच्या पायथ्याशीं रहात असलेल्या आदीवासींबरोबर एक वेळां बसलो होतो. ते स्वत:ची गेरी भाषा तसेंच बरोबर मिश्र मारवाडी भाषेंत बोलत होते. त्यांची कांही भाषा समजत होती, माझा हेतू जंगलांसंबंधी, वनस्पति, जडीबुटींसंबंधी माहीती मिळवण्याचा होता. या ५-६ भिल्ल लोकांत एक मेणराज उर्फ मेणू नांवाचा ३० वर्षांचा सडपातळ, मजबूत कसलेला भिल्ल होता. तो मला संबोधून म्हणाला, ''उद्यां रात्रीं पौर्णिमेची रात्र आहे. तुमची इच्छा असेल तर अगथीं गुहेजवळ कुंडांतून दुधाची धार सरळ शिवावर जावून पडते. मी माझ्या दृष्टीनें पाहीले आहे— तुम्हांला दाखवूं. मी क्षणभर त्याच्या डोळ्यांत पाहीले. त्याच्या भावांत व डोळ्यांत त्याने केलेला अनुभव तरळत होता. मी त्याला तयारी करायला सांगितली. दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजतां अगथी गुहेजवळ जायचे ठरविलें व वशिष्ठ आश्रमांत परत आलो. उद्यांच्या

कार्यक्रमांआधी माहीती गोळा करण्यासाठी आश्रमाच्या महंतांबरोबर थोडी चर्चा-विचारपूस केली; परंतु त्यांनीं स्वत: ती गोष्ट नुसतीं ऐकली होती; पाहीली नव्हती.

दुसऱ्या दिवशीं सकाळी दिनचर्या आटपून आदीवासींच्या वस्तीत गेलो. तिथे गेल्यावर मेणूंनी पूर्वतयारींत त्याचा तीरकमठा, एक बल्लम (भाल्यासारखें हत्यार) ज्याचे वरचे पातें सुमारे दिड फूट लांब असते. मक्याच्या भाकऱ्या, चटणीं, पाणी वगैरे घेऊन जाण्यासाठीं तयार करून ठेवले. आम्ही दोघे दुपारी १ वाजतां अगथी गुहेकडे रवाना झालो. ही गुहा वशिष्ठ आश्रमापासून दक्षिणेला अडिच ते तीन कि.मी. दूर आहे. मेणूला रस्ता चांगला परिचयाचा होता. थोडे दूर पायवाटेंने चाललो. मग पायवाट संपली. आतां फक्त जंगलांचा मार्ग काटावयांचा होता. सुमारें ४ वाजतां अगथी गुहेजवळ पोहोचलो. तेथील भौगोलीक परिस्थिती पहातां शिवमंदिर पुरातन काळांत बनविलेले असावे असें दिसून येत होते. त्या जागेला पाहून असे वाटत होते की, इथें चिकट पदार्थ सांडला जात असावा. लहान शिवमंदिर सुमारें १२ फूट उंच आणि ५ फूट लांब व ४ फूट रूंद होते. मध्यें सव्वा हात लांब विशाल काळ्या दगडाचें शिवबाण— तुटलेल्या जलधारेसहीत दिसत होते. मेणूला मी विचारले, ''रात्री किती वाजतां दुधाच्या धारा सुरू होतात; त्याविषयी कांही माहीती आहे का?'' त्यानें सांगितले, ''चंद्र डोक्यावर यायच्याआधीं मी त्या पाहील्या होत्या. वेळेची माहीती नाही.'' संध्याकाळ होत आली. मी व मेणू मंदिराच्या उजव्या बाजुला असलेल्या सुमारें ६० फूट उंच शिळेंवर मागच्या बाजुनें महत्प्रयासानें चढलो. मेणू नसतां तर ती शिळा मला चढतां आली नसती, संध्या स्वत:च्या पदराखाली जंगलांला झांकीत होती. रात्रीचा अंध:कार संध्याच्या त्या पदरांत स्वत:चा गडद रंग भरून रात्रीत रूपांतर करण्याचा प्रयत्न करीत होता. जंगलांतील संध्याकाळ अलौकीक, अद्भूत व आल्हाददायक असते. त्यावेळेस सिद्धलोक स्वत:च्या गुहेंत बसून धूनीमधून निघणाऱ्या अग्नीला पहांत त्यांत आहूती देऊन चिलीम पेटवून मेघनाद गर्जना करतात; 'संध्या की बेला, अमरकोट सिद्धी का मेला— संध्यातारीणी सब दु:ख निवारिणी; सिद्धो लेना चिलीम दातार....'

एका बाजुला वनराजींत परत फिरणाऱ्या पक्ष्यांचे मधूर कलरव, निशाचर प्राण्यांचा चोपदार कोल्हा आपल्या कोल्हेकुईने जणूं समस्त निशाचरांना रात्रीची वनसूचना देत आहे असे वाटे. हा सर्व कोलाहल घडी दोन घडीचाच असतो. मग नीरव शांतता—

मेणूनें शिळेवर लहानशीं शेकोटी पेटवली. त्याच्या प्रकाशांत मेणूनें बोचके सोडून मक्याच्या भाकऱ्या, चटणी वगैरे कपड्यावर ठेवले. भूक खूप लागल्यामुळें भाकरी-चटणीची मजा आनंदानें लुटली.

आतां वेळ काढायची होती. चंद्र मंद गतीनें आकाशांत फिरत होता. मेणूबरोबर हळूहळू इथल्यातिथल्या गोष्टी करू लागलो. मी पिशवीतून दूर्बिण बाहेर काढून निश्चीत जागी जुळवून तयार ठेवली. घड्याळांत साडेअकरा वाजले होते. मी मंदिर, शिळा आजुबाजूचे वातावरण न्याहाळत होतो तर मेणू मागील भागांत वारंवार पाहून जंगली जनावरावर लक्ष ठेवीत होता.

त्यावेळेस प्रचंड शंखानाद ऐकू येऊं लागला. माझ्या शरीरावर कांटा उभा राहीला. मी साशंक नजरेनें मेणूकडें पाहू लागलो. त्याचीपण अवस्था माझ्यासारखी झाली होती. माझ्या मनांत शंका-कुशंका येऊं लागल्या. ह्या भिल्लांने कुठल्या षड्यंत्रांत फसविलें तर नाही नां? कां नाहीतर इथल्या सिद्ध महात्म्यांना आमची चाहूल लागली असावी; त्यामुळें ते सावध करण्यांसाठीं शंखनाद करीत असावे. ह्या विचारानें मन व्याकुळ झाले. आतां जे कांही होईल ते असे ठरवून मी गुरूमहाराजांचे व इष्टदेवतेचे स्मरण केले. शंखनाद चालूच होता. मंदिरांत, झांज, घंटा, नौबत, नगारा वाजण्यास सुरूवात झाली. तालबद्धतेनें सर्व वाजंत्री वाजत होती. त्याचवेळीं शिवमंदिरासमोरील मोठा खडक जणूं बाजूला झाला होता. मी दूर्बिण घेऊन निरीक्षण केले. 'खुल जा सिमसिम सारखा प्रकार घडला. तो खडक जवळजवळ तीन फूट बाजूला सरकून थांबला. त्याच्यामागून अनुक्रमे एक मोठ्या कायेचा महात्मा एका हातांत पूजेची थाळी, दूसऱ्या हातांत धूपदाणी घेऊन बाहेर पडला. त्याच्या मागून २ महात्मा मशाली घेऊन बाहेर आले. त्यांच्यामागून ४ महात्मा एक उघडी पालखी घेऊन बाहेर आले. त्या पालखींत एक अतिवृद्ध असे महात्मा विराजमान होते. ज्यांचे मुख मंदिराकडे होते. पालखीच्या मागून २ महात्मा कमंडलू, पूजेची थाळी घेऊन येत होते. सर्वच महात्मा आडदांड व लंगोटीत होते. एकसारखा बांधा, एकसारखी उंची, भव्य मुखमुद्रा, मोकळ्या जटां सर्व अद्भूत वाटत होते. दूर्बिणींतून सर्व स्पष्ट दिसत होते. ते पुढें आले त्याच वेळी मंदिराच्या बाहेरील शिळेंतील छिद्रातून श्वेत दूधाचीं धार सुरू होऊन सरळ मंदिरांतील शिवबाणाला अभिषेक करीत होती. महात्मा वृंद पुढें आले. धूपाचा अद्भूत सुगंध वातावरणांत अलौकीक पवित्रता भरीत होता. सर्वांत पुढे असलेल्या महात्म्यांनीं मंदिरांत जाऊन आरती पूजा केली. त्यानंतर पालखीला दूधाच्या धारेजवळ शिळेवर ठेवण्यांत आली. त्यांत वृद्ध महात्मा विराजमान होते. सर्व इतर महात्मा पालखीजवळ येऊन वृद्ध महात्म्यांना फूलसुगंध, पुष्पहार घालून आरती म्हणून प्रदक्षिणा घालून पूजा-अर्चा करीत होते. मशालीच्या प्रकाशांत सर्व स्पष्ट दिसत होते.

पालखीत असलेल्या महात्मयांचे निरीक्षण केले; ते समाधींत होते की, मृत्यू पावले होते की, जिवन्त होते— कांहीच समजत नव्हते. त्यांची दाढी, मिशा पण जटेंत रूपान्तर झाल्या होत्या. चेहरा तेज:पूंज वाटत होता. शरीर एकदम सुकलेले, दुबळे वाटत होते. दंडाच्या, हाताच्या, शिरा स्पष्ट दिसत होत्या. समाधीमुद्रेंत पद्मासन घालून ते बसले होते. ते श्वासोच्छ्वास करीत होतें की, काय ते ही समजत नव्हते. त्यांचे दर्शन अद्भूत होते. हा कार्यक्रम पाऊण तास चालला. त्यानंतर एका साधुनें दुधाच्या धारेला कमंडलूत झेलून कमंडलू भरून घेतले; नंतर आले तसेंच परत शिळेमागे गेले व शिळा आपोआप शटरसारखी बंद होऊन मुळ जागेवर आली. शंखनाद, झांज, नौबती, नगारा— सर्व आवाज शांत झाले; पण माझ्या डोक्यांत ते ऐकूच येत होते. मी मेणूकडे पाहून म्हणालो, ''मुर्खा, तुला सर्व हे माहीत असतांना मला आधी कां नाही सांगितले?'' त्यानें शपथपूर्वक सांगितले

कीं, त्यानें हे सर्व आजच पाहीले. मी फक्त दूधाची धारच पाहीली होती. ह्या प्रसंगानें विचारांची माळ सुरु झाली. हे काय रहस्य आहे? ते अनेक विचाराअन्तीसुद्धां समजले नाही.

सकाळीं शिळेवरून उतरून मंदिरांत गेलो, तेथें थोडे सुकलेले, थोडे सुकत येणारे दूध चारीबाजूला पसरलेले दिसत होते. दिव्यपुष्पपूजा पसरलेली होती. मी प्रेमानें श्रद्धापूर्वक पूजा म्हणून एक फूल मस्तकाला लावून जवळ ठेवले. मनोमनीं शंकर भगवानांचे असे दर्शन घडल्याबद्दल खूप आभार मानले.

तेथून मी व मेणू परतलो. मेणूला यथाशक्तीं रक्कम देऊन व त्याचे खूप आभार मानून मी सुरेंद्रनगरला परतलो. घरी आल्यावर झालेल्या प्रसंगाची नोंद करण्यासाठी, तारीख, वेळ व तिथी पाहीली तेव्हां समजले कीं ती गुरूपौर्णिमेची रात्र होती. मी माझ्या मनाचे समाधानासाठीं मानले की महात्मालोक गुरूपौर्णिमेचा विधी करण्यासाठी तिथे येतात.

वाचकमित्रांनो, आजही ते स्थळ हयात आहे. दर पौर्णिमेला दुधाची धार शिवलिंगाला अभिषेक करते. इच्छा झाली तर अनुभव घ्या.

कबीरसाहेब म्हणतात, ''हमनें अपना घर जलाया, और लिया – पलिता हाथ.'' – 'तुमभी अपना घर जलाओ, फिर चलो हमारे साथ.'' म्हणजे शरीररूपीं घरांत असलेल्या अज्ञात भयाला जाळून टाका.

उदा. – अनुभव घेण्यासाठीं कांही अनिष्ट झाले तर? माझें अनिष्ट झाले तर पत्नी, बालकांचे काय? कुटुंब कारभाराचे काय? असे अनेक विचार मनोबलाला दुर्बल बनवतात. पोहायला शिकायचे पण पाण्यांत उडी मारायची नाही; जर पोहोण्याची इच्छा असेल तर पाण्यांत उडी मारावीच लागेल.

## अलख झोळी – पलक खजाना

अर्बुदाचल कल्पाचे संशोधन केल्यानंतर मी एकदां नागाजीनां भेटण्यांस मांडवला गेलो. मला पाहून ते हंसू लागले. मी त्यांना विचारले, ''कां! हसतां आपण?'' त्यावर ते मोठ्यांने हंसून म्हणाले, ''सांगा कशी काय झाली अर्बुदाचलची यात्रा?'' मी त्यांना म्हणालो, आपण ही गोष्ट जाणतां तरी मला हंसता हे स्पष्ट आहे.'' मला मध्येच अडवून म्हणाले, ''काय सिद्ध महात्म्यांचा गुरूपूजनाच्या दर्शनाचा प्रसंग सुंदर नाही वाटला?''. नागाजींच्या खुलाशानें मला आशा वाटली की, जरूर आतां मला त्याविषयी जास्त माहीती मिळेल. मी त्यांना विनंती केली की, ''आपण या प्रसंगाविषयी जे कांही जाणत असाल, त्याविषयी मला स्पष्ट सांगून माझें समाधान करा.''

नागाजी गंभीर झाले व मग थोड्यावेळांने म्हणाले, ''सिद्ध लोकच जाणूं शकतात, मी कसा त्यांच्या मायेला समजू शकेन? तसेंच त्या लोकांचे गुप्त रहस्य अयोग्य माणसाकडे प्रकट करणें उचित नाही.'' मी समजलो की ते कांही कारणांमुळे या प्रसंगाला सांगू शकत नव्हते. मी जास्त आग्रह केला नाही.

त्यांनी सहजपणें मला विचारले, ''मी दिलेल्या कल्पामुळे तुम्हांला खूप कष्ट पडले व खर्च पण जास्त झाला खरे नां?'' मी म्हणालो, ''खर्च व वेळ अनुभूतीसाठी अनिवार्य आहे हे मी समजतो. मग कधी खर्च कमी; जास्त अनुभूती; तर कधी जास्त खर्च थोडी अनुभूती होते. पण त्यांत कांही जमा-उधारीचा हिशोब ठेवतां येत नाही!''

त्यांनी लहान पिशवींतून गांजा काढून मला दिला. गांजा बनवायला सांगून ते गुहेच्या बाहेर गेले. थोड्यावेळांने ते एक दशनामी झोळी घेऊन आले. ती झोळी मला दाखवित म्हणाले, ''घ्या! ही झोळी तुमच्याजवळ ठेवा. या झोळीला सिद्ध केलेली वेळ पूर्ण व्हायला तीन महिन्याचा अवकाश आहे, म्हणून मी ती तुम्हांला देत आहे. रोज सकाळी आंघोळ करून धूप दाखवून ह्या झोळींत उजव्या हातांची फक्त २ बोटें घालून १०० रू. ची नोट काढून घ्या, मग दुसऱ्या दिवशीं असेंच करून १०० रू. ची नोट काढा. एका दिवसांत एका वेळीच झोळीत हात घाला. त्यांत डोके घालून पाहू नका. नाहीतर सजेला पात्र व्हाल.'' मी स्तब्ध बनून नागाजींचे बोलणें ऐकत होतो. त्यांनी माझ्या मनांतील गोंधळ समजून सांगितले, ''राजाची फौज आणि साधुची मौज कुठे कधीं आणि कुणावर चढेल ते सांगतां येत नाही. म्हणून या झोळींचा अनुभव घ्या.''

आतां या झोळीच्या संदर्भात गुढ रहस्ये काय आहेत ते पाहू या –

प्रत्येक आखाड्याचे साधु स्वतःच्या डाव्या खांद्यावर झोळी ठेवतात. त्या झोळीचा प्रकार सांप्रदायाशीं जोडलेला आहे. साधुसमाजांत झोळीला खूप महत्त्व आहे. त्याविषयी प्रसिद्ध पंक्ती अशा –

''अलख झोली पलक खजाना। भुख लगे तो माँग के खाना॥'' याचा सरळ अर्थ असा की, 'अलख दरबारासारखी झोळी ज्यांत क्षणांत ह्या लोकाची व परलोकाची रहस्ये गुपित ठेवण्याची भरपूर शक्ती आहे. क्षणांतच प्रत्येक प्रकारचे वैभव आणि ऐश्वर्य निर्माण करण्याचे अद्भूत तत्त्व ज्यांत संग्रहीत झाले आहे त्या झोळीला सिद्धपुरूषच ठेवू शकतात, जे स्वतःचे उदरभरण भिक्षावृत्तींनेंच करतात. ते किती निर्मोही, गंभीर, शांतचित्त, भजनानन्दी आणि निस्पृही असले पाहीजेत. थोडक्यांत प्रत्येक भौतीक सुखाला क्षणांत देणारी शक्ती ज्या झोळींत असेल, त्या झोळीला घेणारा साधु त्याचा उपयोग स्वतःसाठी न करतां धर्ममर्यादेची रक्षा करण्यासाठीं उपयोग करतो; तोच खऱ्या अर्थानें महान होय.

झोळीचा उद्भवसमय व त्याचा अविष्कार याबाबतींत माहीती मिळवणे कठीण. परंतु 'शिव-स्वरोदय', 'दत्तबावनी', केतुरहस्यपटल, संकेतमणी इत्यादी ग्रंथाद्वारा तसेंच संतोक्तीवर आधारीत माहीती उपलब्ध आहे.

अनेक गुप्त रहस्यांचे आश्रयस्थान झोळी आहे. अनंत ऋद्धी-सिद्धींचे उद्भवस्थान झोळी आहे. सर्वांत प्रथम आद्यदेव भगवान शंकरानीं ऋषी-मुनीनां उदर झोळींचे रहस्य

सांगून त्याचा उपयोग करण्याचीं पद्धती समजावली. ऋषी-मुनी-योगी वगैरे स्वत:च्या जठराचा झोळीप्रमाणें उपयोग करीत. अनेक गुप्त रहस्ये स्वत:च्या उदरांत समाविष्ट करीत आणि वेळ येतांच त्याचा उपयोग करीत. आपली शास्त्रे, पुराणे, उपनिषदे याचा पुरावा सांगतात.

काळानुसार त्यांत फेरफार झाला. वृक्षाची साल, चामडे (सर्प, मृग, चित्ता, तसेंच बर्फाच्छादित प्रदेशांतील प्राणी इ. चामडे.) लोकर इत्यादी प्रकारची साधने, झोळीसाठी वापरीत. झोळी बनविण्याची परंपरा आजही तशीच आहे. त्याची बनविण्याची कला ही अजुनही टिकून आहे. जेव्हां कुणी साधु सिद्ध झोळी निर्माण करण्याचा संकल्प करतो तेव्हां निश्चीत नक्षत्रांत बरोबर मापाचे कापड कापून सांप्रदायानुरूप आकार तयार करण्यांत येतो. त्यानंतर लोखंड, **चांदी, बावळ्या**– समुद्रातील स्फटिकाचा सुईसारखा उपयोग करण्यांत येतो. ज्या प्रकारचीं झोळी निर्माण करावयाची असेल त्याच्या अनुरूप गवताचे तंतु, ठराविक प्राण्याच्या शरीरांवरील केस दोऱ्यासाठी वापरण्यांत येतात. त्या झोळीला सिद्ध करण्यास प्रत्येक टांक्याबरोबर मंत्र उच्चारला जातो. नक्की केलेल्या जागेपेक्षां जास्त जागेंत जायचे नाही; झोपायचे नाही, आहारांत मर्यादा बाळगायची. एकाग्र चित्तानें हे कार्य गुप्तपणें करायचे. जेव्हां झोळी संपूर्ण तयार होते, तेव्हां तिला अभिमंत्रीत करण्यासाठी तसेंच ऋद्धी-सिद्धी ठेवण्यासाठीं गुरूला देण्यांत येते. गुरू त्यांत ऋद्धी-सिद्धी ठेवून शिष्याला ती झोळी परत देतात.

या झोळीला त्यानंतर १२ वर्षे अखंड नियमानुसार डाव्या खांद्यावर ठेवण्यांत येते. दिनचर्येच्या प्रत्येक वेळी ती बरोबर असते. या झोळीत प्रतिकरूपें दहाद्वारे असतात. ज्यांत दहावे द्वार गुप्त असते. ज्याचे गुपित गुरुपरंपरेनुसार सांभाळले जाते. ज्याप्रमाणे मनुष्यजातीसाठीं दहावे द्वार गुप्त ठेवण्यांत येते त्याप्रमाणें झोळीचे दहावें द्वारसुद्धां गुप्त ठेवले जाते. दहा दिशा, चार खुंट, त्रिगुणीमाया, ब्रह्म, द्वैत-अद्वैत, षड्दर्शन, तंत्रयंत्रच्या सुयोगानें झोळीचे निर्माण होते.

साधु स्वत:च्या जरूरीच्या वस्तू, स्वत:च्या अनुभवांचा अर्क, तसेंच आलोक व परलोकाला सफल करण्याचीं सामग्री ठेवतात. परोपकारार्थे त्याचा वेळेनुसार उपयोगही केला जातो.

दसनामी साधु, नाथ सांप्रदायाचें साधु, तसेंच वैष्णव, सांप्रदायाचे बैरागी साधु मोठ्या प्रमाणांत झोळी वापरतात. जे साधु अपरिग्रहवृत्तीत, आकाशवृत्तीत रहातात ते झोळी वापरित नाही. झोळींची नांवे: (१) दत्त झोळी, (२) निरंजनी झोळी, भैरव झोळी, दसनाम झोळी, अलख झोळी, अखंड झोळी, बैरागी झोळी, माया झोळी, सिद्ध झोळी, भिक्षा झोळी याप्रकारें नांव, गुण आणि अर्थभेदानें ओळखल्या जातात.

**दत्त झोळी:** जाडया कपडयाला समचौरस– सव्वाहात घेऊन त्याच्या ४ खुणा (कोने), एकाच दिशेंत वाळून शिवण्यांत येते. त्यांत आटी-गांठीचे वेगवेगळे खण बनविण्यांत येतात. एक दिशेला वाळलेल्या खुणाबरोबर २ पट्ट्या जोडण्यांत येतात. अवधूत लोक ही झोळी वापरतात.

**निरंजन झोळी: एकान्तवासी साधु ही वापरतात. त्याचें खण दोऱ्यानें बनविलेले असतात. बनविण्याची पद्धत दत्त झोळींप्रमाणेच असते, पण आकार लहान असतो. या झोळीचा जास्त महिमा नाही कारण तिला जास्त गुप्त ठेवण्यांत येते.**

**भैरव झोळी:** ही झोळी मच्छींद्रनाथ, तसेच गोरक्षनाथ यांच्यावेळी अस्तित्त्वांत आली. झोळी– कंडा शब्द प्रचारांत आला. ही झोळी सिद्ध झाल्यावर स्वयं-संचालीत कार्यक्षमतां तिच्यात येते. त्यामागें मंत्रशक्तीचे बळ असते. भैरव झोळी दोन प्रकारची असते. मोठी व लहान. मोठ्या झोळींत खप्पर, चिलीम, साफी, लंगोटी तसेंच अन्य जरूरी वस्तू ठेवण्यांत येतात. नाथ सांप्रदायाच्या खूप महत्त्वपूर्ण सामग्री त्यांत संचित केलेल्या असतात. झोळीच्या गांठीजवळ लाल ओढणी, दर्शनी तुंबडी, रंगीत कपडा, कोडी, शंख, वनस्पति, तावीज इ. वस्तू लटकविलेल्या असतात.

लहान झोळींत फक्त सिद्ध भस्मच ठेवण्यांत येते फक्त दोन बोटं जावूं शकतील इतकींच त्यांच्यात जागा असते. यांत ठेवण्यांत येणारे भस्म शारीरिक परितापापासून मुक्ती देणारे असते, तसेंच भूतबाधा, ग्रहपीडा इत्यादी विघ्ने तत्काळ दूर करते. या भस्माला सिद्ध करण्यासाठी खूप वेळ लागतो. ते जीवनांत फक्त एकदांच बनविले जाते. त्या झोळीला साधुबरोबरच समाधींत, समाधीं घेतेवेळी पुरण्यांत येते.

**दसनामी झोळी:** या झोळीला शंभुदली साधु, गिरीपुरी, भारती, अरण्य, वन, पर्वत, सागर, आश्रम, तीर्थ, सरस्वती इ. शाखांचे साधु वापरतात. याची बनविण्याची पद्धती दत्त झोळीसारखींच आहे; पण फरक इतकांच की, दत्त झोळींत ३ आकड्यांला जास्त महत्त्व दिले जाते, तर दसनाम झोळींत १० आकडा जास्त लक्षांत ठेवला जातो. वेगळ्या शाखांप्रमाणें साधु सांप्रदायिक चिन्हे, अंकीत केली जातात. तसेंच रूद्राक्षपण दोऱ्यांने भरतात, रूद्राक्षांची संख्या पण १०च असते. जे त्यांच्या कराराचे व समभावनेंचे प्रतिक मानण्यांत येते. शंभूदल स्वत:च्या झोळींत रूद्राक्षाचा उपयोग करतात. तर रामदली स्वत:च्या झोळींत तुळशीचा उपयोग करतात.

**अलख झोळी:** या झोळीची वैशिष्टय असे की, ती गुरूप्रणालीकेच्या परंपरेनुसार शिष्याला वारसाहक्काने मिळते. तिला खांद्यावर न ठेवतां गुप्त ठिकाणीं ठेवून तिची पूजा करण्यांत येते. ही झोळी बनविणाऱ्या मुळ पुरूषापासून शेवटच्या शिष्यापर्यंत प्रत्येकाची उपस्थिती ठेवण्यासाठीची सुत्रे त्यांत ठेवण्यांत येतात. नवनाथ व चौऱ्यांशी सिद्धांजवळ ही झोळी असल्याचें मानण्यांत येते. या झोळीच्या माध्यमांद्वारा ते एकमेकांच्या संपर्कात रहातात, तरीही त्या लोकांना एक दुसऱ्याच्या संपर्कात रहाण्यासाठी अनेक गती आहेत; परंतु ही झोळी परंपरागत साधन म्हणून मानण्यांत येते.

**अखंड झोळी:** या झोळीविषयी स्पष्ट

व आधारभूत माहीती उपलब्ध नाही. फक्त संतोक्तीच्या आधारे इतकेंच समजतें की, अखंड झोळी नांवाची एक झोळी आहे.

**वैरागी झोळी :** या झोळीचा उपयोग फक्त रामादली, वैष्णसाधु, नागा, त्यागी, तपस्वी करतात. ही झोळी २-३ प्रकारानें बनविण्यांत येते. वैरागी बटवापण एक प्रकारची झोळी आहे. या झोळींत ६ खणांपासून २४ खण असतात. ते सरळ, वाकडे, आडवे आणि गुप्तरितीनें रचलेले असतात. वैरागी सिद्ध जेव्हां गुरूआज्ञेनुसार देशाटनासाठी निघतो तेव्हां त्याला संपूर्णपणें आपल्या झोळीवरच निर्भर रहावे लागते.

**माया झोळी :** या झोळींत दिव्य वनस्पति, ज्यामुळें आकाश गमन, शीघ्रपरिभ्रमण, दिशाबंधन, ऋतुबंधन, सुवर्णक्रिया, कायाकल्प इत्यादी होऊं शकतो. तसेच अद्भूत गोष्टी ठेवण्यांत येतात.

**सिद्ध झोळी :** या झोळीची व्याख्या अशाप्रकारे आहे कीं, कोठल्याही अद्भूत सिद्धीला, संग्रह करण्यासाठी, ज्या झोळीची निर्मिती करण्यांत आली ती **'सिद्ध झोळी'**. या झोळींत ठेवलेली सिद्ध वस्तु अथवा तंत्रसिद्धी त्यांत ठेवल्यावर क्षीण होत नाही, अशुद्ध होत नाही. कुठल्याही मायावी बळानें त्यांचा नाश होत नाही. सिद्ध झोळी म्हणजे एकप्रकारचे सिद्धपात्रच! सिद्ध व सिद्ध झोळी दोन्ही एक दुसऱ्यांना पुरक आहेंत. सिद्धपुरूष सिद्धझोळींत सिद्ध वस्तूला ठेवून निश्चींतपणे तपस्या करू शकतात. ही सिद्ध झोळी स्वत:चे रक्षण स्वत: करू शकते.

**भिक्षा झोळी :** या झोळीचा बहूतांशी वापर साधु माधुकरी भिक्षेकरतां वापरतात. वर्षांपूर्वीचे असे प्रसंग आहेत की सिद्धपुरूष भिक्षा झोळीला भिक्षा ग्रहण करण्यांस पाठवीत. ही झोळी भिक्षा ग्रहण करून स्वत:हून परत यायची. ही झोळी साध्या कापडापासून बनविलेली असते. याच्याविषयी असे म्हणतात, "एक निरंजन २ सुखी, तीन की खटपट और ४ का परिवार!" साधु एकटा असेल तर तो मस्तीत रहातो. २ साधु एकत्र राहतील तर सुखानें राहू शकतील; पण सिद्ध व साधक असतील तर तिघांमध्ये कांहीतरी खटपट सुरू होईल, आणि ४ एकत्र आले तर परिवारच होईल मग घरसंसार सोडून साधु कशाला बनायचे?

अर्थात् साधु जमातीत खूप साधुंचा समावेश केला जातो. त्यांतपण याचप्रमाणें जरूरीपुरती रचना करण्यांत येते. सौराष्ट्रांत, याविषयीं खूप उदा. पहाण्यांत येतात. जिथे साधुसमाजाद्वारा, संतभक्तांद्वारा, अन्नक्षेत्र चालविण्यांत येते. तिथे ह्या झोळीचा महिमा प्रसिद्ध आहे. उदा– परबची जागा, संत देवीदास, पाळीयादचे विसामण भगत, वीरपूर येथील जलाराम बाप्पा; सत्ताधार शामजी भगत इत्यादी स्थळीं झोळीचा अपूर्व प्रभाव आजही अनुभवायला मिळतो. झोळीविषयी आपण थोडी माहीती बघितली, आतां मुळ गोष्टींकडे वळूं.

नागाजींनी दिलेली झोळी कुठल्या प्रकारची होती हे तेच जाणे! परंतु ३ महिने व १० दिवस रोज त्यांतून एक १००/- रू.ची नोट मी मिळवीत होतो. कधी खात्री करण्यासाठी झोळींतून जेव्हां नोट बाहेर काढावयाची असे तेव्हां बोटाच्या स्पर्शाद्वारा मी जाणायचा प्रयत्न करीत असे. असे की, ठराविक मोजलेली रक्कम तर नां ठेवली? पण स्पर्शाद्वारा समाधान व्हायचे की, त्यांत एकच नोट आहे; दुसरी नाही. आजही ती झोळी माझ्याकडें आहे, परंतु आतां त्यांतून १००/- रू.ची नोट निघत नाही, फक्त तिच्या दर्शनानें समाधान मानावे लागते.

नागाजीनां जेव्हां मी या झोळी रहस्य जाणून देण्याची विनंती केली, तेव्हां ते म्हणाले, "ही झोळी २ वर्षांपूर्वीपासून सिद्ध करून माझ्याजवळ पडून होती, मी कदाचित् ५-६ वेळांच तिचा उपयोग केला, परंतु तुमच्या संशोधनवृत्तीला उत्साह मिळण्यासाठी ती तुम्हांला देण्यांत आली, ती सिद्ध करण्याच्या भानगडींत पडूं नका. तुमचा गृहस्थधर्म आहे. त्यांत व्यवसायाद्वाराच अर्थार्जन करण्याचा आग्रह ठेवा; त्यांतच तुमचे श्रेय आहे.

नागाजींच्या सहवासांत एका चर्चेत साधुशाही शासन चालविण्याच्या पद्धतीविषयी माहीती समजली, त्यांत मुख्यत्त्वे ४ प्रकारच्या पद्धती असतात. प्रत्येक साधु या ४ प्रकारच्या क्रियेनुसार समाजाबरोबर संपर्क साधतात. (१) भजनानन्दी, (२) आकाशवृत्तीवर शासन चालविणारे, (२) जादुगर (इलमी), (३) किमयागार, (४) औषधविज्ञान जाणणारे –

**(१) भजनानन्दी :** हे साधु नेहमी भजन-तपस्येंत लीन असतात, त्यांच्या प्रभावानें त्यांच्या गरजा समाजाद्वारा आपोंआप पूर्ण होतात. या प्रकारचें साधु समाजसंपर्कात असतात. तेव्हां समाजाला धर्मोपदेश, आचारविचार व व्यवहारज्ञानाचा बोध आश्वासन देऊन, धर्मसंरक्षण, इ. कामें करतात, जेव्हां कांही साधु समाजापासून दूर राहून निजानंदांत मग्न असतात, तेव्हां निसर्ग त्यांच्या गरजा भागवतो.

**(२) जादुगर (इलमी) :** अशाप्रकारचे साधुसमाजाला ऋणमुक्त करण्यांस, समाजाला मानसिक तसेंच, शारीरिक यातनांपासून मुक्त करण्यासाठी मंत्रतंत्राचा प्रयोग करून सेवा करतात. परोपकारार्थे विद्येचा सदूपयोग करून साधुजीवनाला धन्य करतात. आणि भजन-तपस्येंत लिन रहातात. या क्रियेद्वारा ते स्वत:चे धर्म-शासन चालवतात.

**(३) किमयागार साधु :** भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारच्या कलेंत किमयागारीची कला सर्वात उच्च कला मानण्यांत आली आहे. आदी-अनादीकालापासून चालत आलेल्या या अद्भूत कलेचा अर्थ आहे हीन श्रेणीच्या धातूंना उच्च श्रेणीचे धातू बनविण्याची सरळ पद्धती. निसर्गपण हेंच कार्य करतो. हे कार्य करण्यांस प्रकृतीला हजारों वर्षे लागतात, आणि किमयागार ज्याला 'रससिद्ध' नांवाने ओळखले जाते, तो प्रकृतीच्या तत्त्वांची मदत घेऊन थोड्यावेळांत हे कार्य करू शकतो.

जो साधु उत्तर-खंडांचा असेल आणि भिक्षावृत्तीचा आग्रह न ठेवतां तो गुरूपरंपरेच्या प्रणालीकेतून रसविद्या ग्रहण

करतो आणि स्वत:चे शासन रसविद्येद्वारा म्हणजेंच सुवर्ण, चांदीसारखा उच्च धातूं बनविणे हे सरलतेंने करतो. ही क्रिया जाणणारा साधु या क्रियेला अतिशय गुप्त ठेवतो. प्रसंगानुसार या क्रियेद्वारा धर्ममर्यादा सांभाळतो; असे साधू समाजसंपर्कातही रहातात, व अलिप्त पण 'रहातात.

**(४) औषधविज्ञान जाणणारे:** साधुसमाजांत एक प्रकार असाही आहे कीं, जे अनेक प्रकारच्या जडीबुटीद्वारां अनेक प्रकारच्या प्राचीन आयुर्वेदाच्या सिद्धहस्त प्रयोगांद्वारा लोकांना रोग-कष्टांपासून मुक्ती देतात. त्यामुळें लोकसंपर्कात राहून सेवा करण्याची सार्थकता अनुभवतात. तसेंच स्वशासन सरळतेनें चालवतात.

असे हे ४ प्रकार आहेत. प्रथम आपण झोळीविषयीं माहीती पाहीली, त्यांत एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, प्रत्येक साधुकडे सिद्ध केलेली झोळी असलीच पाहीजे हे जरूरी नाही. साधुसमाजांतील रहस्ये समजणे, व उकलणें म्हणजें महासागराची खोली तपासण्यासारखे आहे. जे कधी शक्य नसेल व कठीण तर खरेच! आपल्या देशांत अनेक सांप्रदाय आहेत. त्याप्रमाणे त्यांचे अनुयायी व साधु आहेत. प्रत्येक संप्रदाय स्वत:च्या साधुमुळे व अनुयायांमुळे टिकू शकतो. आज प्रत्येक सांप्रदायांत अनेक प्रकारच्या अटीतटी, विटंबना, घोटाळें, शिष्यांत व साधूंत दिसून येतात. मुळ सिद्धांत व गुढार्थाकडें दृष्टी न ठेवतां लौकीक व्यवहाराचे त्यांना जास्त आकर्षण आहे. त्यामुळे आपल्याला असा अनुभव येतो की, किती फ़सवाफसवी, अंधाधुंदी, अंधविश्वास व गैरसमज निर्माण झाले आहेत, याबाबतींत दुसरीही कारणें आहेत, आपल्या समाजानें परोक्ष व अपरोक्षरित्या ३ श्रेणी स्वीकारल्या आहेत.

**(१) उच्चवर्ग:** जो आर्थीकदृष्ट्या प्रबल आहे, बुद्धीजीवी आहे, व समाजांत उच्च स्थानीं आहे.

**(२) मध्यमवर्ग:** जो स्व-स्तरावरून खाली जावूं शकत नाही आणि स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी तसेंच उच्च श्रेणींत परावर्तनासाठीं नेहमी प्रयत्नशील असतो.

**(३) खालचा वर्ग:** ज्याला दुसऱ्या कुठल्याहीं गोष्टीपेक्षां स्वत:च्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सतावतो व तो प्रथम त्याला सोडविण्यासाठीं धडपडत असतो.

आतां या ३ श्रेणीतील लोक कुठल्या ना कुठल्या प्रकारें साधुसमाजाच्या संपर्कात रहातच असतात व स्वत:च्या श्रेणीनुसार साधुंच्या परिचयांत येण्याचे पसंत करतात. उच्चवर्ग नेहमी उच्चवर्गातील साधुंकडे जातो, तर तो खालच्या वर्गाच्या साधुकडे ढुंकूनही पहाणार नाही. मध्यमवर्गाच्या दृष्टीत आर्थीक तसेंच धंद्याच्या परिस्थितीला वेग मिळेल अशा साधुकडे जाण्याची रूची असते. कधीकधी मध्यम वर्गातील समाज समजाविनां अनुकरण उच्च श्रेणींत येण्याकरतां करतो, त्यामुळें मनोमन बेचैन होतो. निम्न वर्ग नेहमी लॉटरी, सट्टा, नोकरी इ. प्रश्नांत गुरफटतो. उदरनिर्वाह व जीवन टिकवण्याचाच मुख्य प्रश्न असतो; तेथें तत्त्वचिंतनाला स्थान कुठले? अर्थात् प्रत्येक प्रकारांत अपवाद असतातच! परंतु मोठ्या प्रमाणावर अशी परिस्थिती असते.

आतां कुठल्या कोटीचा साधू सिद्ध आहे? हे समजण्यासाठी साधारणपणें आपण आपल्या ठराविक पद्धतीनें विचार करत असतो, परंतु तो नेहमी बरोबरच असेल असे नाही. आपला समाज जेव्हां अध्यात्माचे अक्षर घोटविण्यांस सुरूवात करतो; तेव्हां प्रथम प्रभावीत करणाऱ्या व्यक्तींत तो रंगून जातो. कधीकधीं योग्य सद्‌गुरूच्या प्रतापानें तरून जातो; तर कधीं चमत्काराला भुलून अडकून पडतो.

एकच गोष्ट महत्त्वाची म्हणजे, 'आचरण!' महापुरूषांनी कलीयुगाला 'कर्मयुग' म्हटले आहे. या कर्मयुगांत भक्ती वा नामस्मरण हाच मार्ग सोपा व सरळ आहे. इतर साधनें कठीण आहेत.

**''कलीयुग केवल नाम आधारा
सुमिर सुमिर भव उतरो पारा''**

**समाप्त**



# 'ते कीर अनाम अजाती'

– साईशा

**मा**नवाचे कुतूहल ही एक मोठी विलक्षण चीज आहे. मानवाला नेहमीच अज्ञात, गूढ व चमत्कारिक, किंबहुना आपल्या आवाक्याबाहेरच्या अशा प्रत्येक गोष्टींबद्दल विलक्षण आकर्षण वाटत आलेले आहे. त्या आकर्षणापोटी, कुतूहलापोटी तो एखाद्या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन, ते तडीस नेण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्या प्रयत्नांचे फळ त्याला बव्हंशी मिळतेही. पण काही गोष्टी ह्या इतक्या गूढ, इतक्या विलक्षण व चमत्कारिक असतात की त्याविषयी प्रयत्न करूनही हाती काहीच लागू शकत नाही. त्या गोष्टी आणि ते प्रश्न सदैव अनुत्तरितच रहातात आणि तेच योग्य असते.

या पृथ्वीतलावर सत्पात्र 'शिरडी' या ग्रामी श्री साईबाबा हे संतावतंस, प्रत्यक्ष यज्ञनारायण यज्ञमूर्ती, ज्ञानमूर्ती, परमात्म कैवल्यमूर्ती ह्या स्वरूपात गेल्या शतकाच्या उत्तरार्धात अवतीर्ण झाले. अशा परमात्ममूर्तीस खरे तर नाव, गाव, जात, धर्म, वर्ण, आश्रम यांपैकी काहीच नसते. पण प्रत्यक्ष सगुण रूपात अवतरल्यावर त्यांना 'लोकोपचारास्तव' ह्या लौकिक गोष्टींची गरज भासते. त्यासाठी त्यांना मग एखादा वर्ण, एखादी जात, एखादा धर्म धारण करावा लागतो. श्री संतचूडामणी साईबाबा हे याच कोटीतील सत्पुरूष असल्याकारणाने, त्यांच्याकडूनही या क्षुद्र मानवप्राण्याने ह्या लौकिक गोष्टींची अपेक्षा केली नाही तरच नवल! त्यामुळे बाबांनी ज्यांना आपल्याजवळ खेचून आणले अशा बाबांच्या सहवासाचा प्रत्यक्ष लाभ व आशीर्वाद घेऊन पावन झालेल्या बाबांच्या थोर व परमभक्तांनी, श्री बाबांच्या या गूढाचा, त्यांच्या जातीधर्माचा, त्यांच्या मातापितरांचा, त्यांच्या गुरूंचा, त्यावेळी कसून शोध घेण्याचा प्रयत्न केला. श्री. दासगणू, श्री. चांदोरकर यांच्यासारखे बाबांचे विद्वान . परमभक्त, तसेच कै. सौ. बायजाबाईंसारखे खेडवळ, अशिक्षित परमभक्त, दोघांनीही बाबांकडून प्रत्यक्ष अथवा आडवळणाने त्यांचा पूर्वेतिहास जाणून घेण्याचा बराच प्रयत्न केला, पण बाबांनी कशाचाच थांगपत्ता लागू दिला नाही आणि शेवटपर्यंत हे गूढ कायमच राहिले. त्यावेळी, म्हणजे प्रत्यक्ष बाबा देहधारी असतानाही बाबांविषयीच्या या गूढ गोष्टींविषयी वाद व चर्चा, तसेच मतभेद होतच असत, पण बाबांनी हे गूढ प्रश्न अनुत्तरितच ठेवले.

श्री साईबाबांच्या सहवासात त्यांच्या परमभक्तांनी आपली आध्यात्मिक व पारमार्थिक उन्नती करून घेऊन आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतले आणि कै. श्री. बाळासाहेब देव (मामलेदार, डहाणू) व कै. श्री. रा. आ. तर्खड यांच्यासारख्या विद्वज्जनांनी, बाबांवरच्या नितांत श्रद्धेला केवळ अंधश्रद्धेच्या मार्गाने न नेता, त्याला आपल्या कुतूहलाची व चिकित्सक बुद्धीची जोड देऊन आणि त्यात तारतम्य भाव ठेवून बाबांच्या बाबतीत जे जे निष्कर्ष काढले ते ते अत्यंत बहुमोल असेच आहेत. त्यांनी बाबांच्या चरित्राचा सर्वांगाने परिपूर्ण असा अभ्यास करून 'साईचरित्राला' व्यापक दृष्टिकोन प्राप्त करून दिला. बाबांविषयीच्या कित्येक महत्त्वाच्या किंवा साधारण अशा बाबींवर त्यांनी प्रत्यक्ष अनुभवांवरून विद्वत्ताप्रचुर असे लिखाण केले. स्वत: चिकित्सक वृष्टीने व सूक्ष्म निरीक्षणाने त्यांनी आपल्या परमदैवताचा, म्हणजेच श्री सद्‌गुरू साईबाबांच्या चरित्राचा मान अधिक उंचावला यात शंकाच नाही. 'बाबा हिंदू की मुसलमान' याविषयीच्या त्यांच्या लेखात (श्री साईलीला, वर्ष ४ थे) कै. श्री. बाळासाहेब देवांनी फार सुंदर विश्लेषण केले आहे.

श्री साईबाबांना वरवर पहाणाऱ्याला तर शक्यच नाही, पण फार खोलात शिरून पहाणाऱ्यालाही त्यांच्या हिंदुत्वाचा किंवा त्यांच्या यवनत्वाचा पूर्ण अंदाज घेता येत नसे. त्यांची नेहमीची वागणूक ते हिंदू होते की यवन होते, हे न कळण्याइतकी पुष्कळच गुंतागुंतीची असे. श्री साईसच्चरितात हेमाडपंत म्हणतात त्याप्रमाणे **''हिंदू म्हणता दिसत यवन। यवन म्हणता हिंदु सुलक्षण। ऐसा हा अवतार विलक्षण।''**

असा हा खरोखरच विलक्षण अवतार होता. त्यांचे मशिदीत रहाणे, त्यांचा **''अल्ला मालिक है''** किंवा **''अल्ला भला करेगा''** यासारखा मुखाने सदैव चालू असलेला जप, त्यांचे फकिरांच्या संगतीत मांसभोजन करणे, मध्येच यावनी भाषेचा वापर करणे, तसेच ईद व मोहरमला पाठिंबा देणे यांसारख्या गोष्टी त्यांचे यवनत्व दाखवून देत. त्यांचे 'साई' हे नावही यवनजातीदर्शक होते. त्यांचा फात्या देण्याचा क्रम, निंबर व त्यांवर घातलेले शेरे, तसेच ते देत असलेली उदी ही त्यांच्या यवनत्वाची लक्षणे होत. तथापि, बाबांचे हिंदुत्व सिद्ध करण्याकरिता जी लक्षणे आहेत, ती खरोखरच विचार करण्यासारखी आहेत.

बाबांची भक्तमंडळी बाबांस 'साई', 'साईबाबा', 'साईनाथ', 'साईराज', 'बाबा', 'बावा', 'देव' अशा निरनिराळ्या नावांनी संबोधित. ह्या सर्व नावांत 'साई' हेच एक नाव काय ते यवनजातीदर्शक आहे. बाकीची सर्व नावे ही हिंदूंची आहेत. बाबा सर्व स्त्रियांना, मोठी असल्यास 'आई' व लहान असल्यास 'बाई' किंवा 'पोरी' याच नावाने संबोधित. त्यांनी कोणाला 'माँ' म्हटल्याचे ऐकिवात नाही.

बाबा आपली तिन्ही वेळची आरती व दुपारची पूजा ही हिंदूंकडूनच करवून घेत. सुरूवातीस बाबांच्या तिन्ही वेळच्या आरत्या कै. मेघा हा बाबांचा परमभक्त गुजराथी ब्राह्मण करीत असे. त्याच्या मृत्यूनंतर कै. श्री. बापूसाहेब जोगांकडे ही कामगिरी बाबांनीच स्वत: सोपविली. तसेच बाबा सुरूवातीस कोणाकडूनही पूजा करवून घेत नसत. त्यांची प्रथम पूजा करण्याचा मान कै. श्री. नानासाहेब चांदोरकरांचे थोरले

चिरंजीव बापूराव यांना मिळाला.

बाबांच्या मशिदीत धुनीच्या रूपाने अग्निनारायण सदैव प्रज्वलित असे. मुसलमान धर्मात अग्निपूजा मानत नाहीत. ती त्यांच्या धर्माविरुद्ध आहे. कोणत्याही मशिदीत धुनी आढळत नाही. तसेच मशिदीत जात्याचे दळण, शंख-घंटा-वादन हेही मुसलमान धर्मात शक्य नाही. बाबा देत असलेली 'उदी' यावरून केवळ बाबा यवन म्हणता येणार नाहीत. कारण 'उदी' हा मूळ शब्दही संस्कृत आहे.

बाबा शेंडी राखीत नसत, तसेच जानवेही घालीत नसत, यावरूनही त्यांचे यवनत्व सिद्ध होऊ शकत नाही. कारण बाबांचे सर्वात जुने विद्वत्ताप्रचुर चिकित्सक परमभक्त कै. श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या मते बाबा हे 'संन्यासी' होते व संन्याशास शिखा (शेंडी) व सूत्र (जानवे) नसते हे प्रसिद्धच आहे.

बाबांचा वेष म्हणजे कफनी व लंगोटी. हेही त्यांच्या हिंदुत्वाच्या लक्षणांपैकी एक होय! कोणीही त्यांना मुसलमानी तुमान, विजार किंवा त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे पागोटे घातलेले बघितलेले नाही. त्यांची सुंता झालेली नव्हती. तसेच त्यांचे कानही टोचलेले होते. हिंदू धर्मात ह्या दोन्ही गोष्टी आवश्यक मानल्या जातात. बाबा हिंदू की यवन यावर पूर्वी एकदा जोरदार चर्चा झाली असता नानासाहेब चांदोरकरांनी वरील दोन्ही इंद्रियांचे स्वत: डोळ्यांनी निरीक्षण करून आपली खात्री करून घेतली व त्यानंतरही बाबा हिंदूच आहेत, यवन नाहीत, अशी इतरही अनेक कारणांवरून त्यांची खात्री पटत गेली. त्यांच्या मते, बाबा हिंदूच असून ब्राह्मण होते, संन्यासीही होते.

बाबा फारकरून मराठी भाषाच बोलत. यावनी भाषा क्वचित् बोलत किंवा विशेषप्रसंगी बोलत. पण तीही शुद्ध यावनी नसे. त्यांचे वर्तन हे उभय वर्गांशी समसमान असल्याकारणाने दोघांनाही ते आपलेच दैवत भासत.

बाबा नमाज पढत नसत. पण त्यांना हिंदूंच्या सर्व आध्यात्मिक ग्रंथांचे संपूर्ण ज्ञान होते. कै. नानासाहेब चांदोरकरांचा वेदांताचा व संस्कृतचा व्यासंग गाढा असतानाही बाबांनी गीतेमधील श्लोकांद्वारे मार्मिकतेने, संक्षिप्तरूपाने, व्याकरणशुद्ध रीतीने व परमममतेने सर्व भगवद्गीता त्यांना लहान मुलाप्रमाणे पढवली, असे खुद्द कै. श्री. नानासाहेबांनीच कै. श्री. बाळासाहेब देवांना सांगितले होते. श्री साईसचरितातही बाबांनी श्री. नानांना गीतेतील एका श्लोकाचा अर्थ विचारून, त्यांचा अभिमान हरण करून, त्यांची मती कुंठीत करून सोडल्याचे उदाहरण आहेच. या एका गोष्टीवरूनही बाबांचे हिंदुत्व, द्विजत्व प्रस्थापित होण्यास अडचण पडणार नाही, हे उघड आहे.

बाबांना त्यांच्या पूर्वेतिहासाबद्दल खोदून विचारल्यास, उदाहरणार्थ: आपले आई-बाप कोण, आपण कोठून आलात, आपले मूळगाव कोणते वगैरे, तर ते त्या प्रश्नांवर दुर्लक्ष करीत व फार झाले तर ''आम्ही नौरंगाबादेहून आलो, तेथे मी मामाच्या घरी होतो, त्या मामाचे नाव नसत्या'' वगैरे सांगत. त्यामुळे त्यांच्याकडून त्यांच्या जातीचा वा वर्णाचा थांगपत्ता लागत नसे.

त्यांना रानावनात हिंडून, शोधून आणून, त्यांच्याशिवाय अन्नाचा घास ग्रहण न करणारी बायजाबाई किंवा तिसऱ्या प्रहरी त्यांच्याकरिता दूध व भाकरी नियमित घेऊन येणारी एक वृद्ध बाई, तसेच लक्ष्मीबाई ही मंडळी हिंदूच होती. बाबा रोज सकाळी जी ओली भिक्षा मागत, ती हिंदूंकडूनच मागत व तीच खात. बाबांना रोज येणारे नैवेद्यही हिंदूकडूनच येत. त्यापैकी कोणताही नैवेद्य मुसलमानाकडून येत नसे.

बाबांची नेहमीची वागणूक ते 'हिंदू की मुसलमान' हे सिद्ध करण्यास पुष्कळ गुंतागुंतीची वाटत असली तरी बाबांचा सुंताअभाव, कर्णविंधत्व, अखंड प्रज्वलित धुनी व नानासाहेबांना केलेले 'भगवद्गीताध्यापन' ही कारणे त्यांच्या हिंदुत्वाची निदर्शक आहेत. बाबांचा वरचेवर होणारा 'नारायण नामोचार' हेही एक कारण त्यांच्या हिंदुत्वाची साक्ष पटवते. ते दिवसातून 'नारायण' नामाचा उच्चार अन्यरूपाने फार वेळा करीत असत. **''तो नारायण तेली फार वाईट आहे. नारायण तेली मला फार त्रास देतो. तू येथे राहू नकोस, असे नारायण तेली मला म्हणतो. मी या नारायण तेल्याच्या बापाचे काय खाल्ले आहे? नारायण तेली मला असे काय म्हणून म्हणणार? मी नारायण तेल्याच्या बापासही भिणार नाही. नाना, नारायण तेली चांगला नाही. तू या नारायण तेल्यास गावातून हाकलून दे! नारायण तेली मला फार छळतो. या नारायण तेल्याच्या त्रासाने मला अन्नपाणी गोड लागत नाही. नारायण तेली लई वंगाळ आहे. नारायण तेली मला शिव्या देतो....''** वगैरे.... वगैरे....

असो. याविषयी सूक्ष्म निरीक्षण व संशोधन करण्यात कै. श्री. नानासाहेब चांदोरकरांनी फार परिश्रम घेतले. तरीही हे केवळ जिज्ञासू बुद्धीने केलेले, बाबांची लौकिक जात व धर्म याविषयाच्या प्रेमापोटी केलेले निरीक्षण होय! त्याचा आपण जास्त खोलात शिरून विचार करू नये. कारण बाबा हिंदू असले काय किंवा यवन असले काय, ते सर्वतोपरी वंदनीयच आहेत. त्यामुळे ते हिंदू असले तरी त्यांच्या यवन भक्तांना वाईट वाटण्याचे कारण नाही व ते यवन असल्यास त्यांच्या हिंदू भक्तांनाही खेद करण्याचे कारण नाही व तशी खंत कोणी हिंदू व यवन भक्तही बाळगीत नाही. साधूसंतांच्या जातीधर्माबद्दल खरे तर विचार करूच नये. कारण जात कळल्यामुळे त्यांच्याबद्दलच्या पूज्यभावनेत लेशभरही फरक होत नाही आणि शेवटी जात कोणाला? बाबांना, परमात्म्याला, परब्रह्माला की सच्चिदानंदाला!

**'ते कीर अनाम अजाती'**

खरोखर, त्या परब्रह्मास नाव नाही व जातही नाही, असे श्री ज्ञानेश्वरांनी श्री ज्ञानेश्वरीत अ. १७, श्लोक २३, ओवी २९ यातील प्रथम चरणात मांडले आहे.

संदर्भ: बाळासाहेब देव लिखित 'बाबा हिंदू की मुसलमान', श्री साईलीला, वर्ष ४, अंक १३ व श्री साईसच्चरित.

# श्री साईबाबा आणि भक्तिमार्ग

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

ईश्वरप्राप्तीचे चार मार्ग आहेत: ज्ञान, योग, कर्म आणि भक्ती. श्री साईबाबा स्वत: ज्ञानी होतेच, अत्यंत श्रेष्ठ योगीपण होते. कर्म म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी तप वगैरे कडक साधनाही त्यांनी केल्या होत्या, असे म्हणतात. परंतु सर्वजनांना ते भक्तीचाच उपदेश करीत असत. ज्ञानमार्गाने ईश्वरप्राप्ती लगेच होते; परंतु तो मार्ग अतिशय अवघड आहे आणि त्यात अहंकार होऊन पतनभयही असते. योगमार्गात शरीराला बरेच कष्ट द्यावे लागतात आणि अन्नपानाची बरीच पथ्ये पाळावी लागतात. कर्ममार्गात कर्माचे कर्तृत्व न घेणे व फलाचा त्याग करणे साधारण माणसाला जमत नाही. भक्तिमार्गाचे मात्र तसे नाही. सर्वात सोपा आणि संसारात राहून सर्वांना आचरता येणारा म्हणून बाबा त्याचाच उपदेश करीत असत:

**भक्ती ही बाभुळवनींची वाट।**
**खांचा खळगे अति बिकट।**
**एकपावली परी ती नीट।**
**हरीनिकट नेई कीं॥१६॥**
**कांटा टाळूनि टाका पाय।**
**हाचि एक सुलभ उपाय।**
**तरीच निजधाम पावाल निर्भय।**
**निक्षूनि गुरूमाय वदे॥१७॥**

–अध्याय ६

**भक्ती म्हणजे काय?**

भक्ती म्हणजे ईश्वराबद्दल प्रेम असणे. मुनिश्रेष्ठ शांडिल्य त्यांच्या शाण्डिल्य-भक्ति-सूत्रात भक्ती म्हणजे **'सा परानुरक्तिरीश्वरे'** (ती म्हणजे ईश्वराबद्दल अत्यंत आसक्ती किंवा प्रेम होय) असे सांगतात. परमभक्त नारदमुनीही त्यांच्या नारद-भक्ति-सूत्रात भक्तीची व्याख्या **'सा तस्मिन् परमप्रेमरूपा'** (ती म्हणजे ईश्वराबद्दल परम प्रेम होय) अशीच करतात. श्री साईसच्चरितातही असेच म्हटले आहे:

**प्रेमचि नाहीं जयाचे ठायीं।**
**ऐसा मानव होणेंचि नाहीं।**
**कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं।**
**अधिष्ठान पाहीं आनान॥१२६॥**
**कोणाच्या प्रेमाची जागासंतती।**
**कोणाची ती धनमानसंपत्ति।**
**देह गेह लौकिक कीर्ति।**
**विद्याप्राप्ति कोणाची॥१२७॥**
**प्रेम जेंविषयीं वाटतें।**
**तें सर्व जैं एकवटतें।**
**हरिचरणमुशींत जें आटतें।**
**तैं तें प्रकटतें भक्तिरूपें॥१२८॥**

–अध्याय १०

**भक्तीचे प्रकार**

भक्ती सगुण किंवा निर्गुण असते. सगुण म्हणजे ईश्वराच्या साकार स्वरूपाचे पूजन, मनन किंवा ध्यान करणे; तर निर्गुण म्हणजे ईश्वराला आकार नसलेला, अनादि, अनंत, सर्वव्यापी व सर्वांच्या हृदयात वास करणारा मानून त्याचे ध्यान करणे होय! खरे म्हणजे:

**सगुण तेंचि साकार।**
**निर्गुण तें निराकार।**
**भिन्न नाहीं परस्पर।**
**साकार निराकार एकचि॥१३॥**
**थिजलें तरी तें घृतचि संचलें।**
**विद्युरलें तेंहि घृतचि म्हणितलें।**
**सगुण निर्गुण एकचि भरलें।**
**समरसलें विश्वरूपें॥१४॥**

–अध्याय ११

पण सगुण भक्ती करण्यास सोपी आहे आणि तिचे महत्त्वही विशेष आहे:

**न करितां सगुणाचे ध्याना।**
**भक्तिभाव कदा प्रकटेना।**
**आणि सप्रेम जंव भक्ति घडेना।**
**कळीं उघडेना मनाची॥११॥**
**डोळे भरूनि जे पाहूं येई।**
**पदीं ज्याच्या ये ठेवितां डोई।**
**जेथ ज्ञानाची लागे सोई।**
**आवडी होई ते ठायीं॥१५॥**
**जयाचिये संगती। प्रेमवार्ता करूं येती।**
**जयासी पूजूं ये गंधाक्षतीं।**
**म्हणूनि आकृति पाहिजे॥१६॥**
**निर्गुणाहूनि सगुणाचे।**
**आकलन बहु सुकर साचें।**
**दृढावल्या प्रेम सगुणाचें।**
**निर्गुणाचें बोधन तें॥१७॥**

–अध्याय ११

म्हणून साईबाबा सर्वजनांना सगुण भक्तीचाच उपदेश करीत असत. खरे पाहिले तर सगुण भक्तीचे महत्त्व लोकांना प्रत्यक्ष अनुभव देऊन पटवून देणारे श्री साईबाबा हे माझ्या मते एकमेव संत आहेत:

(१) अध्याय ३३ मध्ये मुंबईचे भजनकार बाळाबुवा सुतार (अर्वाचीन तुकाराम) यांचा उल्लेख आहे. १९१३ साली ते प्रथमच शिरडीला रामनवमीच्या उत्सवाच्या कीर्तनासाठी गेले होते. त्यापूर्वी ते साईबाबांना कधीही भेटले नव्हते. तरीसुद्धा त्यांना पाहिल्यावर बाबा म्हणाले,

''याची चार वर्षांपासून मला ओळख आहे.''

बाळाबुवांना प्रथम मोठे आश्चर्य वाटले; परंतु नंतर त्यांना चार वर्षांपूर्वी मुंबई येथे आपण बाबांच्या छबीला नमस्कार केल्याचे आठवले; आणि त्यांना पटले की ईश्वर असो की संत असो ते सर्वव्यापी व सर्वदर्शी असल्याने त्यांच्या छबीचे दर्शन हे त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनासमान असते.

(२) अ. ९ मध्ये वांद्याच्या बाबासाहेब तर्खडांचा, त्यांच्या पत्नीचा व मुलाचा अनुभव आपण वाचलाच आहे. बाबांची पत्नी व मुलगा शिरडीला गेले असल्याने साईबाबांच्या छबीच्या पूजनाची व नैवेद्य दाखविण्याची जबाबदारी बाबासाहेबांनी घेतली होती. एक दिवस ते कामावर जाण्याच्या घाईत खडीसाखरेचा नैवेद्य दाखविण्यास विसरले. त्याचदिवशी शिरडी येथे त्यांची पत्नी व मुलगा साईबाबांच्या दर्शनासाठी मशिदीत गेले असताना बाबा सौ. तर्खडांना म्हणाले:

**काय करावे आई आज।**
**गेलो मी वांद्यास जैसा रोज।**
**नाहीं खावया प्यावया पेज।**

**उपाशी मज यावें लागले॥१०७॥**
**मालक नाहीं मिळाला घरीं।**
**आंतडीं माझीं कळवळली।**
**तैसाचि मी अन्नावीण माघारी।**
**भर दुपारीं परतलो॥१०९॥**

आणि सर्व भक्तांना पटवून दिले की देवाच्या किंवा संताच्या छबीला दाखविलेला नैवेद्य त्यांना पोहचत असतो; भाव मात्र पाहिजे.

(३) अ. ४० मध्ये १९१७ साली होळीच्या दिवशी साईबाबांनी कै. दाभोलकरांच्या स्वप्नात जाऊन सांगितले की मी आज तुझ्याकडे जेवावयास येईन आणि खरोखरीच त्यां दिवशीच दुपारी सर्व मंडळी जेवावयास बसणार इतक्यात साईबाबांची एक पार्थिव मूर्ती दाभोलकरांच्या अल्ली महंमद नावाच्या मुसलमान मित्राने आणून दिली. पुढे काही वर्षांनंतर अल्ली महंमदने दाभोलकरांना त्याने त्याचदिवशी ती मूर्ती आणून का दिली, हे सांगताना एक चमत्कार सांगितला. 'मुसलमानाने घरात संतांच्या किंवा अवलियांच्या छब्या ठेवणे म्हणजे ती एक इस्लाम धर्माला मान्य नसलेली मूर्तिपूजाच होय!' असे त्याच्या मेहुण्याने म्हटल्याने अल्ली महंमदने आपल्या बंद असलेल्या घरातून आपल्या कारभाऱ्याकरवी संतांच्या व अवलियांच्या सर्व छब्या मागवून घेतल्या व मेहुण्याकडून समुद्रात बुडविल्या. परंतु काही महिन्यानंतर अल्ली महंमद जेव्हा घरी गेला तेव्हा एक बाबांची छबी मात्र तशीच समोर भिंतीवर टांगलेली सापडली. तीच कशी कारभाऱ्याकडून राहून गेली हे कळेना! आपल्या मेहुण्याने ती पाहिली तर रागाने तो ती घेऊन समुद्रात टाकून देईल म्हणून अल्ली महंमदने दाभोलकरांना ते साईभक्त असल्याचे ठाऊक असल्याने लगेच आणून दिली.

या कथेवरून साईबाबांनी आपली पार्थिव मूर्ती म्हणजेच आपण स्वत: हे दाभोलकरांना तर सांगितलेच, परंतु त्याचबरोबर एका मुसलमानाला त्यांचे हिंदूंच्या मूर्तिपूजेबद्दलचे विचार किती चुकीचे आहेत, हेही पटवून दिले.

(४) अ. ४६ मध्ये काकासाहेब दीक्षितांनी आपल्या मुलाच्या मुंजीसाठी नागपूरला आणि नानासाहेब चांदोरकरांनी आपल्या मुलाच्या लग्नासाठी ग्वाल्हेरला येण्यासाठी साईबाबांना आमंत्रण दिले. त्यावर बाबा म्हणाले,

''शाम्याला घेऊन जा!''

परंतु काकासाहेबांनी बाबांनी स्वत: यावे असा आग्रह धरला तेव्हा:

**तयावरीही तात्काळ उत्तर।**
**''काशीप्रयाग करूनि सत्वर।**
**शाम्याचेही येतो अगोदर।**
**मज काय उशीर यावया''॥३३॥**

आणि काय आश्चर्य! शामराव जेव्हा काशी-प्रयाग वगैरेंची यात्रा करून गयेला पोहोचले तेव्हा तेथील गयावळाच्या घरी साईबाबा छबीरूपाने समोरच हजर! शामराव मनात म्हणाले,

**''माझ्या आधींच माउली माझी। कैसी ही मज पुढें॥''**

आणि बाबांच्या शिरडी येथे म्हटलेल्या शब्दांची आठवण येऊन ते सद्गदित झाले. असो. या प्रसंगावरूनही आपली छबी म्हणजे आपण स्वत:च आहोत, हेच नाही का बाबांनी सूचविले!

याखेरीज साईबाबा आपल्या कृतीने व उपदेशानेही सगुणोपासनेचा प्रचार करीत असत. शिरडीतील जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार आपल्या भक्तांकडून तर त्यांनी करवून घेतलाच, एवढेच नव्हे तर त्यातील देवदेवतांची पूजा झाल्याशिवाय आपली स्वत:ची पूजा ते कधी करवून घेत नसत. दर्शनाला आलेल्या भक्तांना त्यांनी वेळोवेळी पूजेत ठेवण्यासाठी रुपये दिलेले, तसेच रा. ब. प्रधानांच्या पत्नीला आपल्या चांदीच्या पादुकांची पूजा करण्यास प्रोत्साहन दिल्याचे आपणाला माहीतच आहे.

**नवविधा भक्ती**

सगुण भक्ती करण्याचे नऊ विधी आहेत. हेमाडपंत म्हणतात:

**श्रवण–कीर्तन विष्णुस्मरण।**
**चरणसेवन–अर्चन–वंदन।**
**दास्य–सख्य–आत्मनिवेदन।**
**भक्ति हे जाण नवविधा॥९५॥**
**पूर्णभाव ठेवूनि अंतरीं।**
**यांतून एकही धरली जरी।**
**भावाचा भुकेला श्रीहरी।**
**प्रकटेल घरींच भक्ताच्या॥९६॥**

–अध्याय २१

साईबाबांनी हे सर्वच विधी भक्तांना वेळोवेळी समजावून सांगितले होते, इतकेच नव्हे तर त्यांच्याकडून ते कृतीतही आणविले होते.

**(१) श्रवण**

काकासाहेब दीक्षित, बापूसाहेब जोग वगैरे सुशिक्षित भक्तांकडून साईबाबा ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण वगैरेंसारख्या पोथ्या दररोज वाचवून घेत आणि भक्तांना त्या ऐकण्यास आग्रहाने पाठवीत असत. श्री साईसच्चरिताच्या श्रवणाबद्दल तर त्यांनी म्हटले आहे:

**करितां माझियां कथांचे श्रवण।**
**तयांचे कीर्तन आणि चिंतन।**
**होईल मद्भक्तीचे जनन।**
**अविद्या निरसन रोकडे॥८२॥**

–अध्याय २

**(२) कीर्तन**

रामनवमीला व गोकुळाष्टमीला साईबाबा आपल्यापुढे कीर्तन करवून घेत असत, हे आपण जाणतोच. तसेच अ. १५ मध्ये बाबांनी दासगणूंना कीर्तन करण्यासाठी पोशाख कसा करावा, याचा महत्त्वाचा दिलेला धडा आपण वाचलाच आहे. खरे म्हणजे दासगणूंना पोलीस खात्याची नोकरी सोडून संतांची आख्याने रचून कीर्तन करण्यास बाबांनीच लावले होते. आपल्या चरित्र-गाथेबद्दल बाबा म्हणतात:

**मग जो गाई वाडेकोडे।**
**माझें चरित्र माझे पवाडे।**
**तयाचिया मी मागें पुढें।**
**चोहींकडे उभाचि॥१२॥**
**कोणीही केल्या माझे कीर्तन।**
**तयासी देईन आनंदघन।**
**नित्य सौख्य समाधान।**
**सत्य वचन मानावे॥१४॥**

–अध्याय ३

अध्याय ३ मधील रोहिल्याची कथा पहा, मशिदीत किंवा चावडीत रात्रंदिवस किती मोठ्या व घर्घर आवाजाने कुराणाच्या कलमा तो पढत असे! परंतु बाबांना त्याचा

मुळीच त्रास होत नसे. गावकऱ्यांनी त्याच्या ओरडण्याबद्दल तक्रार केली, तर उलट

**''रोहिल्याची आवडे मज संगती। नामीं प्रीति तयातें॥''** असे म्हणून त्याला स्वच्छंदपणे गाऊ द्यावे, अशी बाबांनी त्यांना समजूत दिली.

**(३) स्मरण**

स्मरण म्हणजे नामस्मरण. आपल्या उपास्य दैवताचे किंवा गुरूचे स्मरण म्हणजे आठवण किंवा चिंतन करून त्याचे नाम जपणे होय! नामाचा महिमा सर्वच संतांनी गाईला आहे. श्री साईसच्चरितातही म्हटले आहे:

**नाम पापाचे पर्वत फोडी।**
**नाम देहाचे बंधन तोडी।**
**नाम दुर्वासनेच्या कोडी।**
**समूळ दवडी लोटुनी॥८५॥**
**नाम काळाची मान मोडी।**
**चुकवी जन्ममरणओढी।**

**नामापरीस सोपे आन।**
**अंत:शुद्धीस नाहीं साधन।**
**नाम जिव्हेचे भूषण।**
**नाम पोषण परमार्था॥८८॥**
**नाम घ्यावया नलगे स्नान।**
**नामासि नाहीं विधिविधान।**
**नांमें सकळ पापनिर्दळण।**
**नाम पावन सर्वदा॥८९॥**

–अध्याय २७

म्हणूनच की काय साईबाबांनी अध्याय २७ मध्ये आपल्या लाडक्या भक्ताची शाम्याची इच्छा नसतानाही श्री विष्णूसहस्त्रनामाची पोथी त्याच्या गळ्यात बांधली होती.

स्वत:चे नाम घेण्याबद्दल बाबा म्हणतात:

**वरी एक सांगतो शामा।**
**प्रेमे घेईल जो मन्नामा।**
**तयाच्या मी सकळ कामा।**
**पुरवी प्रेमा वाढवी॥११॥**

–अध्याय ३

**सोडूनिया लाख चतुराई।**
**स्मरा निरंतर 'साई साई'।**
**'बेडा पार' होईल पाही।**
**संदेह कांहीं न धरावा॥१३५॥**

–अध्याय १०

**साई साई नित्य म्हणाल।**
**सात समुद्र करीन न्याहाल।**
**या बोला विश्वास ठेवाल।**
**पावाल कल्याण निश्चये॥१२॥**

–अध्याय १३

**(४) पादसेवन**

पादसेवन म्हणजे भगवंताच्या किंवा सद्गुरूच्या चरणांचे दर्शन, चिंतन करणे, आदराने दोन्ही हातांत धरून नमस्कार करणे किंवा ते हळूहळू चेपणे होय! याविषयी अध्याय २२ मध्ये साईबाबांच्या दगडावरच्या नित्य बैठकीचे वर्णन करताना हेमाडपंत म्हणतात:

**काय ती निजभक्तांची असोसी।**
**पुरविसी निज पायापासी।**
**वामजानूवरी दक्षिण पायासी।**
**ठेवूनि बैससी जे समयीं॥१५॥**
**म्हणे होऊनि निरभिमान।**
**सर्वांभूतीं खालवा मान।**
**करा एक अंगुष्ठध्यान।**
**सोपे साधन भक्तीचें॥२५॥**

द्वारकामाईतील गादीवर बसल्याचे तैलचित्र पहा! त्यातही बाबा उजवा पाय पुढे करून बसलेले दिसतात. म्हणतात, बाबा नेहमी दोन्ही पाय लांब करून बसत असत. (त्यांचे म्हाळसापती व शामराव देशपांडेसमवेतचे चित्र पहा!) जणूकाय भक्तांच्या नमस्कार करण्याच्या किंवा पादसंवाहनाच्या सोयीसाठीच! एकूण बाबा पादसेवन भक्तीला उत्तेजनच देत असत.

भगवंताच्या किंवा सद्गुरूच्या चरणतीर्थाचे पान करणे, हेंही पादसेवन भक्तीत मोडते; आणि त्याचे महत्त्व तर बाबांनी दासगणूंना एक चमत्कार दाखवून अ. ४ मध्ये कसे सुंदर तऱ्हेने पटवून दिले होते!

**खरेच काय सांगावे कौतुक।**
**बाबांचे चरणीं ठेवितां मस्तक।**
**उभयांगुष्ठीं निथळलें उदक।**
**गंगायमुनोदक पाझरलें॥१०४॥**

आणखी अ. ४५ मध्येसुद्धा काकासाहेब दीक्षितांना भागवतातील नवयोग्यांच्या अति खडतर भक्तिबद्दल वाचून आपल्या स्वत:च्या भक्तिबद्दल शंका वाटू लागल्यावरून साईबाबांनी त्यांना आनंदराव पाखाड्यांचे स्वप्न कथन करवून **'गुरूपदवंदनभक्ति पुरे'** हे कसे पटवून दिले ते आपण वाचलेच आहे.

**(५) अर्चन**

अर्चन म्हणजे आपल्या उपास्य देवतेची किंवा गुरूची प्रत्यक्ष किंवा त्यांच्या छबीची वा मूर्तीची पूजा-आरती करणे. सुरवातीला नम्रपणाने म्हणून साईबाबा आपली पूजा भक्तांना करू देत नसत; परंतु पुढे भक्तांच्या आग्रहामुळे व त्यांच्या कल्याणासाठी स्वत:ची सामूहिक पूजा-अर्चा त्यांनी करू दिली. आजही शिरडीत किंवा घरीही त्या पद्धतीचा आनंद भक्त लुटीत आहेत. शिरडीतील गुरूपौर्णिमेची पूजा त्यांच्याच प्रेरणेने दादा केळकर, तात्यासाहेब नूलकर व शामराव देशपांडे यांनी सुरू केली होती.

**(६) वंदन**

बाबांना कोणी नमस्कार करो वा न करो याबद्दल त्यांना पर्वा नसे. परंतु एखादा इसम बाबांविषयी श्रद्धा नसल्याने किंवा सगुण भक्तीवर विश्वास नसल्याने त्यांना नमस्कार न करण्याच्या निश्चयाने आला तर त्याला मात्र काही चमत्कार दाखवून आपल्याला नमस्कार करावयास लावून वंदन भक्तीचे महत्त्व त्याला पटवून देत असत. उदा. अ. १२ मधील नाशिकक्षेत्रस्थ अग्निहोत्री ब्राह्मण मुळेशास्त्री व रामोपासक ब्राह्मण डॉक्टर, अ. ३५ मधील काका महाजनींचे मूर्तिपूजापराङ्मुख मित्र व मुंबईचे शेठ ठक्कर धरमसी जेठाभाई वगैरे. असें करण्यात बाबांना स्वत:चा मोठेपणा मिरवावयाचा नव्हता, तर त्या इसमांना व इतर भक्तांना सगुण भक्तीतील वंदन भक्तीचे महत्त्व पटवून द्यावयाचे होते:

**वाणीश्रवणपापभंजन।**
**एक लोटांगण घालता॥२०॥**

–अध्याय ३

**(७) दास्य**

याची श्री साईसच्चरितातील ठळक उदाहरणे म्हणजे नांदेडचा अब्दुल्ला, नेवाशाचा बाळाजी पाटील आणि पंढरपूराहून स्वखुशीने आलेल्या राधाकृष्णामाई उर्फ सुंदराबाई क्षीरसागर. अब्दुल्ला १८-१९ वर्षांचा असताना बायको-मुले व घरदार

सोडून बाबांकडे आला व त्यांच्या हयातीत त्यांच्याजवळ २६ वर्षे सतत राहून सेवा केली. त्याचे मुख्य काम मशिदीतील, चावडीतील व लेंडीबागेतील दिवे तेल घालून निरंतर प्रज्वलित ठेवण्याचे असे. मशिदीतील झाडलोट, बाबांचे पिण्याचे पाणी भरून ठेवणे, ओढ्यावर जाऊन बाबांचे कपडे धुणे वगैरे कामेही तोच करीत असे. बाबांच्या निर्वाणानंतरही मुलाबाळांकडे नांदेडला परत न जाता मरेपर्यंत ३६ वर्षे तो शिरडीतच राहिला होता आणि बाबांच्या समाधीची झाडझूड वगैरे सेवा आणि येणाऱ्या भक्तांना मार्गदर्शन करीत असे.

नेवाशाचा बाळाजी पाटील बाबांनी स्नान करून, हातपाय व तोंड धुवून निघालेले मोरीचे सांडपाणी पिऊन राहात असे. तसेच बाबांनी सांगितलेल्या कोण्या दुखणेकऱ्याची पडेल ती घाणेरडी सेवाही तो करीत असे आणि बाबांच्या लेंडीवर व चावडीवर जाण्या-येण्याच्या रस्त्यातील विष्ठा वगैरे घाण काढून ते झाडीतही असे. असल्या सेवाभक्तीमुळेच की काय त्याच्या मरणानंतरही त्याच्या श्राद्धाच्या वेळी अचानक तीनपट माणसे जेवावयास आली तरी त्याच्या घरचे अन्न बाबांनी कमी पडू दिले नाही व अब्रू राखली.

राधाकृष्णामाई मशिदीत बाबांसमोर कधी येत नसत; परंतु बाबा नसताना मशिद सारवणे, चावडी शृंगारणे आणि चावडीच्या मिरवणुकीसाठी साजशृंगार, दिवे वगैरे श्रीमंत भक्तांकडून गोळा करण्याचे काम त्या करीत असत. एवढेच काय, बाळाजी पाटलानंतर रस्ते झाडण्याचेही काम त्यांनी उचलून घेतले होते:

**वर्ण ब्राह्मण अखिल वंद्य।**
**आणि ही सेवा ऐशी निंद्य।**
**शिवले न केव्हांही हे विचारमांद्य।**
**तियेच्या अनवद्य अंतरा॥१७८॥**

—अध्याय ३५

उगाच नाही बाबादेखील त्यांना आपल्या जेवणातील भाजीभाकरी मोठ्या प्रेमाने नियमितपणे दररोज पाठवीत असत आणि इंदोरचे जज्ज बाळासाहेब रेगे, नागपूरचे बापूसाहेब बुटी, मुंबईचे काकासाहेब दीक्षित आणि वामनराव पटेल (नंतरचे स्वामी साईशरणानंदजी) यांच्यासारख्या श्रेष्ठ व सुशिक्षित भक्तांनाही त्यांच्याकडे भक्तीचे धडे घेण्यास पाठवीत असत!

### (८) सख्य

श्री साईसच्चरितात सख्य भक्तीचे एकमेव उदाहरण म्हणजे शामा उर्फ माधवराव देशपांडे. साईबाबांच्या निकट सहवासात त्यांची सुमारे ४२-४३ वर्षे अव्याहतपणे गेली. त्यांच्याइतका बाबांचा निकट सहवास तात्या कोते पाटील व म्हाळसापती यांच्याशिवाय क्वचितच कोणाला लाभला असेल; परंतु माधवरावांची जवळीक काही वेगळीच होती. माधवरावांना बाबा मोठ्या प्रेमाने व लडिवाळपणे 'शाम्या' म्हणून संबोधित व माधवरावही बाबांना 'देवा' म्हणून हाक मारीत. बाबांना अरेतुरे म्हणण्याची, बाबांशी वाद करण्याची त्यांच्याशिवाय कोणाची हिंमत नव्हती. अध्याय ३६ मध्ये साईबाबांनी थट्टेने माधवरावांचा गालगुच्चा घेतल्याचे व माधवरावांनी

**ऐसाच नारळ डोकींत घालून।**
**या देवाला मशिदीमधून।**
**मी न जरी लावीं काढून।**
**तरी न म्हणवीन माधव॥१७८॥**

असे एका भक्त-बाईला सांगितल्याचे आपणाला माहीतच आहे. खरोखर, माधवरावांची भक्ती थोर सख्यभक्ती होती! उगाच नाही बाबांनी आपल्या निर्वाणानंतर ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य भोगावयास देऊन शामरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या व अत्यंत श्रमाच्या व दगदगीच्या भारतातील चारी धामांच्या व इतर पूज्य महत्त्वाच्या यात्रा विनामूल्य, अनायासे, आनंदात, सुखात व ऐषारामात कोट्याधिशांच्या सहवासात करून दिल्या. हत्तीच्या अंबारीत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार सरकार, कोट्याधिश सावकार, सुखवस्तु लोक यांचे माधवरावांना काही प्रसंगी सन्मान्य पाहुणे बनवून त्यांना माधवरावांना प्रेमालिंगन द्यावयास लावून माधवरावांचे पाया पडावयास लाविले. देव आपल्या सख्याकरिता काय करणार नाही! श्रीकृष्णाने अर्जुनाचे सारथ्यही नाही का केले!

### (९) आत्मनिवेदन

आत्मनिवेदन म्हणजे 'देवासी वाहावे आपण', हे होय! आपली बायको-मुले, घरदार, जमीन-जुमला, स्थावर-जंगम इस्टेट, आपली बुद्धी, आपले मन व आपला अहंकार हे सर्व देवाला वाहिल्यावरही जो 'आपण' म्हणून तोही देवाला वाहणे ही खरी आत्मनिवेदन भक्ती होय! या भक्तीचे महत्त्व इतके आहे की **'नवमभक्ति आत्मनिवेदन। न होता न चुके जन्ममरण॥'** असे समर्थ रामदासांनी म्हटले आहे. श्रवणभक्ती हा प्रारंभ व आत्मनिवेदन हा शेवट.

आत्मनिवेदनाचे श्री साईसच्चरितातील एकमेव उत्तम उदाहरण कै. काकासाहेब दीक्षितांचे होय! भरभराटीचा आपला कायद्याचा धंदा सोडून व सार्वजनिक क्षेत्रांतील उच्च पदांचा त्याग करून, बायकोमुलांना मागे मुंबईला ठेवून साईबाबांच्या चरणापाशी शिरडीत ते वारंवार राहू लागले. त्यांची भक्ती किती श्रेष्ठ! लंडनला आगगाडीत चढताना पाय घसरून पडल्याने त्यांना कायमचा लंगडेपणा आला होता; परंतु बाबांकडे तो बरा करण्याची मागणी त्यांनी कधी केली नाही:

**असो पायाचा लंगडेपणा।**
**त्याची न मज कांहीं विवंचना।**
**परी माझिया लंगडिया मना।**
**ताळ्यावरी आणा प्रार्थना ही॥३५॥**

—अध्याय ५०

बाबांना त्यांनी आपले तन, मन व धन सर्व अर्पण केले होते. एकदा त्यांना एका राजा-महाराजांच्या केसमध्ये बरेच पैसे मिळाले. ते सर्व रुपये एका ट्रंकेत भरून ते शिरडीला घेऊन आले आणि बाबांपुढे ठेवून म्हणाले,

''बाबा! हे सर्व तुमचेच आहे.''

बाबा म्हणाले,

''असे का?''

आणि त्यांनी ती ट्रंक उघडून त्यातील रुपये दोन्ही हातांनी भराभर काढून जमलेल्या लोकांना मनसोक्त वाटून टाकले. ट्रंक थोड्याच वेळात पार रिकामी झाली.